

# सफर मंगळावरची

सावित्री जगदाळे

# सफर मंगळावरची

(बालकथा)

स्नेहपूर्वक
सावित्री जगदाळे
९/२/२०२१

सावित्री जगदाळे

लोकसंस्कृती प्रकाशन

प्रकाशन क्र. १

**सफर मंगळावरची** (बालकथा)

सावित्री जगदाळे

**© सावित्री जगदाळे**

पवन-डी-५०५, डीएसके विश्व,
सिंहगड रस्ता, धायरी, पुणे - ४११०४१.
मो. ९७६५९८८९९३
email- sj91087@gmail.com

**लोकसंस्कृती प्रकाशन**
प्रा. डॉ. मिलींद कसबे
वृंदावन पार्क, नारायणगांव
ता. जुन्नर, जि. पुणे.
मो.९७६६९८४७७०

मुद्रण पहिलं - २००३
सुधारित दुसरी आवृत्ती - २०१२

**अक्षर जुळणी व मांडणी**
महेश जंगम

**मुद्रक :**
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि.
२५/१० नांदेड फाटा, सिंहगड मार्ग,
पुणे - ४११०४१. फोन : २४३९२७५९

**मुखपृष्ठ**
मिलिंद सोनावणे

**आतील चित्रे**
आदित्य

**किंमत : १२५/-**

*जगातल्या सगळ्या छोट्या मित्र मैत्रीणींना!*
*तुमचं जगणं सहज, स्वतंत्र,*
*समृद्ध, वाढविकासपूर्ण, प्रदुषणमुक्त वातावरणात*
*व्हावं हीच सदिच्छा!*



# प्रस्तावना

## सौ० सावित्री जगदाळे

स्नेहपूर्वक आशिर्वाद

सफर मंगळावरची आणि इतर गोष्टी हा कथासंग्रह मी वाचला. या संग्रहाला मी प्रस्तावना लिहावी अशी तुमची विनंती मी मान्य केली. याचं कारण असं की, साहित्याच्या क्षेत्रात आणि विशेषतः बालसाहित्याच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या कोणालाही प्रोत्साहन देणं हे मी माझं प्रथमकर्तव्य समजतो.

या संग्रहातील तेहतीस कथा म्हणजे मुलांसाठी मेजवानीची तेहतीस ताटं आहेत. आणि प्रत्येक ताटात वेगळा खाऊ, वेगळं पक्वान्न आहे.

या कथासंग्रहाला पहिल्याच कथेचं नाव दिलं आहे. मानसी आणि सौरभ या धाडसी मुलांनी स्वप्नात का होईना..पण मंगळावरचा प्रवास केला. ही घटना कथेत उत्तम रितीने गुंफलेली आहे. सध्या विज्ञानयुग चालू आहे. मुलांना चमत्कार आवडतातच. विज्ञानातील चमत्काराचा त्यांना परिचय झाला तर त्यांची बौध्दीक संपदा अधिक वृध्दिंगत होईल. या कथेने हेच कार्य साध्य होईल.

दुसरी कथा तेजस्वी चंद्रबिंबाची आहे. सरत्या सहस्त्रकातील शेवटचं तेजस्वी चंद्रबिंब पाहताना सर्वांचं भान हरवलं होतं. हा अनुभव रोमांचकारी आहे.

मुलांना व्यायामाचं महत्त्व सांगणारी 'दणकटपणा,' 'आई पडते आजारी' या कथेत मुलं आईला विश्रांती घ्यायला सांगतात आणि स्वतः कामं करतात, 'वाचाल तर वाचाल' आणि 'चमत्कार' या दोन्ही गोष्टीमध्ये वाचनाचे महत्त्व अतिशय सुंदर, मनोरंजक पध्दतीने विषद केले आहे. ओसामा बिन लादेनची मुलाखत वाचून थरारक अनुभव येतो. मुलं वाचता वाचता विचार करतील, चांगलं काही करण्यास प्रवृत्त होतील. वाचनाची गोडी लागेल. आवड निर्माण होईल.

उन्हाळ्याची सुट्टी आणि सुट्टीतील मजा हा मुलांचा आवडता विषय असतो. कै. वि. वि. बोकील यांनी वसंत आणि ना. धों. ताम्हणकर यांनी गोट्या या पात्राच्या माध्यमातून मुलांची सुटीतील कामगिरी खूप सुंदर रितीने मराठी बालसाहित्यात ग्रंथित केली आहे. त्या थोर लेखकांनी निर्माण केलेल्या आवडत्या पात्रांचीच आठवण व्हावी अशा काही कथा या संग्रहात आहेत. उदा... झाडावर चढून खा आंबे या कथेत अेका छोट्या खेडेगावातला निसर्ग, आणि मुलांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत त्याचा घेतलेला मनमुराद आनंद याचं सुरेख चित्रण आहे. मुलांना प्रोत्साहन देणारी पण तितकीच मुलांची काळजी घेणारी आज्जी मनाला चटका लावून जाते.

हेलन केलर यांचं कार्य सर्वांनाच माहित आहे. पण त्यांचं लहानपण 'बाळ हेलन' या गोष्टीतून कळतं. तिचा, तिच्या पालकांचा संघर्ष अंगावर शहारे आणतो.

'असा मी... तसे ते'... हे कथासप्तक वाचनीय आहे. यातील नायक स्वतःला इतरांच्या संदर्भात बघत असतो, शोधत असतो. त्यावेळी त्याच्या भावभावना कशा असतात, त्याचे मनोव्यापार कसे चालतात याचे चित्रण तुम्ही उत्तम रितीने केले आहे. आई, ताई, बाबा यांचे या मुलाशी भावबंध कसे आहेत, त्याच्या बालसुलभ अंतरंगात कोणते तरंग उमटत आहेत याची प्रत्ययकारी जाणीव वाचकांना होत राहील. मोठी माणसं एवढ्या कसल्या गप्पा मारतात याचं कुतुहल मुलांना नेहमीच असतं. हीच भावना 'असा मी' च्या चवथ्या भागात व्यक्त केली आहे. मावशी आणि आई यांच्या गप्पांचं अप्रुप मुलाला वाटत आहे.

'विठू वारकरी' हे एक सुरेख व्यक्तिचित्रण आहे. साधाभोळा, गरीब विठू आणि त्यांचं भावजिवन या कथेत उत्तम रितीने रंगविले आहे.फाटकी पैरण आणि खाकी अर्धी विजार असा वेष असलेला विठू आहे सततद्योगी. विठूचा गबाळा अवतार, त्याचं विक्षिप्त वागणं आणि मुलांची त्याची हमरीतुमरी या कथेत रंजकतेनं मांडली आहे. एका सिंधी कथेवर आधारलेली ही कथा मुलांना नक्कीच आवडेल.

'कडबाशिल्प' हे कथेचं नाव बुचकळ्यात टाकणारं आहे.

कडबा तो काय...

आणि त्याचं शिल्प कसलं... असा रास्त प्रश्न उभा करणारी ही कथा आहे. एका वेगळ्या वाटेवर घेऊन जाते. वैरणीची पिवळी ताटं, उरलेला कडबा, त्यातून हा एक बाजीराव कलावस्तू तयार करीत असतो. मॅकोनोपासून जशा विविध

वस्तू तयार करतात, तशा वस्तू हा बाजीराव करत असे. बाजीरावाचं वैशिष्ट्य असं की तो आपली कला विकत नव्हता. केवळ आनंदासाठी या वस्तू तो तयार करत होता. कडब्याच्या कितीतरी वस्तू तो तयार करत होता. त्यात ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडी, अशा कितीतरी वस्तू तो तयार करत असे.त्याला झाडपाल्याची औषधंही माहित होती. पकाक् पक या गाजलेल्या चित्रपटातला भुत्या याची आठपण येते, बाजीरावचं 'कडबाशिल्प' वाचल्यावर.

सांताक्लॉज हा तर मुलांच्या खूप प्रेमाचा विषय. त्याचा उपयोग आपण 'सांताक्लॉज आणि राही' या कथेत उत्कृष्ट रितीने केला आहे. या कथेतला सांताक्लॉज हा देशी आहे. परदेशी नाही. या मातीतला आहे. मुलांना तो अधिक जवळचा वाटेल.

सावित्री जगदाळे!

या कथासंग्रहाचं लेखन-प्रकाशन केल्याबद्दल मी तुमचं मनापासून अभिनंदन, कौतुक करतो. वाचनसंस्कृतीचा ऱ्हास होत आहे. ती नष्ट पावत आहे. अशी आता सर्वत्र हाकाटी होत असतानाही तुम्ही हा सांस्कृतिक खटाटोप करून या हाकाटीला विधायक उत्तर दिले आहे.

तुमच्या लेखनाची आणि कथासंग्रहाची काही बलस्थाने आहेत. ती प्रथम सविस्तरपणे सांगून मगच काही उणीवांचीही नोंद करतो.

तुमच्या या कथासंग्रहाचे प्रथम बलस्थान म्हणजे आशयघनता!

संपन्न आशयामुळे हा कथासंग्रह समृध्द झाला आहे. या आशयाचेही मग विविध पदर आहेत. त्यात नातीगोती आहेत, स्वभावरेखा आहेत, निसर्ग आहे, विविध स्थळं, घटना, प्रसंग आहेत. आणि प्रसंगी विश्वाखालचे सगळे काही आहे. एखाद्या वस्तुसंग्रहालयात प्रवेश केल्यावर अनेक प्रकारच्या वस्तू पाहून डोळे विस्फारून जावेत त्याप्रमाणे तुमच्या कथेतील आशयघटक आहेत.

या लेखनाचे दुसरं बलस्थान म्हणजे वर्णनशैली!

मुलांना वर्णनं खूप आवडतात: व्यक्ती, घटना, प्रसंग यांची उत्तम व अतिशय प्रत्ययकारी वर्णनं तुम्ही केली आहेत.

तिसरे बलस्थान म्हणजे भूतकाळ व भविष्यकाळ यांचे वर्तमानाशी घट्ट नाते राखून केलेले वर्णन!

अनेक कथांमध्ये कल्पनाविलास असला, भूतकाळातील प्रसंग असले तरी त्यांची नाळ वर्तमानाशी जोडलेली आहे. 'मंगळावरची सफर' या कथेत याचा

अनुभव येतो.

चौथे बलस्थान म्हणजे प्रासादिकता!

मुलांच्या मनोवृत्तीला साजेसे शब्द, साजेशी रचनाशैली वापरून तुम्ही या सर्व कथा लिहिल्या आहेत. प्रासादिकता हा लेखनगुण साहित्यकृतीच्या यशस्वितेसाठी मूर्धन्यस्थानी असणारा गुण आहे. तो तुमच्या लेखनात ओतप्रोत भरलेला आहे.

पाचवे बलस्थान म्हणजे बालभावविश्वाची समृद्धता!

या कथा ज्यांच्या आहेत त्यांचं भावविश्व तुम्ही नेमकं जाणलं आहे.

आता एक उणीव मात्र निदर्शनास आणतो.

असा मी हे... कथासप्तक जे तुम्ही लिहिले आहे ते सुटे सुटे तितके प्रभावी वाटत नाही. उलट ती एक दीर्घकथा वाटते. त्यामुळे त्या कथांना वेगळे क्रमांक देऊन तुम्हाला काय साधायचे आहे याचे नीटसे आकलन होत नाही, आणि त्याचे प्रयोजन समजत नाही.

तरिही...

या कथासंग्रहाचा वाचनोत्तर परिणाम उत्तमच होत आहे. मनोरंजन आणि प्रबोधन असा दुहेरी विधायक लाभ होतो. या कथासंग्रहाचे स्वागत शिक्षक, पालक, शिक्षणाधिकारी, विविध शिक्षणसंस्थाचे चालक आणि जागरूक नागरिक यांनी भरभरून करावे अशी इच्छा व्यक्त करतो.

आपल्या लेखनकार्याला शुभेच्छा!

१०१३, सदाशिव पेठ,
'गंधाली ', पुणे ४११०३०
मो. ९२२६५७५२९०

डॉ. न. म. जोशी

## मनोगत

मित्र-मैत्रिणींनो, तुम्हाला काय सांगणार!
आजची मुलं तुम्ही, आमच्यापेक्षा कितीतरी हुशार आहात.
तुम्हाला सांगण्यासारखं, शिकवण्यासारखं खरंच माझ्याकडं काही नाही.
मनातले विचार शेअर केलेत. तुमच्या, माझ्या मनातले. एवढंच.
ह्या गोष्टी मनातल्या आहेत. स्वप्नातल्या आहेत.
काही खऱ्या, काही कल्पनेतल्या आहेत.
ह्या नविन आवृत्तीमध्ये तीन गोष्टी वाढविल्या आहेत.
त्यात तुम्ही रमून जावं अशीच इच्छा आहे.
गोष्टी वाचा, चित्र रंगवा!
चलो .... बाय.

सावित्री जगदाळे

## जडण - घडण

—

*खेळ खेळा*
*शिका शाळा*
*वाचन करायला*
*वेळ काढा*

*जडण घडण*
*करू आयुष्याची*
*कोवळीक वाढवू*
*मना मनाची*

*चिंतन मनन*
*करू या विचार*
*अंतर्शक्ती जागवून*
*जगण्याला देऊ आकार*

## सावित्री जगदाळे यांचे प्रकाशित साहित्य

—

**काव्यसंग्रह**
अंकुरात सजला साज
एकट पाखरा
पानमोकळं
गोगलगायीचे पंख

**कथासंग्रह**
सफर मंगळावरची (बाल कुमार कथासंग्रह)
फुटवा
गोष्टीतली बाई
तिचं घर

**कादंबरी**
सहजतेने जगेन मी
दुधाच्या मिशा

## अनुक्रमणिका



१. सफर मंगळावरची / ११
२. तेजस्वी चंद्रबिंब / १६
३. एक शब्द कौतुकाचा / १९
४. पांढरा कावळा / २१
५. खारुताईचं तबलावादन / २६
६. दीप्तीची फजिती / ३१
७. लाल स्वेटर / ३४
८. वाढदिवस / ३७
९. दणकटपणा / ३९
१०. आईला पत्र ल्हिवायचं / ४२
११. भुकेलेल्यांना अन्न, द्यावं / ४५
१२. आई पडते आजारी / ४७
१३. श्रमदानातही मनोरंजन / ५१
१४. वाचाल तर, वाचाल / ५४
१५. चमत्कार / ५७
१६. घोळ्यामेळ्याने राहावं / ६०
१७. अन्न, हे परब्रह्म / ६४
१८. ओसामा बिन लादेनची मुलाखत / ६८
१९. झाडावर चढून खा आंबे / ७५
२०. डिंपी / ७९
२१. बाळ हेलन / ८४
२२. असा मी... तसे ते... / ९१
२३. — › › — / ९५
२४. — › › — / ९७
२५. — › › — / ९९
२६. — › › — / १०१
२७. — › › — / १०३
२८. — › › — / १०५
२९. प्रश्न पडायला पाहिजेत / १०७
३०. विठू वारकरी / ११३
३१. कडबाशिल्प / १२०
३२. सांताक्लॉज / १२४



# सफर मंगळावरची

**मा**नसी आणि सौरभ आज विशेष गंभीर दिसत होते. शेजारी राहणारे हे दोस्त, पण मैत्रिपेक्षा भांडणेच जास्त. दोघांच्या आयांची मैत्री मात्र छान. जिव्हाळ्याची होती. आज दोन्ही पोरांचे आईवडील हवं नको ते बघत होते. अंतराळ प्रवासाची तयारी शेवटच्या टप्प्यात आली. काऊंट डाऊन सुरू झाले. उड्डाणाचा एकेक क्षण जवळ येऊ लागला.

राकेश शर्मा हा पहिला भारतीय अंतराळवीर. त्यानंतर सौरभ व मानसी अंतराळ प्रवासाला निघालेले. साहजिकच दोघांच्या घरचे काळजीत. पण आपल्याच मुलांची निवड झाली म्हणून त्यांना अभिमानही वाटत होता. सौरभची आई गरमगरम थालीपीठ करून वाढत होती. तर मानसीच्या आईनं पुरणपोळी करून आणलेली. रोज चंगळ होती. कडबू, पुलाव, बिर्याणी, छोले-भटुरे, पावभाजी, चाट, कचोरी, सामोसे, असे चटपटीत पदार्थ होतेच. अनारसे, चकली, चिवडा, बेसनलाडू, ह्या पदार्थांची तर दिवाळी होती.



"आई आता लवकर दही-धपाटं खायला मिळणार नाही." सौरभ म्हणाला.

"भरपूर खाऊन घे मग. आठ महिने जिभेवर चव राहायला हवी." मानसी सौरभला खिजवत म्हणाली.

"तुला पुरणपोळी आवडते ना, आपण बरोबर घेऊ म्हणजे दिल्लीपर्यंत तरी पुरेल." सौरभ म्हणाला.

"वा रे ऽऽ वा ऽ सारखं सारखं खाऊन पोट बिघडलं म्हणजे माझं जाणचं रद्द होईल त्याचं काय?"

"तू नाही आलीस तर रोहित येईल. बरं

होईल. तुझ्यापेक्षा तोच निवडला असता तर बरं झालं असतं.''

''फिटनेसमध्येच काय पण प्रत्येक गोष्टीत मीच रोहितच्या पुढे होते, म्हणून माझी निवड झाली. इथे राखीव जागांची सवलत नव्हती बरं.''

मानसी तावातावाने बोलत होती.

''अरे तुमची भांडणं कधी संपायची? तिकडे गेल्यावर कामं करायची सोडून असेच भांडणार का?''

सौरभच्या आईनं असं म्हटल्यावर मात्र दोघेही पटकन् उठले. दोघांचे आई-बाबा दिल्लीपर्यंत येणार होते. पण बाकीचा बालचमू, ओळखीचे लोक, नातेवाईक इथूनच निरोप देणार होते. स्टेशनवर जयदीप, रवी, मिलींद, प्राची, स्वप्ना, अभिजित, अनिल, मनिषा, धैर्यशील, योगिता, सर्वजण आले होते. सर्वांचे डोळे डबडबले होते. जडावलेल्या शब्दात 'बेस्ट ऑफ लक' म्हणून सर्वांनी निरोप दिला.

प्रयोगशाळेत पुन्हा तपासण्या झाल्या. अन्नाचे डबे, औषध, पाणी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऑक्सीजनची नळकांडी वगैरे यानात नीट तपासून घेतले. मानसी-सौरभने अंतराळ पोशाख चढवला. आता मात्र दोघेही ओळखू येत नव्हते. सर्वजण गंभीरपणे तेथील धावपळ, हालचाली, निरखीत होते. दोघांच्या आया डोळ्यातून पाणी ओघळू नये म्हणून अट्टाहासाने मन काबूत ठेवत होत्या. भावनेला आवर घालत होत्या. त्यांची ही पिल्लं तब्बल आठ महिन्यांनी दिसणार होती. सुखरूप परतली तर...

मानसी सौरभने पुन्हा आईबाबांना वाकून नमस्कार करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना ते अंतराळ पोशाखामुळं नीट जमलं नाही. आईबाबांनी त्यांना जवळ घेतलं. ''यशस्वी भव'' ''दिर्घायू भव'' असं पुटपुटत आशीर्वाद दिले. दोघेही यानात बसले. भारतीय शास्त्रज्ञांनी यानाचं नाव 'भगीरथ' असं ठेवलेलं. 'भगीरथ' यानाने उंच झेप घेतली. कानठाळ्या बसवणारा आवाज झाला. अग्निबाणाने 'भगीरथ' यानाला उंच फेकले. 'भगीरथ' आकाशस्थ झाले. सर्वजण टी. व्ही. कडे पळाले. 'भगीरथ' आता फक्त टी. व्ही. वरच दिसणार होतं.

यानाने टेकऑफ घेताना पोटात गोळा उठला. कानाचे दडे बसले थोडा वेळ. मानसी आणि सौरभ भयचकीत होऊन बाहेरचं दृश्य बघत होते. धावते वर्णन करत होते. पृथ्वी आता निळसर दिसू लागली होती. आकाशात सगळीकडे अंधारच होता. तारे, ग्रहगोल लालसर तांबूस दिसत होते. एकीकडे सूर्यही तळपत होता. पण त्याचा प्रकाश मात्र नव्हता. सगळीकडे अंधार, अंधार होता. मंगळावरदेखील फक्त चार तास प्रकाश असतो. नाहीतर फक्त अंधार.

"सौरभ, ठीक होईन ना रे सगळं?"

मानसी काळजीनं म्हणाली. पृथ्वीपासून लांब आल्याचे जाणवून तिला विलक्षण पोकळी जाणवली.

"होईल गं. डोन्ट वरी, बी हॅपी. एन्जॉय कर. पृथ्वीशी संपर्क तर आहेच. लांब आलोय असं वाटतच नाही. थोडं एकटं वाटतयं खरं."

सौरभने तिला धीर दिला. तेवढ्यात ट्रींऽऽग घंटी वाजली. टी. व्ही. वर सर्व प्रयोगशाळा, शास्त्रज्ञ, दोघांचे आईबाबा वगैरे दिसत होते.

"इकडे सर्व ठीक आहे" मानसी म्हणाली.

"तुमची खाण्याची वेळ झाली की तुम्ही खाऊन घ्या. दोघे एकाच वेळेला झोपू नका. एकजण झोपला की दुसऱ्याने जागं राहायचं."

"नाकाला नळकांडे लावायचे विसरू नका." मानसी हसत हसत पलीकडचं वाक्य तोडत म्हणाली.

"बरं ऽ ओ. के. गुडलक" पृथ्वीवरून प्रयोगशाळेतील प्रमुख शास्त्रज्ञ श्री. कृष्णरावांचा आवाज आला.

४ डिसेंबर १९९६ ला अमेरिकेने 'मार्स पाथ फाईंडर' मंगळावर पाठवले होते. ते ४ जुलै १९९७ ला मंगळावर पोहोचले. तेव्हा सर्व दुनिया विस्फारीत नजरेनं ती मंगळावर फिरणारी बग्गी पाहात होते. आता तर प्रत्यक्ष मानवाचं पहिलं पाऊल मंगळावर पडणार होतं. भारताने तयार केलेले 'भगीरथ' मात्र पाच महिन्यात मंगळावर पोहचले. पावसाळ्यात थोडाफार पृथ्वीशी संपर्क तुटला तरी घाबरण्याचे काही कारण नाही. असं विभागप्रमुख शास्त्रज्ञ श्री. कृष्णराव यांनी सर्वांना सांगितलेले.

अंतराळ प्रवासात एकदा मानसीच्या कानातून मळाचे खडे बाहेर आले. मानसी घाबरली. पण सौरभ म्हणाला, "अगं ते टेक ऑफ घेताना कानठळ्या बसून कानाला दडे बसले होते ना. त्यामुळे प्रसरण आकुंचन वगैरे होऊन मळ मोकळा झाला असेल. मोकळा म्हणून आला बाहेर. त्यात घाबरण्यासारखं कायेय?"

अंतराळात गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे चालताना हवेत तरंगायला व्हायचं. खाताना घास पटकन् तोंडात जाण्याऐवजी तरंगायचाच. हवेत म्हातारी (शेवरीचं बी)फिरते तसा घास फिरायचा. पाण्याचा थेंबदेखील तरंगायचा. दोघांना मजा वाटायची.

मानसी-सौरभला घेऊन भगीरथ पाच महिन्यांनी मंगळावर उतरले. तिथे गेल्यावर आधी कोणी उतरायचे म्हणून दोघांचा वाद सुरू झाला. शेवटी पृथ्वीशी संपर्क साधल्यावर संदेश मिळाला, यानाला दोन दरवाजे आहेत. दोन्ही बाजूंनी दोघं

एकदम उतरू शकता. मंगळावर पाऊल ठेवताच दोघांना अतिशय आनंद झाला. दोघेही जोरजोरात खिदळू लागले. उड्या मारू लागले. 'हाय रब्बा, हाय रब्बा' असं म्हणत हात उंचावून नाचू लागले. त्यामुळे सौरभचा मास्क सरकला. त्याला गुदमरल्यासारखे होऊ लागले. पटकन् मानसीने त्याचा मास्क चेहऱ्यावर व्यवस्थित बसवला. सौरभ पुन्हा श्वासोच्छवास करू लागला. इकडे पृथ्वीवर ते दृश्य पाहून सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. पृथ्वीवरून त्यांना संदेश पाठवण्यात आला.

"उगीच वेळ घालवू नका. फक्त दोन तास मंगळावर काढायचेत. तुम्ही मंगळावर पहिले पाऊल ठेवलेत. म्हणून प्रथम तुमचे अभिनंदन. मानवाचे पहिले पाऊल मंगळावर पडले जगात तुमचं नाव अमर राहील. आता कामाला सुरुवात करा."

दोघांनी आनंदाच्या उधाणाला आवर घातला. तेथील लालसर माती, गोटे, गोळा करण्यास सुरुवात केली. फोटो घेतले. काही ठिकाणी उकरून पाहिले पण फारसा उपयोग झाला नाही. दीड तास झाला. पृथ्वीवरून काहीच कसा संदेश येईना म्हणून सौरभने पाहिले, तर सर्व यंत्रणा ठप्प. अति पावसामुळे संपर्क तुटलेला. आता निघायची वेळ झाली. दोघेही डोळ्यात जीव आणून मंगळभूमी पाहात होते.

"हे मंगळग्रहा तू तर साधा दगडमातीचाच आहेस. अगदी पृथ्वीसारखाच. तरी तुला पृथ्वीवासी का घाबरतात? आम्ही सर्वांना सांगू मंगळ पूर्वी पृथ्वीप्रमाणेच होता. उष्णतेमुळे किंवा अन्य कारणामुळे येथील जीवसृष्टी नष्ट झालीय. पृथ्वीवरही प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग इत्यादींचा प्रचंड धोका वाढलाय. पृथ्वी उष्ण व्हायला लागलीय. उष्णतेमुळे बर्फ वितळले तर सगळीकडे पाणीच पाणी होईल. मग पृथ्वीवरीलही जीवसृष्टी नष्ट होईल. पृथ्वीवरचे पर्यावरण सांभाळायला हवे नाहीतर पृथ्वीचा मंगळ होईल. मंगळग्रहा आता मात्र तुझी भीती वाटत नाही. भीती वाटते पृथ्वीच्या भविष्याची. फार धोक्यात आहे रे पृथ्वी."

मानसी मंगळाला उद्देशून भावुकपणे बोलत होती.

"भाषणबाजी बंद करून राणीसाहेबांनी लवकर रथस्थ व्हावे. आपले दोन तास संपले आहेत."

असे म्हणून सौरभ यानात चढला. तेवढ्यात ठप्प झालेली यंत्रणा सुरू होऊन पृथ्वीवरचे संदेश ऐकवू लागली. सौरभही संदेश देऊ लागला. यान सुरू झाले. त्या आवाजाने मानसी भानावर आली. आणि लगबगीने यानात चढू लागली. पण तिचा हात निसटला, न् भगीरथ वर उचलले.

"मानसीऽ, मानसी...ऽ"

असं म्हणत सौरभ ओरडत होता. आईने हलवून सौरभला जागे करत विचारले.

"अरे असा काय मानसीला हाका मारतोयस? स्वप्न पडले की काय?"

"अगं ती मंगळावरच राहिली की, वेंधळी कुठली? लवकर चढ म्हटलं तरी इकडे तिकडे बघतेय."

सौरभ बडबडत घाम पुसत होता.

"कोण राहिलं मंगळावर? जागा झालास का? उठ बघू."

आईने त्याला उठविले. सौरभ घाबरलेला. इकडे तिकडे बघत होता त्याच्या लक्षात आलं आपण यानात नसून घरातच आहोत. आपल्या झोपण्याच्या पलंगावरच. आईपण जवळच बसलीय.. सौरभला एकदम सुरक्षित वाटले. तो आईच्या कुशीत शिरला. धडधडतं काळीज शांत झालं. स्वप्नातील मंगळ, यान, अंतराळ, ती प्रयोगशाळा, त्यातील शास्त्रज्ञ असं बरंच त्याला आठवू लागलं.

"चल दात घास"

कुशीतून बाजूला करत आई म्हणाली.

"आई मोठा झाल्यावर, मी नक्की जाणार अंतराळात"

"जा की. पण त्यासाठी आतापासून तयारी करायला हवी."

"कसली तयारी?"

"पोहणे, योगा, प्राणायाम, ध्यान वगैरे. सध्या एवढं तरी कर. पाया तरी पक्का होईल त्यामुळे."

"बापरे ऽ मग शाळा, अभ्यास कधी व्हायचा?"

"त्यासाठी लवकर उठायला हवं. चला."

"आई, उद्या मला लवकर उठव. बाबांच्याबरोबर मी पण जाईन पळायला."

"पळणं तर हवंच. पण पोहायला चांगलंच यायला पाहिजे. कारण अंतराळात गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे पोहल्यासारखं तरंगायला होतं."

"खरंच की, मी पोहण्याच्या तलावापर्यंत, पळत जाऊन, पोहण्याचा सराव करीन, म्हणजे दोन दोन व्यायाम एकाच वेळी. हो की नय. एका दगडात दोन पक्षी."

"माझं शहाणं बाळं" असं म्हणत आईनं त्याची पापी घेतली.

* * *

# तेजस्वी चंद्रबिंब

गॅलरीतून आई ओरडली, "अरे, आज चतुर्दशी, बघा चंद्र उगवला."

ऋतुजा आणि हृषीकेश धावले.

"अरे बापरे केवढा मोठ्ठा आहे चंद्र!"

हृषीकेश आनंदाने ओरडला.

"आज गच्चीवर जेवायला जायचं?" ऋतुजा म्हणाली.

"हो जाऊ या की, मी लवकर आवरते स्वयंपाक."

आईनं भराभर स्वयंपाक केला. आठ वाजता गच्चीवर चटई अंथरूण सर्वजण बसले. लाईट लावला नाही. नेहमीच पावसाळा संपला की, ऋतुजाच्या आईला चांदण्यात जेवणाचं वेड लागतं. वरखाली धावपळ हौसेनं करते. आजचं चांदणं तर फारच तेजस्वी वाटत होतं. आकाश निरभ्र होतं. थंडगार मार्गशीर्षातली हवा. जेवल्यावर आणखी थंडी वाजते. म्हणून सगळ्यांनी स्वेटर घातलेले.

"आज चतुर्दशी असून चंद्र किती मोठा दिसतोय. अगदी पौर्णिमेच्या चंद्रासारखा." हृषीकेश म्हणाला.

"अरे उद्या दत्तजयंतीची पौर्णिमा नं, म्हणून असेल." आईने हृषीच्या ताटात चपाती वाढत म्हणलं.

"मला छोलेचा फक्त रस्सा दे मस्त झालाय." बाबा म्हणाले.

"गच्चीवर जेवणाला नेहमीच चव येते." आई.

"आपण उद्या पण यायचं का गच्चीवर जेवायला?" ऋतुजा म्हणाली.

"जरूर! उद्याची पौर्णिमा तर फार वेगळी आहे." बाबा म्हणाले.

"कसं काय ?" हृषीकेश म्हणाला.


"दत्तजयंती आहे ना म्हणून." आई.

"ते कारण नाही. दत्तजयंती दरवर्षीच येते. कारण वेगळंच आहे."

"कुठलं हो बाबा?" हृषीकेश म्हणाला.

सगळ्यांनीच कान टवकारले. बाबा सांगू लागले.

"उद्या चंद्र पृथ्वीच्या जवळ येणार आहे. उद्या चंद्र आणि पृथ्वी यांच्यामध्ये



नेहमीपेक्षा कमीत कमी अंतर आहे.''

''किती?''

''तीन लाख, छपन्न हजार, सातशे त्रेपन्न किलोमीटर एवढेच आहे.''

''नेहमी किती असतं?'' ऋतुजा म्हणाली.

''तसं अंतर कमी जास्त होते. पण उद्याचं खूपच कमी आहे. त्यामुळे नेहमीच्या चंद्रबिंबापेक्षा उद्याचे चंद्रबिंब चौदा टक्के मोठे दिसणार आहे. चंद्राचा परावर्तीत होणारा प्रकाश सात टक्के जास्त असेल. म्हणजेच उद्याचे चांदणे यापेक्षाही तेजस्वी असेल.''

बाबा असे सांगताना ऋतुजा, हृषीकेश, आई जेवायचं थांबवून ऐकत होते. जरा वेळानं आई म्हणाली.

''चला जेवा, खा पटपट, गार झालं सगळं.''

''आजचं जेवणही छान अन् गप्पाही छान झाल्या.'' बाबा म्हणाले.

''हळूँ नवीन माहिती मिळाली की, बौद्धिक भूक भागते.'' आई म्हणाली.

''उद्या पण यायचं का जेवायला ?'' ऋतुजा म्हणाली.

''मघाशीच ठरलंय ते. मी रोहन, केतन निखील, श्रीला बोलवू का.'' हृषीकेश म्हणाला.

''मी पण स्वप्ना, प्राचीला बोलावते.''

''बोलवा की, मी भोपळ्याच्या घाऱ्या, काळ्या वाटाण्याची उसळ करते. गार झालं तरी चालेल.'' आई म्हणाली.

"मला मात्र भाकरी कालवणच कर." बाबा म्हणाले.

"हो, ठेचा पण करते. एवढ्या वर्षांनी टिपूर चांदणं पडणार तर त्याची मजा सगळ्यांनी मिळून घेऊ या."

"किती दिवसांनी हो बाबा असा चंद्र जवळ आलाय." ऋतुजा म्हणाली.

"तब्बल एकशे तेहतीस वर्षांनी हा योग आलाय." बाबांनी सांगितले.

"होऽ ?" ऋतुजा ओठांचा चंबू करून ओरडली.

"मग तर उद्या गच्चीवर येण्याची संधी अजिबात सोडायची नाही."

भांड्यांची आवराआवर करत आई म्हणाली.

ऋतुजा आणि हृषीकेश यांनी आपल्या मित्रमंडळींना आणि त्यांच्या आईबाबांना गच्चीवर जेवायला बोलावले. बऱ्याच जणांकडे गच्ची होती तरी, एकत्र जेवणाचा आनंद, तोही अपूर्व अशा तेजस्वी चांदण्यात लुटायचे ठरविले. त्या दोघांनी शाळेतल्या सोबत्यांना देखील तेजस्वी चांदण्याची गोष्ट सांगितली.

मार्गशीर्ष पौर्णिमेला ऋतुजा, हृषीकेशच्या गच्चीवर सगळे जेवायला जमले. पण आभाळ ढगांनी गच्च भरून आलेले. लाईट लावूनच जेवावे लागले. खूप मजा आली पावसाळा सोडून दर पौर्णिमेच्या जवळच्या रविवारी. कुणाच्या तरी गच्चीवर जेवायचं. असं सगळे जण बोलत होते. कुणी कविता ऐकवत होते. पण आभाळ मोकळे होण्याचे काही चिन्ह दिसेना.

"हे काय पावसाळ्याचे दिवस आहेत का? आपलंच दुर्भाग्य म्हणायचं न् काय!" असे म्हणत सगळे हळहळत गच्चीवरून उतरले.

दुसऱ्या दिवशी पहाटे ऋतुजाचा शिकवणीचा वर्ग असल्यामुळे ती लवकर उठलेली. हृषीकेशला क्रिकेट क्लबला लवकर जायचं असल्यामुळे तोही उठलेला. ऋतुजाने पश्चिमेकडील खिडकी उघडली तर तिला भले मोठ्ठे चंद्रबिंब दिसले. तेजस्वी चंद्रबिंब! तिने आईबाबांना गच्चीवर चलण्याची घाई केली. पहाटेची थंड हवा. निरभ्र आकाश न् मावळतीकडील भले मोठ्ठे तेजस्वी चंद्रबिंब. भान हरपून पाहाताना सर्वांची थंडी पळाली. निसर्गाचा चमत्कार पाहाताना मन भरून आले होते.

"सरत्या सहस्त्रकातील शेवटचे तेजस्वी चंद्रबिंब! आणि आपल्या आयुष्यातीलही!" बाबा पुटपुटले.

* * *

# एक शब्द कौतुकाचा

हृषीकेशला जिमखाना कोचिंग क्लासमध्ये घातलेले. बामणे सर जीव तोडून सराव करून घ्यायचे. पहिल्याच रविवारी जास्त वेळ सराव घेतला. हृषीकेशचे अंग एवढे दुखायला लागले की बस, श्वास घेताना छातीच्या फासळ्या दुखू लागल्या. कणकणी, बारीक ताप यामुळे शाळा बुडवून झोपून राहिला. दुसऱ्या दिवशी बरं वाटल्यावर शाळेत जाऊ लागला आणि क्रिकेटच्या सरावालाही तसाच. एकदा लंगडतच आला. घाबरतच आईने विचारले, ''काय झाले रे''

''गुडघ्याला चेंडू लागला.'' हृषीकेश विव्हळत म्हणाला.

''मग एवढं काय होतंय?'' ऋतुजा म्हणाली.

''तुला काय माहित क्रिकेटचा चेंडू कसला दगडासारखा असतोय. अया ई ऽ'' करत हृषी म्हणाला.

''गरम पाणी ओत जरा गुडघ्यावर, आंघोळ करताना. म्हणजे बरं वाटेल.'' आईनं सांगितल. हृषीकेशने सांगितल्याप्रमाणे केलं. तरी बरं वाटेना. गुडघा दुखतच होता.

''आई शाळेत कसं गं जाऊ?''

''बरं राहू दे आजच्या दिवस.'' आईची परवागनी मिळाली. ''पण घरात त्या त्या विषयांच्या तासांचा अभ्यास कर.''

चालता फिरता येत नव्हतं, त्यामुळे त्यानं दिवसभर अभ्यास केला. गुडघ्याला आराम पडला की पुन्हा शाळा सुरू झालीच पण क्रिकेटचा सरावदेखील सुरूच राहिला. सकाळी लवकर उठून दिगूच्या घरी जायचा. दिगूचं घर मैदानापासून जवळ होते. त्याच्याकडे सायकल ठेवून दोघं चालत मैदानावर जायचे. सराव करून घरी आले की शाळेत जायची तयारी करत करत क्रिकेटच्याच गप्पा करत. असा क्रिकेटमय झालेला हृषीकेश.

एके दिवशी, पुन्हा एकदा बोटाला दुखापत घेऊनच हृषीकेश घरी आला. झेल घेताना मधल्या बोटाला मार लागलेला. हृषीकेश रडतच घरात आला. लागल्यापासून घरी येईपर्यंत कसेबसे आवरून धरलेले अश्रू डोळ्यावाटे पाझरू लागले.

''अरे, असंच असतं. आमचा हॉकीचा सराव चालायचा तेव्हा तर आम्हाला

हलायला यायचं नाही.'' बाबा सांगू लागले. ''बघ माझ्या कपाळावर अजून व्रण आहे हॉकीस्टिकचा. आमचे तर सैनिक स्कूल. कडक शिस्तीत सराव सुरू असायचा. मी कॅप्टन होतो आमच्या टीमचा. हॉकीस्टीकचा मार खाल्लाय न् दिलाय पण.''

तरी त्याचा हुंदका कमी होईना. आई सकाळच्या कामाच्या गडबडीत होती. तिनं त्याच्या बोटाला लागलंय एवढंच ऐकलेलं. बाबा ऑफीसला गेले. हृषीकेश आईला म्हणाला, ''आई, पेन हातात धरलं तरी दुखतंय. नुसता धक्का लागला तरी दुखतय, शाळेत ज़ाऊन काय करू? ''

आई वैतागून गेली. त्याला म्हणाली. ''तुझं जर रोज असंच चाललं तर क्रिकेट कोचिंग बंद कर बघू. सारखी काय शाळा बुडवतोस? जसा काय सचिन तेंडुलकरच होणार आहेस. बघू बोट?''

आईने बोट बघितलं तर ते काळं निळं पडून पुढंच पेर सुजलं होतं. मग काय त्याला पुन्हा घरी राहण्याची परवानगी मिळाली. पण दिवसभर वाचन करून घेतले. सकाळी उठून पुन्हा लवकर तयार होऊन निघाला.

''अरे तुझं बोट दुखतयं ना?'' आई म्हणाली.

''कमी झालंय आता.'' शूजची लेस आवळत हृषी म्हणाला.

''जातो गं आई.'' असं म्हणत क्रिकेटचं किट घेऊन निघाला.

''आज धड ये रे.'' आई म्हणाली.

पण आईचं बोलणं ऐकायला तो घरात होताच कुठे, सायकल घेऊन केव्हाच फाटकाबाहेर गेला.

खेळून आल्यावर स्वारी अगदी खूश होती.

''बाबा, माझा बॉल एकसारखा स्पीन व्हायचा. सर तर प्रत्येक बॉलला 'वेल बॉल' म्हणायचे.''

''अरे पण बोट दुखत होतं तरी कसा काय बॉलिंग करत होतास?'' बाबा म्हणाले.

''राहिलं बोट.'' असं म्हणत त्यानं कोपऱ्यात किट ठेवले आणि झटपट आवरून शाळेला निघाला.

सरांनी केलेल्या कौतुकांनी हृषीकेशची बोटदुखी कुठल्या कुठं पळाली. क्रिकेट खेळताना बामणे सर त्याचं खूप कौतुक करतात. त्यामुळं हृषीकेश हल्ली खूश असतो. 'शब्द एक कौतुकाचा, वर्षाव मग अभ्यासाचा.' हे त्याच्या बाबतीत खरं होऊ लागलंय. हृषीकेश अभ्यासाकडे पूर्वीपेक्षा जास्त लक्ष देऊ लागला.

***

# पांढरा कावळा

एक बगळा आणि एक कावळा दोघे जिवलग दोस्त होते. त्यांच्या दोस्तीकडे पाहून सगळ्यांना आश्चर्य वाटायचं. 'या कावळ्याबगळ्याची जोडी कशी काय जमली बुवा?'' अशीच सर्वजण चर्चा करीत.

नदीच्या काठावर भरपूर झाडे होती. तिथली फळे खायला कावळा यायचा. निंबोणी बोरं, चिंचा अशी. ऋतुप्रमाणे मिळणारी फळं त्यांना मिळायची. एके दिवशी बगळ्याला खूप भूक लागली. नदीत कारखान्यातून सोडलेल्या मळीने मासेही जगत नव्हते. बगळ्याला उपास घडू लागले. मग त्यादिवशी कावळ्याला बगळा म्हणाला,

''तुझं बरं आहे बाबा, फळं खाल्ली तरी भागतं.''

''तू पण ये ना वर, फळं खायला. बघ किती भारी लागतात. खाऊन तर बघं.''

बगळा वरती गेला. आंबट तोंड करीत चिंचा, बोरं खाऊ लागला. कावळा कधी कधी पोळी, भाकरी, चपातीचा तुकडा आणीत असे. तेही बगळा खायचा. असे त्याचे दिवस चालले होते. असेच एकदा पोट भरल्यावर दोघे झाडाच्या फांदीवर गप्पा मारीत बसले होते. तेव्हा त्याला कावळा म्हणाला, ''मी ही तुझ्यासारखा पांढराशुभ्र असतो तर किती छान झाले असते.''

''कुणी सांगितलं तुला, काळा



रंग चांगला दिसत नाही ते? माणसांना तर काळा रंग फार आवडतो. म्हणून तर तू माणसांच्या लहान मुलांचा आवडता आहेस. तुझ्यावर कितीतरी गाणी आहेत. घरावर कावळा ओरडला तर सासुरवाशिणीला वाटतं तिच्या माहेरचं कोणीतरी नक्की येणार. म्हणून ती तुझ्यावर केवढी खूश असते. तुला माहितेय का? आता तर माणूस केस पांढरे व्हायला लागले की काळे करतो.'' बगळा म्हणाला.

''पण माणसाला कातडीचा रंग मात्र गोरा किंवा पांढराच हवा असतो. काळ्या पोरींची लग्नेही लवकर ठरत नाहीत.'' कावळा म्हणाला.

''अरे पण असाच तू छान दिसतोस. घाण लागली तरी लक्षात येत नाही. हा फायदा नाही का?'' बगळा.

'' अरे मी शिवलेला चालत नाही माणसाला. विटाळ होतो. काळा आहे म्हणूनच ना?''

''अरे आपल्यात तरी कुठे चालते, माणसाने शिवलेले?''

''ते काय न्हाय मी बघ उद्या माणसाचा साबण आणून लावतोच अंगाला. साबणाने अंग धुतो म्हणजे बघ, गोरा होतो की न्हाय.'' असं म्हणत काव, काव करत कावळा उडून गेला. त्याने माणसाच्या वस्तीत गेल्यावर, एका मोरीतला साबणाचा तुकडा चोचीत पकडून आणला. नदीत अंग भिजवून बगळ्याला सांगितले.

''आता लाव पंखांना भरपूर साबण.''

बगळ्याने त्याला साबण लावल्यावर खूप फेस झाला. दोघांना फार मजा वाटली. आता काळेपणा नक्की जाईल असं वाटलं. पण कशाचं काय, अंग धुतल्यावर बघितलं तर, कावळ्याच्या पंखांचा काळेपणा आणखीनच चमकायला लागला. कावळा हिरमुसला.

''अरे, खरंच तू खूप चांगला दिसतोयस. तुला सांगू, निसर्गाकडून मिळालेले रंगरूप परिस्थितीतला अनुरूप असते. उगाच बदल करून त्यात ढवळाढवळ करू नये, माणसासारखी. त्यामुळे पर्यावरणाचा तोल बिघडतो.'' बगळा म्हणाला.

''माणूस किती का घाण करेना. ते चालतं सगळ्यांना. मी फक्त गोरा व्हावं म्हणतोय, तर लगेच उपदेशाचे औषध पाज. तुला एवढी बुद्धी आहे तर काहीतरी उपाय शोधून काढ ना. मला जबरदस्त इच्छा आहे गोरं होण्याची. ही इच्छा अपुरी राहिली ना तर माझ्या पिंडाला माणूस शिवणार नाही.''

''तुझा अजून असल्या गोष्टीवर विश्वास आहे?''

''माणसाने ठेवला तर चालतो वाटतं?''

''एकीकडे माणूस बुद्धीच्या जोरावर काय, काय मिळवत चाललाय. दुसरीकडे असल्या फालतू अंधश्रद्धा पण जोपासतो आहे. त्यामुळे त्यांच्यातल्या त्यांच्यांत हेवेदावे, द्वेष, मत्सर वाढत चाललाय. लोभ, मोह वाढताहेत. मग त्यामुळं शांती मिळत नाही.''

''मला काय करायचंय त्यांच्या या गोष्टीचं. मला गोरं होण्याची तीव्र इच्छा आहे. एवढंच.''

''तुला माहितीय, अशा तीव्र इच्छेतूनच किंवा गरजेतून माणसाने नवनवीन शोध लावलेत.''

''ए, बगळ्या तुला पण माझ्यापेक्षा जरा जास्तच बुद्धी आहे ना. मग लाव ना माझ्यासाठी हा शोध. तू खरा मित्र ना माझा?''

''असा लावतो म्हणून थोडाच शोध लागतो?''

''प्रयत्न तरी कर.''

''हरकत नाही. प्रयत्नाना यश मिळू शकतं.''

असेच नेहमीसारखे दिवस जात होते. कावळा आणि बगळा मात्र सतत विचार करत होते.

एके दिवशी बगळा एका पायावर उभा राहिलेला, डोळे झाकून. कावळा म्हणाला,

''अरे, असा काय उभा राहिलायस, आता काय मासे मिळणारेत का?''

''मी तपश्चर्या करतोय.'' बगळा म्हणाला.

''कशासाठी?''

''तू गोरा, पांढराशुभ्र होण्यासाठी देवाकडे वर मागणारेय.''

''एक तप म्हणजे किती वर्ष माहितीय का तुला? तब्बल बारा वर्ष. तोवर आपलं आयुष्य संपून जाईल.''

''मग काय करायचं?''

''त्यापेक्षा आपण प्रयोग करून वेगवेगळे साबण शोधून काढू.'' कावळ्याने डोके चालवले.

''तू कधी, कधी फारच डोकं असल्यासारखं बोलतोस.''

''मऽग. माणसाचं उष्टंखरकटं खाऊन माझ्या पण मेंदूत थोडीफार वाढ झालीच असेल की.'' कावळा ऐटीत म्हणाला.

"बरं. वडाच्या ढोलीत आपण प्रयोग करू." बगळा म्हणाला.

कावळा काहीबाही उचलून आणायचा माणसाच्या वस्तीतून. बगळा त्यांच्यावर प्रयोग करायचा. पानांच्या द्रोणातून मिश्रण कालवून ठेवायचा. कावळा आला की, पंखाच्या थोड्या भागावर लावायचा. थोडा वेळ ठेवून धुवायचा. कावळ्यानं आणलेलं उष्टं खरकटं खाऊन प्रयोग करत राहायचा. कावळा मोकळा फिरत राहिल्यामुळे निरोगी राहिला. बगळा मात्र दिवसेंदिवस खंगत चालला. सतत प्रयोग करत राहिल्यामुळे त्याला मासे पकडून खायला वेळ मिळेना. आपल्या मित्रासाठी आपण औषध, लेप तयार करूच. असा त्याने निश्चय केला. स्वत:च्या खाण्यापिण्याकडे लक्ष देईना. कावळा काही आणून द्यायचा पण बगळा खायचाच नाही. कावळ्याचं ऐकायचा नाही.

एकदा त्यानं पांढुरकं मिश्रण तयार करून कावळ्याच्या सगळ्या पंखांना लावलं. खोकत खोकत लावलं.

"बगळ्या, तुझा खोकला फारच वाढलाय. मी पटकन औषध घेऊन येतो." कावळा म्हणाला. "नको, नको असा लेप लावून उन्हातान्हात फिरू नकोस. तासाभरानं आंघोळ करूनच जा." असं म्हणून बगळा तिथंच पडून राहिला. तासाभरानं कावळा नदीत आंघोळ करायला गेला. जसजसा लेप धुवून जाईल तसतसा पंखांचा रंग शुभ्र उजळून निघू लागला. कावळ्याला अत्यानंद झाला. त्याला बगळ्याबद्दल खूप कृतज्ञता वाटली. आधी त्याला औषध आणि काहीतरी छानसं खायला आणून मगच त्याच्याकडं जाऊयात. असा विचार करत कावळा माणसाच्या वस्तीत गेला. इकडं बगळ्याला खोकल्यानं बेजार केलं. म्हणून तो ढोलीतून खाली उतरला. उडायला पंखात शक्तीच नव्हती. झाडाच्या बुंध्याशेजारी प्रयोगाच्या पदार्थांची घाण पडलेली. त्या साचलेल्या घाणीतून कसाबसा बाजूला बसला. खोकून, खोकून जीव हैराण झालेला. त्याला पाणी हवं होतं. पण नदीपर्यंत जाण्याएवढं त्राण नव्हतं. कावळा कसा येईना त्याला लावलेल्या लेपाचं काय झालं असावं? काहीच कळेना. बगळा पाण्यावाचून तडफडत राहिला. घाणीत पडल्यामुळं त्यांचे पंख काळे पडले. अंगाची आग होऊ लागली. घशाला कोरड पडली. पाण्याशिवाय त्याचा जीव निघून गेला.

कावळा बगळ्यासाठी शोधून शोधून औषध आणि खाणं घेऊन आला. कावळ्याला वाटलं बगळा आता आपल्याला ओळखणारच नाही. त्याची गंमत करायची. गुपचूप ढोलीत गेला. तर तिथं बगळा नव्हताच. कावळ्यानं इकडं

तिकडं बघितलं. कावकाव करत आपल्या मित्राला हाक मारली. पण सगळीकडं शांतातच होती. कुठं गेला असेल? या विचाराने तो बाहेर आला तर झाडाच्या बुंध्यात रासायनिक पदार्थांची घाण पडलेली, त्यातच काळपट बगळा पडलेला. आधी तर ओळखायलाच आला नाही, पण कावळ्याने नीट निरखून बघितलं तर तो आपला मित्रच आहे. त्याने कावकाव करत त्याला हाक मारली, पण बगळ्याचा जीव केव्हाच निघून गेला होता. कावळा दु:खाने कावकाव ओरडू लागला. त्याला अतिशय वाईट वाटले. मरण्याआधी त्याने आपले पांढरे झालेले पंख तरी बघायला हवे होते. आपण आधी बगळ्याला पंख दाखवून मगच औषध आणायला जायला हवं होतं. असा कसा आपल्याला सोडून गेला? कावळा सैरभैर झाला. कावकाव करीत गावभर ओरडत फिरू लागला.

पांढरा शुभ्र पक्षी कावकाव कसा काय करतोय? म्हणून माणसं बघू लागली तर हा कावळ्याच्याच आकाराचा पक्षी, कावळ्यासारखाच दिसतोय. अन् कावकाव करतोय. माणसानं नीट न्याहाळलं तर तो कावळाच होता. माणसाला पांढराशुभ्र कावळा बघून खूप आनंद झाला. त्याने कावळ्याला पकडून मोठ्या पक्षीसंग्रहालयात ठेवलं. कावळ्याला खूप पश्चात्ताप झाला. पांढऱ्या, गोऱ्या रंगापायी कावळ्याने चांगला मित्र आणि स्वत:चे स्वातंत्र्य गमावलं होतं.



# खारूताईचं तबलावादन

एक होती खारूताई. सारखी इकडून तिकडे सरसर फिरे. फिरून फिरून कंटाळा आला की, झाडावर बसे. तेव्हा ती विचार करीत असे. तिला वाटे, काय हे आपले आयुष्य सारखं सरसर झाडावर, झरझर खाली. काही शोधायचं. खायचं की झालं. कंटाळा आलाय असल्या आयुष्याचा. काहीतरी वेगळं केलं पाहिजे... पण काय केलं म्हणजे बरं वाटेल? असा ती सारखा विचार करू लागली.

एके दिवशी एका बंगल्याच्या बाहेर फिरत असताना, तिला भरपूर खाऊ मिळाला. खाऊ खाताखाता खारूताईचं लक्ष आतील आवाजाकडे गेले. खारूताईने खिडकीतून डोकावून पाहिले. तर तिथे मंकू (माकड) तबला वाजवत बसलेला. खारूताईला फारच आश्चर्य वाटलं. या मंकूला एवढा चांगला तबला कसा काय वाजवायला येतो? हूंऽ तरी हल्ली हा मंक्या कोणाच्या खोड्या काढत नाही. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत नाही. त्याचे रहस्य हे आहे तर! मंकू तबला मात्र सुंदर वाजवत होता. कानाला गोड वाटत होतं. खारुताई मग रोज त्याचं तबलावादन ऐकण्यासाठी खिडकीत येऊन बसू लागली. बंगला जुना मोडकळीला आलेला. तिथं माणसं कुणी राहातच नव्हती. त्यामुळे सगळे पक्षी, प्राणी तिथं येऊ शकत होते. खारुताई तर आधीच धिटुकली, त्यात मंकूच्या ओळखीची. मग काय ती त्याच्या समोरच येऊन बसू लागली, खारुताईंचा वेळ छान जाऊ लागला. एकदा मंकू खारुताईला म्हणाला,

"तू का नाही तबला वाजवायला शिकत?"

"अरे, मंक्या मला रे कसा येईल, तबला वाजवायला?"

"शिकलं की सगळं येतं."

"छे रे बाबा, उगीच काय, प्राणी जग नावं ठेवील."

"नावं ठेवायचा काय संबंध? ही काय माणसं आहेत का, नावं ठेवायला? आपल्या प्राणी जगात कोणी कोणाला नावं ठेवत नाहीत. सगळे आपल्याला हवं तसं जगतात. चल ये बघू. मी सांगतो तुला कसं वाजवायचं ते."

"नको बाबा, मलाच घाबरायला होतं. जमतंय की नाय...."

"सगळं जमतं. शिकलं की सगळं येतं. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' ही माणसांची म्हण मी खूपदा ऐकलीय. माणसं तर किती काय करतात."

"तू म्हणतोयस तर शिकेन. पण फी काय द्यायची रे?"

"फी देण्याचा प्रकार माणसांत असतो."

"माणसाप्रमाणं शिकायचं तर फुकट कशाला?"

"अगं ज्ञान हे दान करण्याची गोष्ट आहे, विकायची नाही."

"तू तर माणसासारखाच बोलायला लागलास. पण माणसं आता फुकट काहीच शिकवत नाहीत."

"तुला बरंच माहितीये की माणसांबद्दल?"

"मग, माणसांचं प्रमाणच एवढं वाढलंय आता, कुठही गेलं तरी माणसं दिसतातच आणि त्यांचं बोलणं कानावर पडतंच."

"तुला आणावसं वाटलं तर फळं आणत जा."

"चालेल. आणखी कोण येतं का रे?"

"हो सकाळी गोटू करडू येतं. आणखी चिंकूससूल्या, मिठूपोपट येतात."

"मिठू कसा रे वाजवतो तबला?"

"तो तबला नाही वाजवत. ती बाजाची पेटीये ना ती चोचीनं वाजवतो. चोचीनं तबला वाजवला तर फुटेलच."

"ते काय फी देतात का रे, की नुसताच टाइमपास?"



"फळं आणतात की."

"तुझं पोट भरत असेल मग. तरीच झाडावरून उड्या मारताना दिसत नाहीस. ऐदी होशील माणसासारखा."

"शिकवण्यातच वेळ जातो माझा. फळं कधी शोधू? मी काय मागत नाही. तेच देतात आणून. तू पण आता बळेच नाही का फी देते म्हणालीस? तुझं हे बरंय दोन तोंडांनी म्हांडूळासारखं बोलायचं."

"चुकलं बाबा माफ कर. चल शिकव मला तबला."

"आता राहूं दे मूडच गेला माझा. उद्या सकाळी ये."

"ये रागावू नकोस. रोज आयती फळं मिळाली तर उड्याच मारायचा विसरणार नाहीस का तू, म्हणून मी तसं म्हटलं. व्यायाम न करता आयतं बसून खाल्लं तर आजारी पडणार नाहीस का?"

"तू तर ना असा डोक्याला ताप देतेस बघ. माझं अन्न मी शोधून खाईन."

ठरल्याप्रमाणे खारुताई, चिंकू, मिठू, गोटू, हे मंकूकडे सकाळची न्याहरी आटोपून शिकायला यायचे. उन्हं उतरली की, सगळेजण पुन्हा आपले अन्न शोधायला बाहेर पडत.

खारुताईचे हात तयार व्हायलाच दोन तीन दिवस गेले. ठराविक कोनात हात ठेवून फक्त बोटांनी वाजवणं फारच अवघड गोष्ट. तिला तर हातही नीट ठेवता येईना. हात व्यवस्थित ठेवला तर, तबल्यातून आवाजच निघायचा नाही. पण सरावाने शिकली खारुताई. आधी आवाजच येत नव्हता, आता जरा जरा आवाज निघू लागला. मंकून पहिल्यांदा दादरा तालाच्या मात्रा सांगितल्या. मग ते बोल कसे वाजवायचे ते शिकवले.

**'धा धी ना,**
**धा ती ना,'**

हे बोल तिनं आधी पाठ केलं. नंतर तबल्यावर वाजवू लागली. हळूहळू प्रगती होऊ लागली. खारुताईचा दिवस आता पटकन संपायचा. ती बसेल तिथं. जमिनीवर, झाडाच्या फांदीवर तबल्यातील बोल वाजवू लागली. बोल जरी नीट वाजत नसले तरी चुकत नव्हते. एकच ताल वाजवायचा तिला कंटाळा येऊ लागला. मंकूने मग झपताल तिला शिकवला.

**'धी ना धी धी ना**
**ती ना धी धी ना'**

हातावर ताल कसा धरायचा. ताल म्हणजे काय, वगैरे अशा सगळ्या गोष्टी खारुताई शिकू लागली. एक ताल तयार झाला की त्याचा कायदा, तुकडा शिकवायचा. मग दुसऱ्या तालाचे बोल, टाळी मंकू तिला शिकवायचा. खारुताई प्रयत्नांची पराकाष्ठा करायची. अक्षरं बरोबर वाजवायची पण बोल हवे तसे परिणामकारक उठत नव्हते. चिंकू, गोटू तिच्या गडबडगोंधळाला फिदी फिदी हसायचे. पण खारुताई त्यांच्याकडे लक्षच द्यायची नाही. उलट सगळं वाजवता यावं म्हणून जोमाने सराव करायची. शिकताना तिला जे समाधान मिळत होते. त्याच्यापुढे दुसऱ्यांच्या हसण्याचे तिला काहीच वाटायचे नाही. खारुताई मनापासून प्रयत्न करत होती. त्यामुळे मंकूही तिला प्रोत्साहन द्यायचा. खारुताईच्या डोक्यात आता सतत 'धीं धा धीं धिनक, तीं ता तीं तिनक' असंच असे.

एके दिवशी मंकूने बातमी आणली, तो म्हणाला.

"आपल्या जंगलात वेगवेगळ्या स्पर्धा आहेत. त्यात स्वतंत्र वाद्य वादनाचीही स्पर्धा आहे. मी तुम्हा सर्वांची नावे दिली आहेत."

"अरे माझं कशाला दिलंस नाव? आता कुठे मला बरं वाजवायला येऊ लागलंय." खारुताई म्हणाली.

"अजून आठ दिवस वेळ आहे. तुम्ही सर्वजण खूप सराव करा. बक्षीस मिळेलच."

गोटू, चिकूनं उड्या मारून, मिठूनं पंख फडफड करून गोंधळ, मजा केली. खारुताई मात्र चितागती झाली. तिला वाटलं, सगळ्यांना खूपच चांगलं येतं वाजवायला. स्पर्धेत आपली फजिती होणार, उगाच घेतला भाग... मंकूला सांगावं भाग नकोच घ्यायला. अजून कशात काही नाही. आता कुठे तबल्यावर हात बसायला लागलाय. ती मंकूकडे गेली आणि त्याला म्हणाली,

"मंकू, मी नाही बाबा भाग घेत. फजिती होण्यापेक्षा नुसती ऐकायला येते. मला कळेल म्हणजे नेमकं काय असतं. कशी असते स्पर्धा आणि मग पुढच्या वेळेस घेईन मी भाग."

"तू भाग घे. त्यानिमित्ताने सराव होईल. फार तर बक्षीस मिळणार नाही. नको मिळू दे, स्पर्धेची भीती तर जाईल. तू सरावाला सुरुवात कर, वेळ घालवू नकोस." मंकून तिला समजावले. मग खारुताईने विचार केला, सराव तरी करू, काय होईल ते होईल. हरलं तरी दुःख होण्याचं काय कारण नाही. मग

ती रात्रदिवस तबल्याचाच विचार करू लागली. तबला वाजवायचा कंटाळा आला की, हाताने ताल धरायची. तिच्या या वेडाला सगळे हसायचे. पण ती कशाकडेच लक्ष द्यायची नाही. चिकू, गोटू मात्र बिनधास्त होते. त्यांना वाटायचं आपल्याला चांगलं येतं वाजवायला तर कशाला काळजी करायची? तिघांना वाटायचं आपणच बक्षीस मिळवू. मंकूने किती सांगितलं तरी ते लक्षच द्यायचे नाहीत.

स्पर्धेचा दिवस उजाडला. स्पर्धकांना आधी क्रमाने वाद्य वाजवायला सांगितलं. नंतर त्यांना एकच ताल एकदम सर्वांनी मिळून वाजवायला सांगितला. त्रिताल वाजवताना चिकूचा ठोका चुकला. त्याला बाहेर काढण्यात आलं. अंतिम फेरीत खारुताईनं अतिशय तन्मयतेनं तबल्यावर तिहाई वाजविली. तिच्या वादनात बराच गोडवा होता. तिला तिसरं बक्षिस मिळालं तर गोटूला दुसरं. पहिलं बक्षिस दुसऱ्याच कुणाला तरी मिळालं. मंकू थोडा नाराजच झाला. खारुताईने उशिरा येऊन बक्षिस मिळवलं अन् एवढा हुशार चिकू बाहेरच काढला गेला. खारुताई किती सहजतेनं वाजवत होती. मंकूनं तिचं फारच कौतुक केलं. चिकूला न् मिठूला चांगलंच झापलं. पुढच्या वर्षी मात्र सगळ्यांनी झटून तयारी करायची ठरवलं. खारुताईनं मनापासून प्रयत्न केलं. मनचे मांडे खात बसण्यापेक्षा तिनं मेहनतीला महत्त्व दिले. चिकू, मिठूला मात्र फाजील आत्मविश्वास नडला. यश मिळवायचं असेल तर सराव हवाच. जेवढा सराव जास्त, तेवढं तुम्ही यशाच्या जवळ जाल. यश आपल्या हातात येण्यासाठी सरावाला पर्याय नाही.



# दीप्तीची फजिती

दीप्ती फारच अवखळ दंगामस्ती करणारी. आईला तिची सारखी काळजी वाटते. दंगा करण्यात पुढे पण कामाच्या नावाने बोंब. वेंधळेपणा एवढा की विचारायलाच नको. आईनं आपलं स्वावलंबनाचे धडे द्यावेत आणि दीप्तीने नेहमीप्रमाणे विसरावेत. अगदी सकाळी उठल्या उठल्याच,

"आई माझा ब्रश सापडेना."

झालं. आईनं मग बाथरुममध्येच, कुठेतरी, काल ठेवलेला ब्रश शोधून द्यायचा. ब्रशवर पेस्ट घ्यायची नि ती ट्यूब जेवणाच्या टेबलावर, खिडकीत किंवा जाईल तिथं कुठेही ठेवायची. रात्री झोपताना बाकीचे दात घासायला जायचे तर त्यांची शोधताशोधता तारांबळ व्हायची. असं तिचं नेहमीच चाललेलं असायचं. एकदा आंघोळ करताना दीप्ती ओरडली,

"आई टॉवेल दे ना."

"माझा हात पिठाचा आहे, थांब जरा."

"थंडी वाजतेय." दीप्ती रडक्या आवाजात ओरडली.

"हा घे." असं म्हणत बाबांनी दिला टॉवेल.

शाळेत जाताना म्हणाली,

"आई, माझं मराठीचं पुस्तक बघितलंस का ग?"

"हे बघ फ्रिजवर आहे."



पुस्तक सापडलं तर आता गृहपाठाची वही सापडेना. दिप्ती शोधताना विचार करत होती. आईला विचारावं तर ती ओरडणार. पण आईनंच दिवाणखाण्यातल्या चहाच्या मेजावरची वही तिच्याकडे दिली. दीप्ती ओशाळं हसली. मनातल्या मनात म्हटली, आई किती चांगली आहे. शाळेत जाताना तिनं आईला लाडाने पापी दिली.

दीप्ती शाळेतून आली. तेव्हा आई भाजी निवडत होती. दीप्तीनं खाणंपिणं उरकलं आणि तिच्याजवळ बसून गृहपाठ केला. वही पेन तिथंच ठेवून वेंधळाबाई तशाच खेळायला गेल्या. खेळून झालं की जेवून झोपली.

शाळेत जाताना शोधाशोधीत एवढा पसारा घालायची की ती शाळेत गेल्यावर आईला तो पसारा आवरायला तासभर लागायचा. आई दीप्तीच्या कानीकपाळी ओरडायची,

"दीपे ऽ, तुझ्या वस्तू नीट ठेवत जा. आजच्या दिवस मी आवरतेय पण उद्यापासून अजिबात आवरणार नाही."

असा दम दिला म्हणजे, दीप्ती पसारा उचलून ठेवायची. पण एक वस्तू सापडेल तर शपथ. एखादी वस्तू शोधताना पुन्हा सगळा पसारा.

एका शनिवारी सकाळची शाळा म्हणून आईनं फरसाण, शेव डब्यात दिलेलं. डब्यात थोडंसं खरकटं शिल्लक राहिलेलं. दिप्तीने शाळेतून आली की दप्तर फेकलं अन् शक्तिमान बघायला टी. व्ही. पुढे बसली. नंतर कपडे बदलणं, हातपाय तोंड धुणं, जेवण. दुपारी सुट्टी म्हणून आईच्या कुशीत वामकुक्षी. संध्याकाळी गृहपाठ करावा म्हणून दीप्ती दप्तराकडे गेली. आज काय सांगितलं ते आठवत आठवत दप्तरात हात घातला. ती किंचाळतच हात झाडू लागली. आई घाबरली. तिला म्हणाली,

"अग काय झालं?"

दीप्ती हात झाडत नाचू लागली. आईनं कसातरी तिचा हात हातात घेऊन बघितला तर, हातावर दहाबारा तांबड्यालाल मुंग्या. हाताच्या हालचालीमुळं आणखी घट्ट रुतत होत्या. आईनं हात स्थिर ठेवला न् हलक्यानं मुंग्या झटकल्या. दीप्तीला मोकळ्या हवेत बसवलं. मग दप्तर बघितलं. आत डबा तसाच होता. खरकट्या डब्याच्या वासावर मुंग्या आलेल्या. सगळं दप्तर गच्च भरलेलं. पुस्तकात, वह्यात मुंग्याच मुंग्या. दप्तर मोकळं करून धुवायला टाकलं. वह्या पुस्तकं कंपास दाराबाहेर ठेवलं. आता मुंग्या आपोआप निघून जातील म्हणून. आई मुंग्यांना

कधी मारत नाही. नेहमी म्हणते, सतत काम करणारा एवढासा जीव. अन्न मिळवणं हा त्यांचाही हक्क आहेच ना. जागा बदलली की, त्यांना धोक्याची जाणीव होते अन् त्या निघून जातात. दप्तराची थोड्याथोड्या वेळाने जागा बदलायची म्हणजे झालं. पीठ भुरभुलं तरी जातात. आईने दीप्तीकडे बघितले तर तिचे डोळे रडवेले. तिचा छोटासा नाजूक हात चांगलाच सुजला होता. आईचं लक्ष गेल्यावर ती आणखीनच मुसमुसायला लागली. तेव्हा आईनं विचारलं,

"फार दुखतंय का?"

"दुखत नाही. खाजवून सुजलंय. डॉक्टरकडे नेणार नाहीस ना?"

"नाही गं, मुंग्या चावल्यावर कुठे डॉक्टरकडे जायचं असतं?"

आता दीप्ती शांत झाली.

"दीपे, आता तरी आठवणीनं कामं नीट करत जा. आतापासून अशी स्वतःची कामे स्वतः करायची सवय लावावी. लहानपणी मेंदूची पाटी कोरी असते. त्यामुळे शिकलेलं आयुष्यभर लक्षात राहातं. म्हणून चांगलं ते जास्तीत जास्त शिकावं. मग मोठेपणी काही त्रास होत नाही. आपला वेळ वाचतो. वस्तू पण जागेवर राहतात. यालाच शिस्त म्हणतात. तुझ्याएवढी असताना माझ्या सगळ्या वस्तू मी नीट जागेवर ठेवायची. शिवाय भांडी घासणं, कपडे धुणं अशी कामंसुद्धा करायची. एवढंच नाही तर मी चपात्या, भाकरीसुद्धा करायची."

"खर्र ऽ"

"मग! मी नेहमी खरंच बोलते. माणसानं नेहमी खरं बोलावं, खरं वागावं."

"आई ऽ" असं म्हणत दीप्ती आईला बिलगली.

* * *

# लाल स्वेटर

कांचन आज खूप खूश होती. नुसती इकडून तिकडे बागडत होती. तिची ही गंमत नानू मघापासून बघत होता. त्याला वाटलं, 'हिनं नवा शीटर घातलाय म्हणून एवढ्या उड्या मारतीया तर'

"ए ऽऽ कांचे, थंडी नाय तरी शीटर घातलायस."

नानू तिला चिडवत म्हणाला.

"तुला काय करायचंय?"

असं म्हणत कांचन पुन्हा इकडं तिकडं बागडू लागली. तेवढ्यात संतू आला.

"संत्या, बघ की कांचीनं नवा शीटर घातलाय म्हणून कशी मिरवतिया." नानू म्हणाला.

"लेका भारीच हाय की, शीटर बघू कांचे."

संत्या तिच्याजवळ जात म्हणाला.

"केवढ्याचा गं?"

"मला न्हाय म्हायत, आयंन घालून बघ म्हनली म्हणून घातला. आताच आलीया बाजारातनं."

"तुझ्या आकीला पण आन्ला?"

"न्हाय, मला एकटीलाच आन्लाय." कांचन म्हणाली.

तेवढ्यात कांचनची थोरली बहिण आली. तिला हात पकडून म्हणाली,

"हिथं खेळत बसलीस व्हय, तिकडं म्या किती हुडकली?"

असं म्हणत तिला हाताला धरून ओढत नेली. कांचनचे आईवडील चहा पीत बसलेले.

आकी कांचीला ओढत आणताना दिसली.

"आगं आगं तिला वढू नगंस." कांचीची आई कळवळून म्हणाली.

"पोरगी कशी गुलाबाच्या फुलावाणी दिसतिया. लाललाल शीटर लयच बेस दिसतुया." तिला जवळ घेत आई कौतुकानं म्हणाली. तसं आकी कडाडली.

"कांचे, काढ शीटर. तुझा न्हाय. लगीच घालून गेली मिरवायला."

"असू दी ग ऽ पोरीची जातय, म्याच म्हणलं अंगाला येतुला का बघ, म्हणून तिनं घातला."

कांचननं अंगातून स्वेटर काढून अलगद आईच्या हातात दिला. तिनं आईला विचारलं.

"आयं, कुणाचा हाय गं?"

"आसल कुणाचा तरी, तुला कशाला पायजेत पंचाती?" आकी म्हणाली.

"आगं, आपल्या त्या मालकिणीची भाची कोण गं ती?"

"इद्या व्हय?"

"हो, हो. मालकिणीनं माझ्याजवळ पैसं दिलं न् म्हणाली, तुमी आठवडी बाजाराला जाताय तर, इद्याला कांचीच्या मापाचा शीटर आणा. इद्या म्हणाली वाटतं, मला कपडे, डिरेस नगं आत्या, शीटरच आण. म्हणूनशानं मालकिणीनं शीटरला गपचिप पैसं दिलं. मालकाला बी म्हाईत न्हाय."

"आयं मला पण का गं आणला न्हाइस असला शीटर? किती मऊ मऊ हाय."

"येडी का काय गं, आपल्याजवळ कुठलं एवढं पैसं?"

बापू कपबशी आईकडं सरकवत म्हणालं. कांचन हिरमसून गप्प बसली.

"म्या म्हणत हुती तुझ्या बापूला. कांचीला पण घ्या एक शीटर." आई कुरकुरली.

"कावो बापू, मला शीटर घेतला न्हाय?"

"म्होरच्या येळंला गेलू ना की आणतू बघ दुघींन्लाबी."

"तवर थंडी संपायची."



"आपून गरीब मान्सं, थोडी कळ काढाया लागतीया. गरीबाला थंडी तरी कुठं वाजती! एका जागी बसणाराला वाजती थंडी, आपल्या-सारख्या कामं करणाराला न्हाय वाजत." असं म्हणून बापू उठून गेलं.आकीनं स्वेटरची व्यवस्थित घडी करून पिशवीत ठेवली.

"दिऊन ये जा मालकिणीकडं, मालक यायच्या आत."

स्वेटर घेऊन आकी गेली. कांचन हिरमुडून गेली. गालावरचं लालजर्द गुलाबाचं फूल कोमेजलं अन् डोळ्यांत उतरलं. ती तशीच बसून राहिली.

काहीवेळानं आकी मालकिणीकडनं निरोप घेऊन आली ती म्हणाली,

"आयं, इद्या दुपारीच गेली. तिजं वडील आल्त्यं न्यायला. न्हा म्हनलं तरी न्हायलं न्हायत."

"आता गं मग?"

"मी बोलता बोलता काकीन्ला म्हनलं, कांचीनं अंगाला येतुया का म्हणून शीटर घातला तर काढीनाच. तिला दिसत बी हुता लई चांगला." मालकीणीला सगळी मुलं काकीच म्हणायची. तर काकी म्हणाल्या, "आंग, रांडच्यानो, घालून बी बगितला का? मग ठेव आता कांचीलाच. न्हायतर आता आमच्यात तरी कोण हाय घालायला."

"मंग?" आईनं उत्सुकतेने विचारलं.

"मग काय कांचीलाच दिला त्यांनी शीटर." असं म्हणत आकीनं आईकडं पिशवी दिली.

"काकी लय चांगल्या हाईत." कांचीची आई म्हणाली.

"काकी म्हनल्या, पगारातनं फेड म्हणावं जमंल तसं पैसं."

आकीनं तसं सांगितल्यावर आईचा थोडा हिरमोड झाला. तिला वाटलं तसाच दिला की काय पण... जाऊंदी न्हायतर फुकटचं कुणाला काय पचतं? फेडायला येत्यालं थोडं थोडं पैसं. आईनं शहाण्यासारंख्या विचार केला.

"घ्या राणीसाब तुमचं सगळीच लाड करत्याती. आमाला कोण काय देत न्हाय." लटक्या रुसव्यानं आकी म्हणाली.

"आके, तूच घाल की मग." कांचन समजुतीनं म्हणाली.

"मला बसल व्हय?"

"बसल की, बघ तरी घालून" आई म्हणाली.

आकीनं मऊ मऊ स्वेटर अलगद हातावर चढवला. थोडासा आवळत होता. पण बसला अंगात.


"आता दुघींनीबी आल्टुन पाल्टुन घाला, भांडू नगा." आई म्हणाली

"आय, पुढच्या येळंला तुला न् बापूला आणू शीटर. सुट्टीत आमी पण येतू कामाला." कांचन म्हणाली.

"व्हय गं माझी गुणाची बाय" आईनं कांचनला जवळ घेतलं. कांचन आणि आई या दोघींना एकमेकींच्या मायेची उब मिळत होती. आकीच्या अंगात स्वेटर खुलत होता.

* * *

# वाढदिवस



बीनाचा वाढदिवस होता म्हणून बीनाच्याच पसंतीचा फ्रॉक आणला. क्रिम कलरच्या बलून फ्रॉकवर बॉटलग्रीन कोट बीनाला शोभून दिसत होता. तिला वाढदिवसाशिवाय काहीच सूचत नव्हते. कुणाकुणाला बोलवायचे, काय काय करायचे असेच सारखे विचार यायचे तिच्या मनात. आईच्या मागेपुढे लुडबुड करत ती आईला वैताग आणत होती.

"आई काय करत्येयस?" गॅसवरचं भलं मोठं पातेलं बघून बीनानं आश्चर्यानं विचारलं.

"चिवडा."

"एवढा ऽऽ?" मोठे मोठे डोळे करत बीना ओरडली.

"हो! तुझ्या सगळ्या मित्रमैत्रिणींना पोटभर खायला नको का." चिवडा हलवून थोडासा तिच्या हातावर टेकवला, अन् आई म्हणाली,

"खेळ जा."

गरम चिवडा ह्या हातावरून त्या हातावर घेत, फुंकर मारत चारपाच दाणे तोंडात टाकत. बीना म्हणाली,

"आई, केक पण मोठाच कर. मी खूप खाणारेय."

"बरं बाई." बीना खेळायला गेली. आईनं लाडूसाठी रवा भाजायला घेतला. रवा भाजल्यावर पाकात टाकला. रव्यात पाक चांगला मुरल्यावर लाडू वळून डब्यात भरून ठेवले. उद्या बीनाचे मामा, मामी, रोहित हा मामेभाऊ येणारेत. घरात पाहुणे आल्यावर जास्तीची कामं होत नाहीत. म्हणून केकही आजच करायला हवा. अजून खूप कामं पडलीयेत. पण थकवा आल्यामुळे बीनाची आई जरा खाटेवर आडवी झाली. थोडा आराम केल्यामुळे तिला हुशारी वाटू लागली. मग उठून तिनं तोंड धुतलं. केक ओव्हनला लावून ती वर्तमानपत्राचे तुकडे करू लागली. तेवढ्यात बीना आलीच. मग बिनालाही मदत करायला घेतलं. कागदाच्या तुकड्यावर लाडू-चिवडा-चॉकलेट असं घेऊन पुड्या बांधू लागली. वीसपंचवीस पुड्या बांधून पिशवीत भरताना बीनाने विचारले,

"आई, मुलांना अशाच पुड्या द्यायच्या?"

"हो."

"नावं ठेवतील ना मुलं." बीना रडवेली झाली. आतापर्यंत तिनं तिचे स्वत:चे, दुसऱ्यांचे असे बरेच वाढदिवस बघितले होते. पण अशा पुड्या कधीच कुणी दिल्या नाहीत. आता जर आपल्या मित्रमैत्रिणींना ह्या अशा पुड्या दिल्या तर हसतील सगळे. चिडवतील आपल्याला असं तिला वाटू लागलं.

"तुझ्या मित्रमैत्रिणीसाठी नाहीत काय त्या पुड्या."

"मग कुणासाठी?"

"आवर लवकर, चल, उद्या कळेल तुला."

आईनं असं सांगितल्यावर बीनाला बरं वाटलं. पण मग कुणाला देणार असेल आई त्या पुड्या? हा प्रश्न तिच्या मनात सतत घोळत राहिला. आईला विचारावं तर ती चिडेल, म्हणून ती पुन्हा काही न विचारता झोपून गेली.

सकाळीच नेहमीप्रमाणे भिकाऱ्यांच्या मुलांची हाक ऐकू आली.

"माय, वाढा वो ऽ"

कॉलनीच्या कोपऱ्यावर दहा-बारा मुलं अन् त्यांच्या आया यायच्या. शिळंपाकं कुणी कुणी त्यांना वाढायचे.

बीना अजून अंथरूणातच गाढ झोपलेली होती. आईनं तिच्या केसातून हात फिरवत तिला जागं केलं. तिची पापी घेत म्हणाली,

"हॅपी बर्थ डे टू यू."

बीना खूश झाली. वाढदिवसाच्या आठवणीनं ती एकदम उठून बसली.

"चल माझं एक काम कर." आई तिला म्हणाली. बीनाला वाटलं, आज आपला वाढदिवस असून, लाड करायचं सोडून असं उठल्या उठल्या आई काम काय सांगत्येय. तरी ती आईच्या मागं गेली. आईनं कालची पुड्यांची पिशवी तिच्या हातात देत म्हणाली,

"ह्या पुड्या त्या भिकाऱ्यांना देऊन ये."

बीना सगळं समजली. ती पिशवी घेऊन बाहेर गेली. तिनं सगळ्यांना पुड्या दिल्या. उरलेल्या पुड्या मुलांना पुन्हा एकेकदा दिल्या. खिडकीतून आई डोळे भरून तिच्याकडे बघत होती. बीनाचा वाढदिवस असा तिच्या वाढत्या, मोठ्या विचारांनी व्हायला हवा. वयाबरोबर विचारांचीही वाढ व्हायला हवी. वाढणाऱ्या विचारांचा वाढदिवसच खरा वाढदिवस होय.

* * *

# दणकटपणा

काकींचं घर म्हणजे मुलांना मुक्तद्वार. कधीही या. बसा, पाणी प्या. घरात काही खाऊ असला तर काकी आग्रहाने खायला घालत. साध्यासुध्या वयस्कर काकी मुलांच्यात रमायच्या छान. रोज पहाटे फिरायला जायच्या. योगासनं करायच्या. बाजाची पेटी वाजवत गाणी, भजनं म्हणायच्या. आधुनिक गोष्टी मात्र त्यांना जमत नसत. त्यांची मुलं आपापल्या व्यापात असत, आपापल्या मित्रमैत्रिणींत रमत. काकींना मग एकटेपणा जाणवत असे. म्हणून मग त्या हल्ली महिला मंडळात जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे मिटींगला वगैरे जाताना त्यांना स्वतःची दुचाकी तरी असावी असं वाटू लागलंय. बसथांबा घरापासून बराच लांब असल्यामुळं सारखं कुणाला तरी, मला सोडा असं सांगावं लागतं. रिक्षाने जा ये फारसं परवडत नाही. त्यांनी एकदा ठरवलं, आपणच गाडी शिकावी म्हणजे कुणाला लोणी लावायला नको, मला इकडे सोडा, तिकडे सोडा, असं नको.

एकेदिवशी सगळी काम आवरून झाल्यावर काकी मुन्नाला म्हणाल्या,

"चल रे मला शिकव गाडी."

मुन्नाने स्कुटी काढली. कशी कशी चालवायची ते सगळं समजावून सांगितलं, पण गाडीवर बसल्या की काकी एवढ्या घाबरायच्या की बस्स, सगळ्या कॉलनीभर



गोंधळ मुलांचा.

"हं काकी, चालवा की, फिरवा ॲक्सीलेटर, सोप्पं तर आहे."

नुसता गलका. दुपारी विश्रांती घेणारे गॅलरीतून, खिडक्यातून डोकावू लागले. त्यामुळे काकी म्हणाल्या,

"आज राहू देत. उद्या जरा भीती कमी झाल्यावर शिकते." काकींनी स्कुटी गाडीघरात नेऊन लावायाला सांगितली. मग दुसऱ्या दिवसापासून काकी नुसतं स्कुटी स्टँडला लावून गाडी चालू करायच्या. ब्रेक दाबून धरायच्या. गाडीवर बसायची भीती तरी त्यामुळे दोनतीन दिवसात कमी झाली. काकींचं ते वेड बघून, काकांनी रात्रीच्या वेळी मैदानावर कोणी नसताना काकींच्या मागे बसून काकींना गाडी शिकवली. दिवसभर काका घरी नसायचे. रात्री यायचे. मग रात्रीचं जेवण झाल्यावर दोघं स्कुटी घेऊन मैदानावर जायचे. काका मागे असल्यामुळे काकींना पुष्कळ धीर यायचा. दोन दिवसात काकी गाडी शिकल्या. तिसऱ्या दिवशी काकींनी एकट्याने गाडी चालवली. काकींना लय भारी वाटू लागलं. त्यांना स्वप्नं सुद्धा गाडी चालवतानाची पडू लागली.

एकदा दुपारच्या वेळी मैदानावर कोण नाहीसं बघून काकी गाडी घेऊन गेल्या. काकींना चांगलाच आत्मविश्वास आलेला. दण्णाट गाडी पळवू लागल्या. अगदी चाळीसच्या वेगाने. परवा गाडी सुरू करायलाही घाबरणाऱ्या त्या ह्याच का काकी? बघणाऱ्याला खरंही वाटणार नाही, अशी झकास गाडी पळवू लागल्या. मैदानावर दगडंही भरपूर होती. काकी मनात म्हणाल्या, दगडं, खड्डे यांनाच रस्त्यावरची माणसं, अडथळे वगैरे समजुया. त्यांना चुकवत गाडी चालवता यायला हवी. तर अशीच वेगाने गाडी चालवताना मोठा दगड समोर दिसला. त्या दगडाच्या उजवीकडून घ्यावी का डावीकडून घ्यावी, हा निर्णय काही लवकर काकींना घेता येईना. शेवटी गाडीनेच मधला निर्णय घेतला, आणि गाडी दगडावरून पळाली. पण तो निर्णय गाडीला काही पचला नाही. चांगलाच महागात पडला. तिने काकींना जोरात आपटवलं. काकींचं डोकं दाणकन् आपटलं. नंतर गाडी काकींच्या अंगावर आपटली. गाडीचा पुढचा भाग (बॉनेट) तुटला. पण आश्चर्य म्हणजे काकींचं अंग सुजणं आणि खरचटणं यापलीकडं फारसं काही झालं नाही. दोन वेदनाशामक गोळ्या गिळल्या न् मलम लावले. आठ दिवसात काकी पुन्हा हिंडूफिरू लागल्या. सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं.

"काकी तुम्ही लगेच कशा काय बऱ्या झालात?" महेश म्हणाला.

"त्यांनी वेळेवर औषधं खाल्ली असतील." मिलींद म्हणाला.

"फक्त दोन गोळ्या खाल्ल्या आईनं, डॉ. माधवीताईनं दिलेल्या." मुन्ना म्हणाला.

"फक्त दोन गोळ्यात काकी बऱ्या झाल्या?" गोपू आश्चर्यानं म्हणाला.

"आमची आजी जरा अंघोळ करताना पाय घसरून पडली तर तिचा खुबाच मोडला. आता झोपूनच असते." शामल म्हणाली.

"हो, मी ऐकलंय, वयस्कर माणसांचे लगेच हाड मोडते." ज्योती म्हणाली.

"अरे माझ्या लेकरांनो, मी रोज योगासने करते ना. त्यामुळेच माझी हाडं दणकट झालीत. कुठं रक्त आलं नाही की हाड मोडलं नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मला भीती वाटत होती ती डोक्याला मार लागल्यामुळे माझी स्मरणशक्ती जातेय की काय. पण अजून तरी ती शाबूत आहे. मला तापसुद्धा आला नाही. हे सगळं योगासनामुळं झालं आहे."

"काकी, आम्हाला पण शिकवा की योगासने." कुलदीप म्हणाला.

"मग आम्हीपण दणकट होऊ." अनिल म्हणाला.

"हो, हो, एका पायावर तयार आहे तुम्हाला शिकवायला." असं म्हणत काकींनी पाय उचलताच, डाव्या पायात कळ आली. "अया ऽ ऽ ई ऽ ऽ" करत त्यांनी पाय खाली ठेवला. सगळी मुलं हसू लागली.

* * *

# आईला पत्र ल्हिवायचं

"ए आई, मी बघ शी ऽ री काढला."

ईश्वरी टुलुटुलु धावत आली. हातात पाटी न् पेन्सिल घेऊन धावताना तिची त्रेधा तिरपिट उडत होती. पण तिला आई कुठं दिसेना. सुमा दोरीवर कपडे वाळत घालत होती.

"शुमा ऽ ए शुमा ऽ बघ ना मी शी ऽ री काढला."

"बघू बघू अगो बया ऽ आता आमची इशूताई ल्हिवायला लागली की." सुमा कौतुकाने म्हणाली. तेवढ्यात ईश्वरीची आई आली. तिच्याकडे पळतच ईश्वरी गेली.

'आई ऽ ऽ' असं म्हणत तिच्यासमोर पाटी धरली ईश्वरीनं.

"छान काढलास की 'श्री' सुमा, तू तर काढून दिला नाहीस ना?"

आईनं सुमाला विचारलं. आजच, अगदी मघाशीच तर 'श्री' शिकवला आणि लगेच कसा काय काढता आला ईश्वरीला. म्हणून सुमाने काढला की काय असंच आईला वाटलं.

"न्हाय बया, मला ल्हिवायावाचाया तरी येतंय का?" सुमाने भांड्याचे घमेले बाहेर नेत म्हटलं.

"सुमा, तुला लिहितावाचता येत नाही?" ईश्वरीची आई आश्चर्याने म्हणाली.

"न्हायी." सुमा मागे पुढे डोलत भांडी घासता घासता म्हणाली, "शिकून तरी काय उपेग?"

दुसऱ्या दिवशी ईश्वरीच्या आईनं नवीन पाटी आणली. सुमाची कामं आटोपल्यावर तिला चहा दिल्यावर म्हणाली, "चला आता थोडा अभ्यास करू या."

संध्याकाळची वेळ, सगळी कामं आटोपली होती. त्यामुळे सुमा पण ईश्वरीजवळ बसली.

पाटी तिच्या हातात देत आई म्हणाली, "सुमा, तू पण 'श्री' काढायला शिक."

"मला न्हाय बाई येत." सुमा लाजून म्हणाली.

"मी शिकवते ना." आईनं तिचा हात हातात घेऊन गिरवू लागली.

"असं गिरवायचं." ज्या हातात सतत खरकटी भांडी अन् धुण्याचं पिळंच असत, अशा ओबडधोबड हातात आज पाटीपेन्सिल होती. ईश्वरी सुमाचं गिरवणं नवलानं न्याहळत होती. 'आसं नाय, आस्संऽ' अशा सूचना देत होती. ईश्वरीच्या आईनं ईश्वरीला अ,आ,इ,ई, काढून दिलं न् गिरवायला सांगितलं. ईश्वरी पटापटा शिकून सुमालाही शिकवू लागली. पण सुमाच्या फारसं डोक्यात शिरायचं नाही. सुरवातीला बाराखडी शिकवेपर्यंत सुमाने खूप ताप दिला. ईश्वरीची आई कंटाळून जायची. सुमा तर नकोच म्हणायची. काय करायचंय, किती शिकलं तरी भांडीच घासायचीयेत. पण ईश्वरीची आई तिच्या मागंच लागली. नेटाने शिकवू लागली. बाराखडी शिकल्यानंतर सुमा छोटी छोटी वाक्य वाचू लागली. वर्तमान पत्रातली ठळक अक्षरे वाचता येऊ लागली. वर्तमानपत्रातील फोटोखालील मजकूर वाचताना तिला फार आनंद व्हायचा. ईश्वरी शिकण्यात तिच्यापुढे जायची अन् तिला शिकवायची. थोडसं चुकलं तर हळूच हातावर छडी मारायची. मग दोघीही खो खो हसायच्या. ईश्वरीची आई अधून मधून बघायची प्रगती कुठवर आलीय ते.

एके दिवशी सुमाची आई पेढे घेऊन आली. ईश्वरीच्या आईला पेढे देत



म्हणाली. ''बायसाब, पेढं घ्या.''

''कशाचे पेढे?'' ईश्वरीच्या आईला वाटलं सुमा लिहिती वाचती झाली म्हणूनच तिच्या आईनं पेढे आणलेत. सुमाच्या आईनं ईश्वरीच्या आईच्या हातात पेढ्यांचा पुडा देत म्हणाली,

''आवो सुमाचं लगीन ठरलं.''

''अरे वाऽ सुमा ऽ काही बोलली नाहीस? आता काय मग जाणार सासरी!'' पेढा तोंडात टाकत ईश्वरीची आई म्हणाली. सुमा लाजत, गालात हसत, तिच्या पाया पडली.

''लिहणं, वाचणं सोडायचं नाही पण!''

''आता कसं वं जमायचं?''

''न जमायला काय झालं? नांदायला गेल्यावर बघ आईची किती आठवण येते. मग तेव्हाच पत्र लिहायचं आईला. बघ लेक भेटल्याचा आनंद होईल तिला.''

''व्हय बायसाब तुमच्यामुळं तेवढं जमलं बघा.'


''मला पण पत्र पाठवायचं कळ्ळं!'' ईश्वरीनं असं म्हणताच सुमा लाजून पळाली.

* * *

# भुकेलेल्यांना अन्न द्यावं

अपूर्वा आज खूपच सुंदर, गोड दिसत होती. तिनं झालरीझालरीचा पांढराशुभ्र फ्रॉक, मोगऱ्याचा गजरा, गळ्यात मोत्याची माळ, पांढरे शुभ्र शूज, मोजे असं सगळं पांढरंच घातलेलं. ती धवलपरीच झाली होती अगदी. आईचं आवरेपर्यंत सगळीकडे मिरवून झाले होते. सगळ्यांनी केलेले कौतुक झेलून तिचा चेहरा आणखी फुलून गोबरा झाला होता. आईबाबा गाडीत बसले की अपूर्वाही पटकन् गाडीत बसून भुर्रकन् गेली.

लग्नात शांतपणे लगबग चालली होती. मुली तर सारख्या इकडून तिकडे फिरत होत्या. नवी कपडे घालून मिरवत होत्या. फॅशन शो असल्यासारखं वाटत होतं. सनईचे सूर कानाला गोड वाटत होते. गुलाबपाण्याचे फवारे उडत होते. सगळं कसं मंगलमय, सुगंधी वातावरण झालं होतं. नवरा-नवरी वरती व्यासपीठावर जाऊन समोरासमोर उभा राहिल्यावर भटजींनी मधोमध अंतरपाट धरला. मंगलाष्टका सुरू होताच सगळी कुजबुज संपली. 'शुभ-मंगल सावधान' असं भटजींनी म्हणताच सर्वांनी नवरा-नवरीच्या दिशेने अक्षता टाकल्या. त्यातील काही अक्षता अपूर्वाच्या अंगावरही पडल्या. तिला मजाच वाटली. लग्न लागल्यावर माईकवरून कोणी तरी सूचना दिली.



''जेवल्याशिवाय कोणी जाऊ नये.''

जेवणाच्या हॉलमधे सगळेच पळाले. नवरीचे वडील सगळ्यांना आग्रहाने वाढत होते. अपूर्वा, तिचे आईबाबा पोटभर जेवले. जेवण छानच होते. बेसीनकडे हात धुवायला जाताना अपूर्वाला वेगळेच

दृश्य दिसलं. दोन लहान मुले व त्यांच्या आया कडेवर आणखी एकेका बाळाला घेऊन उभ्या असलेल्या. कपडे फाटलेले, मळके. त्यांनी कित्येक दिवसात अंघोळ केली नसेल. अपूर्वा हात धुवायचं विसरून त्यांच्याकडेच पाहात राहिली. त्यातील एक मुलगी तर अपूर्वाएवढीच होती. अपूर्वाकडे कुतुहलाने डोळे मोठे करून बघत होती. त्यांच्यातील मोठी बाई म्हणाली,

"माय, वाढा की."

अपूर्वा भानावर आली. ती आईला म्हणाली,

"आई, त्यांना थोडंसं दे ना."

"अगं, लग्न का आपल्या घरचं आहे?" बाईकडे दुराव्याने पाहात म्हणाली, "नंतर वाढतीलच ना." असं म्हणून आत गेली. अपूर्वा आईच्या मागे जाता जाता विचार करत होती, त्या मुलांना भूक लागली असेलं.

"आई, त्या काकांना मी सांगू का वाढायला? त्यांना भूक लागली असेल ना गं?" अपूर्वा आर्जवाने म्हणाली.

"बघ त्या आचारीमामांना विचारून, भात वाढ जा."

अपूर्वा आचाऱ्याकडे पळतच गेली.

"आचारी मामा, भातबीत द्या ना जरा."

ती लग्नघरातील असावी असं वाटून, त्याने विचारले,

"कशाला वो ताईसायेब?"

"हवाय मला. टोपलीत द्या."

एका वाढप्याकडून भाताची टोपली घेऊन तिच्याकडे देत आचारी म्हणाला.

"ही घ्या टोपली. नंतर हितंच आणून द्या."

"होऽ"

असं म्हणत तिनं लाडूच्या ढीगातले चार-पाच लाडू घेतले, अन् ती त्य भिकाऱ्यांच्या भांड्यात भात आणि लाडू वाढू लागली. त्यांचे आनंदाने फुललेले चेहरे पाहून अपूर्वाला खूप बरं वाटलं. इकडे आई हाका मारत आली. म्हणाली,

"चल लवकर. इथं काय करतेस?"

"त्यांना भात वाढला." अपूर्वा सहजपणे म्हणाली.

आई आपल्या लेकीकडं कौतुकाने पाहू लागली.

* * *

# आई पडते आजारी

सकाळी मुलांच्या डोळ्यावरची झोप काही जात नव्हती. डोळे उघडले तरी पुन्हा गपकन झाकत होते. तेवढ्यात, 'ऑक्, ऑक्' असा आवाज ऐकून नीमा, सौरभ पटदिशी उठून धावतच आवाजाच्या दिशेने बेसीनकडे गेले. बघताहेत तर आईच्या उलट्या सुरू. ते पाहून निमालाही मळमळायला लागलं. ती पुन्हा खाटेवर येऊन बसली. सौरभ कावराबावरा होऊन आईकडं पहात तिथेच घोटाळला. निमा म्हणाली,

''सौरभ, आईचं डोकं धर.''

सौरभला वाटलं आईला बाळबिळ होतय की काय...सौरभ आईचं डोकं धरू लागला. त्याचे हातही डोक्यापर्यंत पोहचत नव्हते. आईनं हळूच नको म्हणून हात बाजूला केला. चूळ भरली. तोंडावर पाणी मारले आणि पुन्हा कॉटवर येऊन पडली.

''आई, चहा करून देऊ का?'' नीमा म्हणाली.



"कर सगळ्यांनाच."

डोळे मिटून, कपाळावर आडवा हात ठेवून ती पडून राहिली. सौरभ काळजीनं आईजवळ आला न् म्हणाला,

"आई, तुला बाळ होणारे का?"

तशातच आईला हसू आलं. ती म्हणाली.

"गाढवा मी आता म्हातारी होईल की. आता कसं बाळ होईल?"

सौरभला एकदम हुश्श वाटलं. तो दात घासायला पळाला. नीमानेही दात घासून चहा केला. चहा पिल्यावर आईला जरा हुशारी वाटली. तिनं उठून चपात्या केल्या. सौरभने आज सगळे पटपट आवरले. पटकन अंघोळ करून गणवेष इस्त्री करून घातला. दप्तर आवरले. निमाने चादरीच्या घड्या घातल्या. मुरांबा, चटणीबरोबर दोघं जेवले. डब्यातही तेच घेतलं. सौरभला आईची काळजी वाटत होती. तो म्हणाला,

"आई, मी थांबू घरीच? आपण डॉक्टरांकडे जाऊ या."

"नको. साधा पित्ताचा त्रास होतोय. एकदा पित्त सगळे पडून गेले की बरं वाटेल."

"कसं गं पडेल पित्त?"

"आणखी दोनचार उलट्या झाल्या की बरं वाटेल."

"बापरे. मग मी जातच नाही शाळेत, तुला पाणी द्यायला, डोकं धरायला नको का कोणी?"

"नको रे राजा." आई सौरभला जवळ घेत म्हणाली, "एवढं काय होत नाही. तसं जास्त झालं तर मी आपल्या कामतांच्या डॉ. ताईकडून औषध घेईन की."

"जाता, जाता सांगू का ताईला?"

"अरे बाळांनो एवढासा तर त्रास होतोय. तुम्ही अजिबात काळजी करू नका. आता पळा शाळेला. म्हणजे मी आराम करते. परवाच्या जागरणामुळे तर त्रास होतोय. चांगली झोप झाली की बरं वाटेल."

दोघेही शाळेत गेले. परवा गावाकडे लग्नात तेलकट वगैरे खाणं, दगदग, जागरण, प्रवास या सगळ्यामुळे त्रास होतोय. सौरभचे बाबा मागेच थांबले होते. मुलांची शाळा म्हणून तिघांना पुढं पाठवून दिलं होतं. उद्यापर्यंत त्यांचे बाबा येतील. सौरभच्या आईने पांघरूण घेऊन डोळे मिटले. चांगली गाढ झोप लागली. कामवाली एकदोनदा दारावरची घंटी वाजवून गेली. शाळेतून निमा, सौरभ आले. तोपर्यंत आईची

चांगली झोप झाली होती. आता मळमळणे खूप कमी झाले होते. पण अशक्तपणा वाटत होता. निमाने सौरभला दूधबिस्किटे दिली. आईला व स्वतःला चहा केला. सौरभ कुरकुरलाच."तुला का दूध घेत नाहीस, मला एकट्यालाच दिलेस?"

"काय रे सौरभ?"

आईनं आवाज देताच सौरभ न्हाणीघरात पळाला. आज न सांगता कपडे बदलून हातपाय धुतले. डबा काढून कट्ट्यावर ठेवायला गेला तर भांडी बेसीनमध्ये तशीच.

"आई, कामवाली आली नाही का गं?"

"नाही आली. आणि कामवाली नाही म्हणायचं तिला, मदतनीस म्हणायचं. तिला माहितच नसेल आपण आलोय ते."

"धुणं पण तसंचय." निमा म्हणाली.

"असू दे, उद्या धुवेल."

आईचा आवाज अशक्तपणामुळे खोल गेलेला.

"निमा कुकर लावतेस का? आज फक्त मुगाचे वरण आणि मऊ भात खाऊ या."

"कुकर पण लावते न् भाजी चपाती पण करते की."

नीमाने डाळ, तांदूळ काढून निवडून, धुवून आईला दाखवून पाणी घातले. कुकरमध्ये पाणी घालून गॅसशेगडीवर कुकर ठेवला.

"सौरभ, तू काय काम करतोस?" आईनं विचारलं.

"मी मदत... मदतनीसाचं काम करतो."

"म्हणजे रे काय?"

"मी भांडी घासतो."

त्याला वाटले, ताई कुकर लावतेय न् चपात्याही करतेय. तर आपण कट्ट्यावरची भांडी तरी घासावीत.

"हँऽ आलाय मोठा भांडी घासणारा." नीमा त्याला चिडवत म्हणाली.

"तुला काय वाटले. मला येत नाहीत भांडी घासायला? आई, मी एकदा कामवाली, चुकलं, चुकलं मदत... मदतनीस आली नव्हती तेव्हा तू घासली न् मी धुतली होती की नाही?"

सौरभ तावातावाने बोलत होता. आई कौतुकाने म्हणाली,

"हो रे, चांगली धुतली होतीस. मन लावून काम केले की चांगलेच होते."

"आज एकट्यानेच घासून आणि धुवून पण दाखवायची. कळलं?" नीमा

म्हणाली.

"तुम्ही करा आराम."

सौरभ चिडून नीमाला म्हणाला. त्याला ताईनं हुकूम केलेला अजिबात आवडला नाही.

"मी कणीक मळून चपात्या करतेय. भाजी पण करणारेय. तोपर्यंत घास भांडी."

नीमाने पीठाचा डबा, पाणी, परात घेतली. दोघांची स्वयंपाकघरात खुडबुड चाललेली. तेवढ्यात दारावरची घंटी वाजली. नीमाने दार उघडले तर शेजारच्या काकू.

"काय चाललंय. गावावरून कधी आलात?"

अशी चौकशी करत आई झोपली होती तिथं जाऊन बसल्या.स्वयंपाकघरातून मुलांचे तोंड आणि भांडी दोन्हीचे आवाज येत होते. काकू म्हणाल्या,

"मुलं काय करताहेत."

"चाललंय काय तरी."

"बघते तरी."

काकू उठून बघताहेत तर नीमा चपात्या करतेय अन् सौरभ भांडी घासतोय. आश्चर्याने काकू ओरडल्या,

"सौरभ तू भांडी घासली?"

"हो ऽ ताईनं स्वयंपाक केला, तोपर्यंत मी घासली भांडी, आज आईला सुट्टी."

काकू जवळ येऊन बघू लागल्या नीमाच्या चपात्या फुगत होत्या. करपत नव्हत्या. सौरभही व्यवस्थित चोळून भांडी धूत होता. आणि जाळीच्या टोपलीत पालथी घालत होता. काकू कौतुकाने म्हणाल्या.

"काय हुशार आहेत हो तुमची मुलं!"

"होच मुळी. माझी मुलं आहेत ती!"

आईही उठून आलेली. दोन्ही मुलांची गडबड बघत होत्या. आई म्हणाली,

"यासाठी तरी कधी कधी आजारी पडावं."

* * *

# श्रमदानातही मनोरंजन

दिवाळीची सुट्टी नुकतीच संपून शाळा सुरू झालेली. अभ्यासाचा म्हणावा तितका काच सुरू झाला नव्हता. रविवारी मुलं जेवून झाल्यावर थंडी वाजतेय म्हणून उन्हाला कठड्यावर गप्पा मारीत बसलेली. तेवढ्यात स्वप्नाली शिकवणीच्या वर्गावरून आली. मुलांनी दंगा केला. तिची नवी स्कुटी नुकतीच आणलेली.

"स्वप्नालीदीदी, आम्हाला गाडी दे ना, एकच चक्कर मारतो." वगैरे सुरू केले.




तिच्या चेहऱ्याकडे कुणाचे लक्ष नव्हते. ती खूपच घाबरलेली दिसत होती. तिला काहीतरी सांगायचे होते. पण मुलांनी नुसता गलका केला. रोहनच्या लक्षात आले. तेव्हा रोहन म्हणाला,

"स्वप्नालीदीदी तू का घाबरलीस, काय गं झालं ?"

"अरे केवढा मोठ्ठा साप त्या वळणावर आडवा गेला."

"बाप रे ऽऽ" असं म्हणत मुलं चिडीचीप.

"जोरात पळत होता. ब्रेक दाबला कचकन तर असा पुढून गेला. मी पडलेच असते पण वाचले.... पिवळाधमक होता."



स्वप्नालीचं बोलणं ऐकून आत्या बाहेर आल्या. त्यांनी विचारल्यावर स्वप्नालीने पुन्हा एकदा तोच पाढा वाचला.

ह्याचे त्याला, त्याचे ह्याला करता करता सोसायटीत सगळ्यांना कळले. स्वप्नालीच्या गाडीला साप आडवा गेला. मग सगळ्या

बायकांत चर्चा सुरू. गवत खूपच वाढलेय. आपली मुलंही क्रिकेट खेळतात आणि बॉल हुडकायला गवतात जातात. असल्या गचपनात काहीही बसलेलं असतं.

"आपणच गवत काढायचं का ? इथं काही महानगरपालिका लक्ष घालणार नाही."

"हो ना. आपला परिसर आपणच स्वच्छ ठेवायला हवा."

"काढूयात की. स्वच्छता होईल. इच्चू-काट्याची भीती तरी राहणार नाही."

असं म्हणत आत्यांनी भरभर काँग्रेसचं गवत काढायला सुरुवात केली. मग शेजारच्या जोशीकाकू, पवारकाकी, देशपांडेमामी, अशा सगळ्याच मदतीला आल्या. कामतआजीदेखील आल्या. गप्पा मारत कौतुक करू लागल्या. मुलं काढलेलं गवत नेऊन टाकत होती. सगळ्या बायका गवत काढत होत्या गप्पांना चांगलाच रंग भरला. कट्ट्यावर बसलेली मुलंही मग आपापल्या घरातली खुरपी, विळे, माती उकरणे काही सापडेल ते घेऊन येत होती. आता काम कमी, हात जास्त झाले. दोन तासात आवार साफसूफ झाले. सगळ्यांनाच खूप छान वाटत होते. गवत तर उगवतच राहणार. आणि त्या गवतात कचराही लोक टाकत राहणार. मग ठरले, भिंतीच्या कडेने माती टाकून झाडे लावूया म्हणजे खिडकीतून कोणी कचरा टाकायला धजवणार नाही.

झालं. भिंतीच्या कडेची सफाई सुरू झाली. सफाई झाल्यावर माती आणायला घमेली, पातेली घेऊन सगळे गेले. शेजारीच मैदान होते. मैदानाच्या कडेची माती आत्या, मामी, काकींनी उकरून दिली. स्वप्नाली, ज्योती वगैरे मुलींनी मोठेमोठे दगड घोळून बाजूला काढले. मुलांनी माती आणून भिंतीच्या कडेला टाकली. मामांनी मग कडेने विटा लावून पाणी मारले. आता कुणी कुठली रोपे आणून लावायचं ठरलं.

सगळे कसे मजेमजेने झाले. मुलांना बोलवावं लागलं नाही. हे करा, ते करा असं सांगावं लागलं नाही. खाऊ खाताना जसं तू तू मी मी करतात, तसंच काम करतानाही करत होते. मोठ्यांनी थोडासा वेळ काढून मुलांशी संवाद साधला तर ही लहानगी मुले इकडचा डोंगर तिकडे करतील. सामुदायिक श्रमदानाने मनोरंजनही होईल.

सगळ्या मुलांना आत्यांनी खाऊ दिला. खाऊ खाता खाता मुलं म्हणाली,

"आम्ही दर रविवारी एक-दोन तास अशीच साफसफाई करू."

"आत्या, आम्हाला खाऊ पण मिळायला हवा." तोंडात भडंगाचा बोकाणा भरत श्री म्हणाला.

"हो हो, असं सर्वांनी मिळून काम केलं की खाऊ तर मिळणारच की !"

"ये पण आत्यांनाच सारखा सारखा त्रास नको हं." ज्योतीताई म्हणाली.

"चालेल. आम्ही आमच्या घरचा खाऊ आणून, तो सगळे मिळून बाहेरच्या बाहेर स्वच्छ केलेल्या जागेत खाऊ." केतन म्हणाला.

"तोपर्यंत बाग तयार होतेय." अपूर्वा म्हणाली.

अशाप्रकारे दर रविवारी साफसफाई करण्याचे ठरवून मुले खेळायला पळाली.

* * *

# वाचाल तर वाचाल

"आई, बघ की पेपरमध्ये काय लिहिलंय, "वाचाल तर वाचाल! म्हणजे काय गं?"

गौरव हातात वर्तमानपत्र घेऊन आईकडे आला. गौरवची आई पोळ्या लाटत होती. तिने सकाळीच चहा पिताना पेपर चाळला तेव्हा ही बातमी वाचली होती. कुणीतरी थोर लेखकाने भाषणात सांगितलेले छापून आले होते.

"अरे दोन 'वाचाल' चे दोन वेगवेगळे अर्थ आहेत."

"दोन अर्थ?"

आश्चर्याने आधीच मोठे असलेले डोळे आखणीन मोठे करीत गौरव म्हणाला.

"हो, पहिल्या 'वाचाल' चा अर्थ, लिहिलेलं वाचाल तर आणि दुसऱ्या 'वाचाल' चा अर्थ चांगलं जगू शकाल. किंवा 'मरता मरता वाचाल' असं म्हणतो की नाही आपण, तसं."

गौरवच्या आईनं लाटलेली पोळी तव्यावर टाकली अन् कणकेचा उंडा करू लागली. दुसऱ्या उंड्याबरोबर दुसरा प्रश्न.

"पण आपण तर पोळी खाऊन, पाणी पिऊनच जगतोना ?"

"तसं नव्हे रे, जगायला खाणं पिणं आवश्यक आहेच. ते सगळेच सजीव करतात. पण ह्या सगळ्यांपेक्षा माणूस वेगळा आहे. बुद्धीमान आहे. विचार करणारा आहे. हो की नय!" आईनं दुसरी पोळी गोल लाटत म्हटलं.

"हसणारासुद्धा आहे." गौरवने भर घातली. "पण ह्यामुळे आपण वाचल्याशिवाय वाचू शकणार नाही हे कसं गं?"

उंड्याची पोळी जशी मोठी होत जातेय, तसे गौरवचे प्रश्न विस्तारत जात होते. गरम पोळीवर गुळतूप घालून त्याची गुंडाळी गौरवच्या हातात देत आई म्हणाली,

"बघ हं आता, आपण चांगलं चुंगलं खाल्लं की शक्ती मिळते. बुद्धी तरतरीत राहाते. तसंच वाचल्यामुळे आपल्या विचारांना दिशा मिळते. आपण अडाणी राहात नाही. चांगलं काय, वाईट काय ते कळतं. पोळी खाल्ल्यावर आपल्या पोटाची भूक भागते. तसं वाचल्यामुळे आपल्या बुद्धीची भूक भागते."

"मग काय होतं ?"

"मग ती आणखी काम करते, आपण हुशार होतो. त्यामुळे आपण चांगले नाही का जगणार!"

गौरवला पाणी देत आई म्हणाली.

"हो, पण मला वाचायचा खूप कंटाळा येतो, झोपच येते."

"टी. व्ही. बघताना नाही येत?"

"अजिबात नाही. उलट पळून जाते."

"बरं, मी तुला रोज गोष्ट वाचून दाखवीन."

"खरंच?" गौरवने खूश होत विचारले.

"खरंच. नंतर मात्र तुझं तुलाच वाचायला हवं."

"चालेल."

गौरव बाहेर पळाला. आता मिनी, टिटू, सोनू सगळ्यांना सांगत बसणार. म्हणजे दवंडी पिटणार.

गौरवच्या आईनं लहान लहान गोष्टींची पुस्तकं काढून, कुठलं कसय ते जरा चाळून ठेवलं.

संध्याकाळी बाबा आले की, लगेच दूध पिता-पिता गौरव म्हणाला,"बाबा, बाबा आई आता मला रोज गोष्ट वाचून दाखवणार आहे."

"अरे वा ऽ चांगली गोष्ट हीच! पण आम्हाला जेवायला मिळणार ना?" बाबा आईकडे पहात म्हणाले.

"तुम्हीच तुमचे जेवण करायचे, आजपासून." गौरवने दूध पिऊन पेला धुऊन



जागेवर पालथा घालता. काचेचा पेला भांड्यात ठेवला की फुटून जातो. म्हणून लगेच पेला धुऊन पालथा घालूनच ठेवायचा. अशी सवयच लावली होती आईने गौरवला.

"अरे बाप रे. मला कुठे जेवण करता येतं. फक्त खाता येतं." बाबा बिस्किट खात म्हणाले.

"मग तुम्ही गोष्ट वाचून दाखवा, आई स्वयंपाक करेल." गौरव म्हणाला "ही कल्पना छानय." चहाचा कप तोंडाला लावत बाबा म्हणाले.

गौरवने गोष्टीचे पुस्तक आणून बाबांकडे दिले, व म्हणाला, "चला आज टी. व्ही. बघायचा नाही." गौरवने बाबांना हाताला धरून नेले. तेव्हा, 'कशी जिरली' असं मनात येऊन आई गालात बारीक हसत होती.

गौरवच्या बाबांना रोज गोष्ट वाचून दाखवायचे काम लागले. एकदा बाबांनी त्याच्या पाठ्यपुस्तकातील मराठीच्या पुस्तकातील धडाच वाचून दाखविला. म्हणाले,

"मनोरंजन आणि अभ्यास, एका दगडात दोन पक्षी."

तेव्हापासून गौरव आईच्या मागे लागला.

"आई, तूच वाचून दाखव. बाबा नीट वाचत नाहीत."

"माझा स्वयंपाक होऊ दे, मग वाचते राजा." आई कुकर लावत म्हणाली.

स्वयंपाक झाला की जेवणं, मग झाकपाक, आवराआवरी. तोपर्यंत गौरवला झोप अनावर व्हायची. तो 'आई चल की.' अशी भुणभुण लावायचा. आई म्हणायची. 'तू सुरू कर वाचायला मी आलेच.'

असं करून गौरव वाचू लागला. पुस्तकातले परी, राक्षस वेगवेगळे प्राणी, पक्षी त्याला सारखे खुणावू लागले. एकेक दिवशी पूर्ण पुस्तक वाचून झाले तरी आईचं काम आवरायचं नाही. शेवटी त्याने आईच्या मागे लागण्याऐवजी स्वत:च गोष्टी वाचण्याचे ठरविले. चांगल्या गोष्टी ठरवूनच चिकाटीने कराव्या लागतात. म्हणजे त्याची सवय लागते. गौरवलाही पुस्तक वाचण्याची सवय लागली. चांगली पुस्तके बाबा आणून देत. ते वाचण्यात तो रमून जात. टी. व्ही. बघण्याचे आपोआप कमी झाले. वाचनामुळे गौरवाचा खूप फायदा झाला. सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे, त्याला निबंध सहज, व्यवस्थित लिहिता येऊ लागला. व्याकरण चांगले समजू लागले. बाकी विषयांचे आकलन चांगले होऊ लागले. सामान्य ज्ञान चांगले झाले. त्यामुळे त्याला अभ्यासाचा कंटाळा येत नव्हता. गौरव एक हुशार, अभ्यासू विद्यार्थी म्हणून ओळखला जाऊ लागला. एकूण काय वाचण्यामुळे त्याचे जगणे समंजस, अर्थपूर्ण झालं.

* * *

# चमत्कार

"आई गं ऽ खूप गुडघा दुखतोय. चालायला पण येईना." श्री रडत रडत म्हणाला.

"काय रे, काय झालंय गुडघ्याला?" आईने घाबरत विचारलं.

"बॉल लागलाय." मग चेंडू कसा कसा लागला वगैरे प्रात्यक्षिकासहित श्रीने आईला सांगितलं. पुन्हा विव्हळत म्हणाला. फार दुखतंय ग ऽ आईनं जरासं अमृतांजन चोळलं तरी ह्याचं विव्हळणं वाढतच चाललेलं.

"अरे आटप लवकर शाळेची वेळ झाली."

"आई आता कसं ग जाऊ? आ ऽ हा ऽ"

आईला वाटलं लागला असेल जोरात चेंडू, उगाच शाळेत काय झालं म्हणजे... बुडली एक दिवस शाळा तर काय बिघडत नाही. मग तिनं वेदनाशामक गोळी त्याला खायला दिली. आधी त्याला पोटभर जेवायला घातले. जेवून श्री खाटेवर आडवा झाला. तीन वाजेपर्यंत डाराडूर झोपला. उठल्यावर लंगडत लंगडत म्हणाला,

"पोहायला जातो मी."

"अरे पण गुडघा दुखतोय ना?"

"पोहातना कसा दुखेल? चालताना दुखतोय."

"मग जाणार कसा?"

"सायकलवरून."

लंगडत, लंगडत त्याने पोहण्याचे ओळखपत्र, कॉश्चूम, साबण, टॉवेल वगैरे गोळा करून पिशवीत भरू लागला. आईने काही मदत केली नाही. तरी गेला पोहायला. गुडघा दुखतोय तरी गेला पोहायला. नवीन शिकायला जायचा तेव्हा सारखी धुसफुस, पाणी गार लागतं. सर रागावतात, पाण्यात ढकलतात, खोलात जायला सांगतात, मला भीती वाटते, मी नाही जाणार.' वगैरे. काही वेळा तर आईला थांबवून घ्यायचा.

नंतर सुट्टीत मुलांच्याबरोबर जाऊन जाऊन सवय लागली. आता जरा वेळ मिळाला की पळतो. दोन वेळा दुप्पट पैसे देऊन पोहतो. शाळा तेवढी का नको

असते. कळत नाही. शाळेत जायचं म्हटलं की, त्याच्या अनंत तक्रारी. 'बसच येत नाही लवकर, गर्दी असली की थांबत नाही. रिक्षा लावू या म्हटलं की, "रिक्षावाला लवकर येत नाही, मुलांना कोंबून भरतो. स्कॉलरशीपची शिकवणी होईपर्यंत थांबत नाही, मग बसनेच यावे लागते. शाळेत नीट शिकवतच नाहीत, मुलं दंगा करतात."

"मग तू ही त्यांच्याबरोबर दंगा करत जा." एकदा आई म्हणाली.

"मला नाही आवडत तसली दंगामस्ती."

"मग कसली आवडते?" चिडवत आई म्हणाली.

"आँ ऽऽ" श्री चिडत ओरडला.

"त्याचं काय पण चालुदे, तू अभ्यास, वाचन करीत जा."

"गोंधळात लक्ष तरी लागेल का?"

अशा सारख्या कटकटी. शाळेत तरी जायलाच हवं. एक गोष्ट समजावून सांगितली की, त्याविरुद्ध हजार प्रश्न. त्याबद्दल लाखभर अडचणी सांगणार. घरात बस म्हटलं, तरी करमत नाही. खेळायला गेम नाहीत. पुस्तकं वाच म्हटलं की, अवघड भाषा असतेय, शब्दांचे अर्थ कळत नाहीत. असं सारखं किरकिरत रहायचा. श्रीच्या आईला वाटायचं. हा असं का करतोय ? ह्याच्यासाठी मी एवढं कष्ट करतेय, हवं नको ते पहातेय, तरी हा नेहमीच अस्वस्थ. काय करावं?

खरं तर श्रीनं एखादी गोष्ट मनात आणली तर सगळ्या अडचणीवर मात करून ती गोष्ट पूर्ण करतो. शाळेच्या बाबतीत मात्र हल्ली असं का करायला लागलाय ? शाळेतलं शिकवणं, शिक्षकांचा स्वभाव, मुलांची संख्या, त्यामुळे होणारं दुर्लक्ष. हे सर्व बदलणं अशक्य होतं. आणि शाळा बदलून तरी या गोष्टी बदलणार आहेत का? यावर उपाय तरी काय करावा? आई सारखा विचार करीत होती. जी गोष्ट आपल्या आवाक्याबाहेरची आहे ती स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय तरी असतो का? त्यामुळे एवढं सहन करायलाच हवं. पण हे त्याला पटवून कसं द्यायचं? वयात येताना असा बदल होतो हे त्याच्या आईनं कुठं कुठं वाचलेलं. पण अशावेळी नेमकं काय करायचं असतं हे तिला तरी कुठ माहीत होत? त्यामुळे त्याची आईही सध्या सारखी अस्वस्थ व्हायला लागलेली. अधून मधून उपदेश करायची. पण तो बोअरच व्हायचा. एकदा आईने त्याला सानेगुरुजींची गोष्ट सांगितली.

साने गुरुजी दापोलीला असताना, आईला भेटण्यासाठी भर पावसात, भरल्या ओढ्यातून, वादळ, अंधार असताना कसे आले. शिक्षणासाठी कुठे कुठे गेले, कसे राहिले, नंतर म्हणाली, तूच वाच ना पुस्तक, बघ की पूर्वीच्या लोकांना शिकण्यासाठी किती कष्ट पडायचे. केवढं खडतर आयुष्य होतं त्यांचं.

सुरुवातीला थोडं वाचून दाखवलं, नंतर त्याचं तो वाचू लागला. एखादा शब्द अडला तर आई किंवा बाबा अर्थ सांगायचे. पुस्तक वाचल्यापासून श्रीचा किरकिरा स्वभाव हळूहळू कमी झालाय. आता तो वेळेवर उठतो, मैदानावर खेळायला जातो, सूर्यनमस्कार घालतो, पोटभर असेल ते जेवतो. घरात असला की आईला मदत करतो. सगळ्या सोसायटीत श्री हा एक आदर्श मुलगा झाला आहे.

हा चमत्कार 'श्यामची आई' या पुस्तकाने झालाय की काय? म्हणून श्रीच्या आईनं 'श्यामची आई' पुन्हा नव्या जाणीवेनं वाचून काढलं. त्यामुळे तिच्यातही बदल झाला. ती घरात चिडचिड करेनाशी झाली. मदतनिसाबरोबर आपुलकीनं वागू लागली. खाडे केले तरी रागवेनाशी झाली. हल्ली घरात बरीच शांतता, प्रेमळ वातावरण पाहून बाबा मात्र बुचकळ्यात पडलेत, हा काय चमत्कार आहे म्हणून!

* * *



# घोळ्यामेळ्याने राहावं.

"ए बगळ्या, तू फिल्डींग करायचं." राजू बगळ्यावर गरजला.

"मी नाही रोज रोज, नुसतीच फिल्डींग करणार." बगळ्या रडवेल्या आवाजात म्हणाला.

"जास्त शहाणपणा करायचा नाय. तुझा नंबर आला की तू बॅटींग करायचंस समजलं?"

राजून दम भरला.

"माझा नंबर आला की तुम्ही खेळ बंद करता."

"खेळायचं असेल तर खेळ न्हायतर फूट." राजूने पायाजवळचा दगड बॅटने उडवून लावला. राजूची दमबाजी ऐकून बगळ्या मुकाट्याने लाँगलेगकडे जाऊ लागला. तसा राजू ओरडला,

"बगळ्या एक्स्ट्रा कव्हरकडे जा, चिंटू तू विकेटकिपर, श्री तू लाँगलेगकडे जा. कुलदीप तू बॉलींग करायचं." राजूने हुकूम सोडले.

हे नेहमी असंच असतं. राजूच्या मनात आलं की तो सगळ्यांना बोलावणार. राजू बोलावतोय म्हटल्यावर सगळे पटापटा गोळा व्हायचे. त्याचं क्रिकेटचं संपूर्ण कीट असल्यामुळे पहिल्यांदा बॅटींग त्यालाच. तो नंतरही त्याच्याच इच्छेप्रमाणे कुणालाही बॅटींग देणार. बगळ्या सगळ्यात लहानखुरा, हाडकुळा, भाबडा, वयानेही लहानच लिंबू-टिंबू. पण बगळ्याच्या आईची आणि राजूच्या आईची मैत्री. त्यामुळे बगळ्याची आई राजूला हक्काने सांगायची,

"अरे, राजू आमच्या बगळ्याकडे लक्ष ठेवत जा हं."

"काकू तो माझं ऐकत नाही मग कसं ठेवू लक्ष ?"

"काय रे बगळ्या, राजूदादाचं सगळं ऐकायचं, तू लहान आहेस."

त्यामुळे बगळ्याला राजूचं म्हणणं मान्य करावंच लागायचं. बाकीची मुलं राजूपेक्षा लहानच होती. त्यांच्याकडे पण साध्या लाकडी बॅटशिवाय फारसं काही नव्हतं. बॉलसुद्धा राजूचाच असायचा. राजूचे बाबा अगदी उदार आहेत. सगळ्या सोसायटीतली मुलं आपलीच आहेत, खेळू देत. ते राजूला एक चेंडू

हरवला की लगेच दुसरा नवा दगडी चेंडू आणून देत. राजूला चेंडूचं अतिशय वेड. चालायला लागल्यापासून चेंडूशी खेळायचा. झोपतानाही उशालाच चेंडू ठेवायचा. अभ्यासातही हुशार. एकदा घटक चाचणीच्या वेळी, सातवीत असताना, त्याला गणितात पैकीच्या पैकी गुण मिळाले होते. त्यावेळी त्याच्या बाबांनी त्याला क्रिकेटचे संपूर्ण किट आणून दिले होते. आणि सांगितले होते, "आपल्या सोसायटीतल्या सगळ्या मुलांना बरोबर घेऊनच खेळायचं. क्रिकेटमुळं किंवा कुठल्याही एकत्र खेळामुळं सांघिक भावना वाढते. तुमचा एक संघ तयार व्हायला हवा." वगैरे वगैरे.


असं बरंच सांगितल्यामुळं राजू सगळ्यांना बोलवायचा. मैदानावर मात्र त्याचीच दादागिरी चाले. तो मोठा म्हणून आणि त्याचं संपूर्ण कीट म्हणूनही मुलांना त्यांचं नाईलाजाने ऐकावेच लागे.

"बगळ्या, चिंटू, श्री, कुलदीप, अनिल चला सगळे."

राजूची आरोळी ऐकू आली. मुलं स्पोर्टशूज घालून मैदानावर निघाली. राजू बगळ्याला म्हणाला,

"बगळ्या, आज तू बॅटिंग करायचं, पहिल्यांदा."

बगळ्यासहित सगळ्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. बगळ्या गडबडून गेला. पहिल्या षटकातच कुलदीपने त्याची दांडी उडविली. नंतर श्रीला बॅटिंग दिली.



आज काय झालंय राजूला. स्वत: बॅटिंग न करता एक्स्ट्रा कव्हरकडे जातोय अन् सगळ्यांना बॅटिंगचा चान्स देतोय. शेवटी राजूचा नंबर आला. खरं तर खूप अंधारून आलेलं. पण राजूची बॅटिंग म्हटल्यावर मुलं गपचीप मैदानावर आपापल्या जागी उभी राहिली. तर राजूच म्हणाला, "आता अंधार पडलाय, आता राहू द्या. उद्या खेळू. चला घरी."

पुन्हा एकदा आश्चर्याचा धक्का. राजूने स्टंप उपसून घेतल्या. प्रत्येकाने काही ना काही घेतले. बगळ्याला बॅट किंवा स्टंपा खांद्यावर टाकून ऐटीत चालायची भारी हौस पण राजू त्याला बॅटला हात लावून द्यायचा नाही. त्याच्याकडे स्टंपा आणि बॅट देत राजू म्हणाला,

"घे, घरात ठेव जा."

मग काय बगळ्या पळतच गेला. स्टंपा आणि बॅट ठेवायला.

घराजवळच्या कठड्यावर कुलदीप, राजू गप्पा मारत बसले. ते दोघे एकाच वर्गात होते. कुलदीप खूप हुशार होता. वर्गात पहिला नंबर असायचा नेहमी. राजूला गृहपाठाच्या वेळी बरीच मदत करायचा. त्यामुळे राजू त्याच्याशी तेवढी दादागिरी करीत नसे. दोघांचं जमायचं छान. कुलदीपला त्याच्यात असा अचानक झालेला बदल जाणवला. त्याला विचारल्याशिवाय राहवेना. म्हणून तो म्हणाला,

"काय रे राजू, आज काय झालंय तुला, वेगळाच वागतोयस?"

"काही नाही, असच रे."

"तरी पण सांग ना विशेष कायेय?"

"अरे, काल मी अन् सतीशदादा बाजारात गेलो होतो. तर एक लंबा-चवडा माणूस आमच्यासमोर आला. सतीशदादाला पण लवकर ओळखायलाच आला नाही. त्याने एकदम सतीशदादाची कॉलरच पकडली. अन् म्हणाला, काय सत्या कसं चाललंय? तुझी तर रयाच गेली की रे! लहानपणी आम्हाला केवढा सतवायचास."

सतीशदादा कसला घाबरला. म्हणतोय कसा, अरे, तेव्हाची गोष्ट वेगळी. आता काय तू मोठा झालायंस. सगळ्याच बाबतीत! विसरून जा. असा गयावया करीत होता. मग तोच माणूस म्हणाला, जातो विसरून पण इथून पुढे ह्या लहानग्यांना सतवायचं नाही. अन् माझ्याकडे बघून म्हणाला. ह्याने तुम्हाला त्रास दिला तर मला सांगा. मी बघून घेईन. मला तर हसूच आलं. मग त्याने

आम्हाला चांगल्याशा हॉटेलमध्ये नेलं. पावभाजी खाऊ घातली. खाता खाता त्या दोघांनी गप्पा मारल्या. त्याचं ते वागणं बघितल्यावर, मी ठरवलं आता आपण उगाच कुणावर दादागिरी करायची नाही. आपली शक्ती चांगल्या कामासाठी खर्च करायची. दादागिरीसाठी नाही. आपण सगळे घोळ्यामेळ्याने राहायचे.'' राजू हे कुलदीपला सांगत असताना सगळेच तिथं आलेले. सगळे शांतपणे ऐकत होते. राजूचं बोलून झाल्यावर सगळ्यांनी एकसुरात, 'हुर्ये ऽ हिप हिप, हुर्ये ऽ' केले.

* * *

आज काय झालंय राजूला. स्वत: बॅटिंग न करता एक्स्ट्रा कव्हरकडे जातोय अन् सगळ्यांना बॅटिंगचा चान्स देतोय. शेवटी राजूचा नंबर आला. खरं तर खूप अंधारून आलेलं. पण राजूची बॅटिंग म्हटल्यावर मुलं गपचीप मैदानावर आपापल्या जागी उभी राहिली. तर राजूच म्हणाला, "आता अंधार पडलाय, आता राहू द्या. उद्या खेळू. चला घरी."

पुन्हा एकदा आश्चर्याचा धक्का. राजूने स्टंप उपसून घेतल्या. प्रत्येकाने काही ना काही घेतले. बगळ्याला बॅट किंवा स्टंपा खांद्यावर टाकून ऐटीत चालायची भारी हौस पण राजू त्याला बॅटला हात लावून द्यायचा नाही. त्याच्याकडे स्टंपा आणि बॅट देत राजू म्हणाला,

"घे, घरात ठेव जा."

मग काय बगळ्या पळतच गेला. स्टंपा आणि बॅट ठेवायला.

घराजवळच्या कठड्यावर कुलदीप, राजू गप्पा मारत बसले. ते दोघे एकाच वर्गात होते. कुलदीप खूप हुशार होता. वर्गात पहिला नंबर असायचा नेहमी. राजूला गृहपाठाच्या वेळी बरीच मदत करायचा. त्यामुळे राजू त्याच्याशी तेवढी दादागिरी करीत नसे. दोघांचं जमायचं छान. कुलदीपला त्याच्यात असा अचानक झालेला बदल जाणवला. त्याला विचारल्याशिवाय राहवेना. म्हणून तो म्हणाला,

"काय रे राजू, आज काय झालंय तुला, वेगळाच वागतोयस?"

"काही नाही, असच रे."

"तरी पण सांग ना विशेष कायेय?"

"अरे, काल मी अन् सतीशदादा बाजारात गेलो होतो. तर एक लंबा-चवडा माणूस आमच्यासमोर आला. सतीशदादाला पण लवकर ओळखायलाच आला नाही. त्याने एकदम सतीशदादाची कॉलरच पकडली. अन् म्हणाला, काय सत्या कसं चाललंय? तुझी तर रयाच गेली की रे! लहानपणी आम्हाला केवढा सतवायचास."

सतीशदादा कसला घाबरला. म्हणतोय कसा, अरे, तेव्हाची गोष्ट वेगळी. आता काय तू मोठा झालायंस. सगळ्याच बाबतीत! विसरून जा. असा गयावया करीत होता. मग तोच माणूस म्हणाला, जातो विसरून पण इथून पुढे ह्या लहानग्यांना सतवायचं नाही. अन् माझ्याकडे बघून म्हणाला. ह्याने तुम्हाला त्रास दिला तर मला सांगा. मी बघून घेईन. मला तर हसूच आलं. मग त्याने

आम्हाला चांगल्याशा हॉटेलमध्ये नेलं. पावभाजी खाऊ घातली. खाता खाता त्या दोघांनी गप्पा मारल्या. त्याचं ते वागणं बघितल्यावर, मी ठरवलं आता आपण उगाच कुणावर दादागिरी करायची नाही. आपली शक्ती चांगल्या कामासाठी खर्च करायची. दादागिरीसाठी नाही. आपण सगळे घोळ्यामेळ्याने राहायचे.'' राजू हे कुलदीपला सांगत असताना सगळेच तिथं आलेले. सगळे शांतपणे ऐकत होते. राजूचं बोलून झाल्यावर सगळ्यांनी एकसुरात, 'हुर्ये ऽ हिप हिप, हुर्ये ऽ' केले.

* * *

# अन्न हे परब्रम्ह

"आई, पावभाजी मस्तच झालीय हं."

मिलींद पावभाजीवर ताव मारताना म्हणत होता. त्याची आई मग खूश होऊन जाई.

"घे,ना." म्हणून त्याला आग्रह करीत होती. मिलींदने पोटाला तडस लागेपर्यंत पावभाजी खाल्ली. आता दूध, फळे काही नको.

मिलींदची आई शिक्षिका आहे. त्याच्या बाबांची नोकरी फिरतीची. आज ह्या गावाला उद्या त्या गावाला. घरात हे मायलेक दोघंच. आई मग रोजच्या रोज पोळी, भाजी, भात, आमटी असा सगळा स्वयंपाक करायची नाही. सुट्टीदिवशी मात्र खास बेत असायचा. पावभाजीच्या भाजीत जास्त भाज्या असतात. शिवाय घरात केल्यामुळे तेल, मसाले कमीत कमी वापरता येतात. पण त्या दिवशी मिलींद दूध, फळ न खाता फक्त असा पदार्थच भरपूर खायचा. दुपारी तेच खाल्लं, अन् मस्तपैकी ताणून दिली.

"टिंग ऽ टाँग ऽऽ"

दारावरच्या घंटीच्या आवाजाने मिलींद उठला. अनिल आला होता.

"मिलींद, आज माझ्या वाढदिवसाची पार्टी आहे. सात वाजता ये."

"हॅपी बर्थ डे टू यू. तुला गिफ्ट काय आणू रे?" अनिलचा हात हातात घेत मिलींद *म्हणाला.*

"काहीही! मोकळा आलास तरी चालेल."

"मोकळ्या हाताने आई येऊ देणार नाही, पण मोकळ्या पोटाने मात्र नक्कीच येणार आणि भरपूर खाणार."

"खा की मग, आई मिसळ करणारेय. ये रे. जातो मी. बाय."

असं म्हणून अनिल गेला. मिसळ म्हटलं की मिलींदच्या तोंडाला पाणी सुटलंच. अनिलला पेन आणायचा म्हणून त्याने आईकडून पैसे घेऊन निघाला. आई म्हणाली,

"एवढं दूध पिऊन जा."

"काय आई, दूध प्यायल्यावर मिसळ, केकला इथे जागा राहिल का?"

पोटाकडे हात दाखवून मिलींद म्हणाला,

"झोपताना पिईन."

"बरं बाबा." आई तिच्या कामाकडे वळली.

अनिलच्या आईनं मिसळ, केक, गुलाबजामून, चॉकलेट असा मस्त बेत ठेवलेला.

आग्रह करकरून सर्व मुलांना खाऊ घातलं. मिलींद घरी आला. तो अंथरूणावर आडवाच. दूध नाही की केळ नाही. अभ्यास उद्या सकाळी लवकर करतो म्हणाला. सकाळी लवकर उठून अभ्यास पूर्ण केला. आईने केलेली पोळीभाजी कशीतरी पाण्याच्या घोटाबरोबर गिळली नी शाळेत गेला. शाळेच्या जवळच कोपऱ्यावर चाट गाडी होती. तिथं मधल्या सुट्टीत चाट खाल्ला. डबा तसाच राहिला. घरी आल्या, आल्या आईपुढे डबा ठेवत म्हणाला, "आई, किती गं तिखट उसळ होती. मी नाही खाल्ला डबा. मला भूक लागलीय. पटकन काहीतरी खायला दे ना."

मिलींदचा कांगावा लक्षात यायला आईला वेळ नाही. तिही आताच दमून आलेली.

"मिलींद आत्ता दूध घे. तोपर्यंत मी करते काय तरी."

गॅसवर एका बाजूला दूध आणि एका बाजूला चहाला आधण ठेवत आई म्हणाली.

"नुसत्या दुधाने ढवळतं पोटात. बिस्किटं तरी आहेत का?"

"नाही रे संपलीत. असली म्हणजे पोटभर खातोस."

"आई, किती भूक लागलीय!"

मिलींद रंडकुंडीला आला.

"मग डबा खा ना."

"तिखट जाळ उसळीचा डबा नको मला."



# अन्न हे परब्रम्ह

"आई, पावभाजी मस्तच झालीय हं."

मिलींद पावभाजीवर ताव मारताना म्हणत होता. त्याची आई मग खूश होऊन जाई.

"घे,ना." म्हणून त्याला आग्रह करीत होती. मिलींदने पोटाला तडस लागेपर्यंत पावभाजी खाल्ली. आता दूध, फळे काही नको.

मिलींदची आई शिक्षिका आहे. त्याच्या बाबांची नोकरी फिरतीची. आज ह्या गावाला उद्या त्या गावाला. घरात हे मायलेक दोघंच. आई मग रोजच्या रोज पोळी, भाजी, भात, आमटी असा सगळा स्वयंपाक करायची नाही. सुट्टीदिवशी मात्र खास बेत असायचा. पावभाजीच्या भाजीत जास्त भाज्या असतात. शिवाय घरात केल्यामुळे तेल, मसाले कमीत कमी वापरता येतात. पण त्या दिवशी मिलींद दूध, फळ न खाता फक्त असा पदार्थच भरपूर खायचा. दुपारी तेच खाल्लं, अन् मस्तपैकी ताणून दिली.

"टिंग ऽ टाँग ऽऽ"

दारावरच्या घंटीच्या आवाजाने मिलींद उठला. अनिल आला होता.

"मिलींद, आज माझ्या वाढदिवसाची पार्टी आहे. सात वाजता ये."

"हॅपी बर्थ डे टू यू. तुला गिफ्ट काय आणू रे?" अनिलचा हात हातात घेत मिलींद म्हणाला.

"काहीही! मोकळा आलास तरी चालेल."

"मोकळ्या हाताने आई येऊ देणार नाही, पण मोकळ्या पोटाने मात्र नक्कीच येणार आणि भरपूर खाणार."

"खा की मग, आई मिसळ करणारेय. ये रे. जातो मी. बाय."

असं म्हणून अनिल गेला. मिसळ म्हटलं की मिलींदच्या तोंडाला पाणी सुटलंच. अनिलला पेन आणायचा म्हणून त्याने आईकडून पैसे घेऊन निघाला. आई म्हणाली,

"एवढं दूध पिऊन जा."

"काय आई, दूध प्यायल्यावर मिसळ, केकला इथे जागा राहिल का?"

पोटाकडे हात दाखवून मिलींद म्हणाला,

"झोपताना पिईन."

"बरं बाबा." आई तिच्या कामाकडे वळली.

अनिलच्या आईनं मिसळ, केक, गुलाबजामून, चॉकलेट असा मस्त बेत ठेवलेला.

आग्रह करकरून सर्व मुलांना खाऊ घातलं. मिलींद घरी आला. तो अंथरूणावर आडवाच. दूध नाही की केळ नाही. अभ्यास उद्या सकाळी लवकर करतो म्हणाला. सकाळी लवकर उठून अभ्यास पूर्ण केला. आईने केलेली पोळीभाजी कशीतरी पाण्याच्या घोटाबरोबर गिळली नी शाळेत गेला. शाळेच्या जवळच कोपऱ्यावर चाट गाडी होती. तिथं मधल्या सुट्टीत चाट खाल्ला. डबा तसाच राहिला. घरी आल्या, आल्या आईपुढे डबा ठेवत म्हणाला, "आई, किती गं तिखट उसळ होती. मी नाही खाल्ला डबा. मला भूक लागलीय. पटकन काहीतरी खायला दे ना."

मिलींदचा कांगावा लक्षात यायला आईला वेळ नाही. तिही आताच दमून आलेली.



"मिलींद आत्ता दूध घे. तोपर्यंत मी करते काय तरी."

गॅसवर एका बाजूला दूध आणि एका बाजूला चहाला आधण ठेवत आई म्हणाली.

"नुसत्या दुधाने ढवळतं पोटात. बिस्किटं तरी आहेत का?"

"नाही रे संपलीत. असली म्हणजे पोटभर खातोस."

"आई, किती भूक लागलीय!"

मिलींद रंडकुंडीला आला.

"मग डबा खा ना."

"तिखट जाळ उसळीचा डबा नको मला."

"ब्रेड आणतोस का?"

"आणतो, दे पैसे."

असा सूर की ब्रेडही नकोय पण नाइलाजाने आणतोय. आईनं वीस रूपये दिले.

"आई, उरलेल्या पैशाची भेळ खाऊ?"

"खा. बाबा."

स्वत:जवळचे थोडे पैसे घालून मिलींदने भेळ खाल्ली. घरी आल्यावर चहा आणि ब्रेड खाल्ला. जेवणाला सुट्टी. केळ दिलं तर,

"किती मऊ झालंय, काळंच पडलंय."

सफरचंद गोडच नाही, संत्र आंबटचय. हे असं नेहमीच सुरू. चार दिवसात जर बाहेरचं किंवा चमचमीत काही खाल्लं नाही तर लगेच मिलींद बेचैन व्हायचा. आकांडतांडव करायचा. बाहेरचं खाण्याची त्याला चटकच लागली होती.

आज सकाळपासून मिलींदला मळमळत होतं. म्हणून तो शेवटच्या बाकावर बाईंना विचारून बसला. त्याचं कशातच लक्ष लागेना. पोटातही दुखायला लागलेलं. सहनच होईना. शेवटी तो बाईंना म्हणाला,

"मी घरी जाऊ का बाई? पोटात खूप दुखतंय."

"अरे पण घरी तुझी आई नसणार, त्यापेक्षा इथेच शिक्षक खोलीत थांब."

"नको घरी जाऊन झोपतो म्हणजे बरं वाटेल."

"आईला निरोप पाठवू का?"

"नको, संध्याकाळी येईलच की, तोवर कमी होईल."

घर जवळच होतं. मिलींद पाठीवर दप्तराचं ओझं घेऊन निघाला. घरी आल्यावर झोपला. पोट दुखणं वाढतच चाललेलं. आई येईपर्यंत कसेतरी झोपून, झोपावंसं वाटेना की इकडं तिकडं करत वेळ काढला. रडूनरडून चेहरा सुकला होता. डोळे लाल झाले होते. आईच्या वाटेकडे डोळे लावून बसलेला.

एकदाची आई आली. त्याची ती अवस्था पाहून भयंकर घाबरून गेली. आईला बघून मिलींदचे रडणे जोराजोरात सुरू झाले. आईने कोपऱ्यावरून रिक्षा आणली. त्याला दवाखान्यात नेलं. त्याच्या रडण्यामुळे डॉक्टरांनी त्याला लगेच तपासायला घेतले. लवकर आराम पडावा म्हणून इंजेक्शन दिलं. औषधं लिहून दिली. डॉक्टर म्हणाले,

"काय रे, तू बाहेरचं नेहमी भेळबिळ असलं गाड्यांवरचं, उघड्यावरचं खातोस

का?''

''हो.'' मिलींद खरं बोलला.

मिलींदच्या असह्य पोटात दुखत होतं, त्यामुळे त्याला थापही मारता येईना.

''हे बघ, आता बाहेरचं खाणं बंद कर. रोज नीट चावून पोळीभाजी, भाकरी, पालेभाजी, उसळी, सॅलड, कोशिंबीर, दूध, ताक, दही असंच खायचं. मैदानावर भरपूर खेळायचं. तुला सूर्यनमस्कार येतात का?''

''हो, येतात की पण रोज घालत नाही.'' आई म्हणाली.

''आता तू बरा झालास की, रोज सूर्यनमस्कार घालायचे. तोपर्यंत मी दिलेली औषधं नीट घ्यायची आणि फक्त वरणभातच खायचा.''

''डॉक्टर, फार गंभीर आहे का?'' काळजीने आईने विचारले.

''नाही, फार नाही. बरं वाटेल. उघड्यावरचं खाणं, तळलेलं मसालेदार देऊ नका. त्यामुळे पचनक्रिया बिघडते.''

मिलींदच्या आईला फार अपराधी वाटलं. नोकरीमुळं आपण त्याच्याकडे लक्ष देऊ शकत नाही. त्याला शिस्त लावू शकत नाही. मिलींदला आईच्या मनातलं कळाल्यासारखं तो म्हणाला,

''डॉक्टरकाका, मी आता बाहेरचं खाणं बंद करेल. फक्त घरातलंच आईनं केलेलंच खाईन.''

इंजेक्शन टोचल्यामुळं त्याला बराच आराम पडला होता.

''हो रे. नेहमी आईच्या हातचं खावं. म्हणजे तब्येत स्ट्राँग होईल.'' डॉक्टर म्हणाले.

''आभारी आहे डॉक्टर तुमची. येतो आम्ही.'' आई म्हणाली.

''डॉक्टरला येतो कधी म्हणू नये.'' डॉक्टर म्हणाले.

''हो, जातो.'' आई हसत म्हणाली.

* * *

# ओसामा बिन लादेनची मुलाखत!

बाहेर पाऊस पडत होता. रोहित बाबांच्याजवळ युद्धाच्या बातम्या बघत बसलेला. इतक्यात टिंगऽ टाँग ऽ दारावरची घंटी वाजली.

आता यावेळी पावसात कोण पाहुणे आले असतील? रोहितच्या आईला प्रश्न पडला. रात्रीची जेवणं नुकतीच झाली होती. स्वयंपाकघर आवरायचं चाललं होतं.

"रोहित बघ रे कोणय?"

बाबांनी रिमोटवरून चॅनेल बदलत म्हटलं. रोहितने दरवाजा उघडला. तर बाबांचे दोघेतिघे मित्र, सोसायटीतच रहाणारे.

"अरे, काय चालवलेस इथेच असून महिनाभरात दर्शनही नाही. म्हणून भर पडत्या पावसात तुला भेटायला आलो."

"अरे, बसा, बसा. बरं झालं आलात ते. या युद्धामुळे कामाची ही धांदल वाढलीय. त्यात पाऊस. मग कुठे कसा भेटणार?"

"अरे संपले आता एकदाचे युद्ध. आपल्या सोसायटीकडून कितीची मदत पाठवायची, ते ठरवू."

"तुम्ही ठरवा. मी किती देऊ?"

युद्धाबद्दलच्या गप्पा चाललेल्या. मग रोहित तिथेच बसला. तेवढ्यात 'रोहित' म्हणून आईनं हाक मारली. रोहित आत आला. त्याला कारगिलच्या युद्धातील जवानांच्या गप्पा ऐकायच्या होत्या. तो कुरकुरतच आईला म्हणाला.

"काय गं, बसतो की थोडा वेळ."

"काही नको. उद्या लवकर उठून पोहण्याच्या तलावावर जायचंय. आता सर्दी कमी झालीय. जवानांसारखं शूर व्हायचंय ना तुला?"

रोहित मुकाट्याने झोपण्याच्या खोलीत गेला. अंथरूणावर मांडी घालून बसला. डोळे मिटले. झोपताना तो प्रार्थना करीत असे. आईने त्याला तशी सवयच लावली आहे. दोन मिनीटं झाली की, आई सांगायची. मग तो झोपायचा. आज जरा तंद्रीतच होता. प्रार्थनेच्याचवेळी त्याला युद्धच आठवत होतं. सकाळीच


ओसामा बिन लादेन याच्याबद्दल वर्तमानपत्रात वाचलं होतं. विसाव्या शतकातला व्हिलन, त्याचे ते थरारक जगणे, रोहितला सारखे रोमांचित करत होते.

'एवढा साधा रहाणारा अल्लाचा भक्त इतका निष्ठूर कसा होऊ शकतो? अल्ला त्याला सद्बुद्धी देत नसेल का?' असे प्रश्न मनात घोळवतच रोहित झोपी गेला. त्याच विचारांचे स्वप्न त्याच्या कोवळ्या डोळ्यात अवतरू लागले. त्याला स्वप्न पडले,

'रोहितने आणि त्याच्या मित्रांनी एक हस्तलिखीत अंक काढायचे ठरवले. मोठ्या, मोठ्या हिरो, कलावंत, लेखक यांच्या मुलाखती घेऊन ते अंकात छापायचे. अंकविक्रीतून मिळणारे पैसे कारगिल युद्धाला पाठवायचे. हस्तलिखिताचे नाव, 'सुपर सेव्हन' असे ठेवायचे ठरले. सातजण होते ना म्हणून. रोहितची आई म्हणाली,

"अरे मराठी नाव ठेवा की. आपण मराठी माणसं ना!"

मग सगळेजण विचार करू लागले. तगडं नाव काय ठेवायचं ते. सोप्पं पण पाहिजे, तोंडात बसायला पाहिजे. वगैरे, वगैरे, एकेकाच्या डोक्यातून भन्नाट कल्पना निघायची. उत्तम सात, सप्तनायक, सप्तक, सप्तसूर, शक्तीसात, सप्तशक्ती, सप्तमी, सप्तर्षी, सप्तगण, सप्ततारा. असे एकेकजण नाव सुचवायचे. शेवटी



उच्चारायला सुटसुटीत आणि अर्थपूर्ण असं, 'सप्ततारा' हेच नाव नक्की झालं. आई म्हणाली, "आकाशातल्या ताऱ्याप्रमाणे चमकायला हवीत माझी ही सात पोरं."

"मी ओसामा बिन लादेनची मुलाखत घेणार." रोहित म्हणाला.

"हॅ ऽ हॅ ऽ बघा आलाय शत्रुची मुलाखत घेणारा." केतन म्हणाला.

"शत्रुची मतं नको का कळायला? या लढाईच्या मागे तो का आहे हे तरी जगाला कळेल." रोहित.

"पण तू जाणार कसा त्याच्यापर्यंत?" विनय.

"मी आधी त्याला फोन करीन."

सगळेजण खीं ऽ खीं ऽ करून हसायला लागले. रोहित उठला, घराकडे निघाला. तेजसने हाक मारली. पण त्याने मागेही वळून बघितले नाही. घरी आल्यावर त्याने आंतराष्ट्रीय फोनची दैनंदिनी बाबांच्याकडून मिळवली. रोहितचे बाबा सी. आय. डी. क्राईम गुन्हे अन्वेषण विभागात डी. एस. पी. असल्यामुळे त्याला हे सहज जमले. त्याने बाबांच्या मदतीने बिन लादेनला फोन लावला. आश्चर्य म्हणजे फोन लागला. पण त्याच्याशी बोलणार कुठल्या भाषेत? बाबा म्हणाले

"हिंदीत बोल. दुभाषाकरवी. आता बील किती येईल या काळजीने माझ्या छातीत तोफगोळे उडू लागलेत."

"बाबा ऽ प्लीज. बाबा, मी रोहित ऐवजी रोशन नाव सांगू का?"

"त्याने काय फरक पडणारेय?"

"बघाच तुम्ही."

"हॅलो ऽ"

" मैं रोशन बात करता हूँ."

"कहाँ से ऽ" पलीकडून प्रश्न.

"भारत सें."

"काय काम?" इंग्रजीतून प्रश्न.

" हे पहा मला इंग्रजी बोलता येत नाही. मला ओसामा साहेबांशी बोलायचं आहे. आमच्या, 'सप्ततारा' साठी मुलाखत घ्यायचीय."

बऱ्याच वेळाने पलीकडून हिंदीत बोलणे ऐकू येऊ लागले. पुष्कळ चौकशी केली. शेवटी, 'ओसामा बिन लादेन मुलाखत द्यायला तयार आहेत. आपणाला

अफगाणिस्तानात यावं लागेल.'

"हो, हो मी यायला तयार आहे. पण येऊ कसा?"

"आमचे विमान तुला न्यायला येईल. तू अगदी मोकळं यायचं. तुझ्या रक्षणाची जबाबदारी आमची. पण भारतातून तुला विमान इकडे आणू शकणार नाही. तेव्हा तू, अमेरिका, कराची, दुबई, सिंगापूर वगैरे देशातल्या कुठल्याही विमानतळावर एकटा ये."

"बरं, बरं, मी प्रयत्न करतो."

रोहितने फोन ठेवला. पण परदेशांत जायचे कसे हाच मोठा प्रश्न पडला. बाबांनी विचारलं,

"काय म्हणला मग, ओसामा बिन लादेन."

"इकडे या मग देतो म्हणाला, मुलाखत."

"जा की मग."

"कसं जायचं ओ बाबा?"

"अरे पासपोर्ट, व्हिसा लागतो परदेशात जायला. ते मिळेपर्यंत दोन वर्ष जातील. तू आपला त्याचा नाद सोड."

"बाबा, मला त्याला विचारायचंय, माणसं मारणं हे खऱ्या धर्माचं काम आहे का?"

"त्याला असं विचारशील तर तुलाच मारेल तो!"

"मघाशी त्यांनी फोनवर सांगितलंय ना, रक्षणाची जबाबदारी त्यांचीय म्हणून."

"अरे पण तुला एकट्याला मुळीच नाही पाठवणार आम्ही."

रोहित मग आईकडे गेला. तिला म्हणाला, "आई, दुबईला आपलं कोणतरी आहे ना गं?"

"आहेत. खूप लांबचे नातेवाईक आहेत ते. म्हणजे बघ, माझ्या मावसबहिणीच्या नवऱ्याची आतेबहिण का कोण तरी आहे. दागिन्यांनी झगमगत होती. म्हणूनच लक्षात राहिली."

"आपण त्यांच्याकडे जाऊया का?"

"खुळा की काय, ओळखही नाही. खर्च किती येईल त्याचं काय?"

"मग मी एकटाच जाईन. त्याशिवाय मला त्याची मुलाखत घेता येणार नाही."

"अरे पण तू अजून किती लहान आहेस. त्या खतरनाक आतंकवाद्याची

मुलाखत म्हणजे, मगरीच्या तोंडात जाऊन हरणाच्या पाडसाने दात मोजणे.''

''आई, बाबा, तुम्ही मला मदत करणारेय का नाही?''

रोहित रुसून बसला. मग आई-बाबांनी बोलून ठरवलं दुबईपर्यंत जायचं.

सर्व तयारी झाली. रोहित आणि त्याचे आईबाबा दुबईला निघाले. मुंबई विमानतळावर निरोप घ्यायला त्याचे मित्र, बाकीचे सुपर सिक्स आलेले. आपल्या मासिकाचा अंक आता प्रचंड खपणार, म्हणून सगळे खूश होते. रोहितला सगळे, ''बेस्ट ऑफ लक' म्हणत होते. नातेवाईकांनीही यशस्वी हो, जपून जा, सांभाळून राहा, वगैरे सूचना न विसरता वारंवार केल्या.

सगळे सोपस्कार झाल्यावर ते विमानात चढले. पोटाला पट्टे आवळले. रोहितला छातीत धडधडू लागले. पण आता काय करणार? अंगावर घेतलेलं काम पार पाडायलाच हवं. आता ढेपाळून नाहीच चालणार. 'प्राण जाई पण वचन न जाई' असं काहीतरी आठवलं आणि त्याला स्फुरण चढले.

दुबईला आल्यानंतर फोनाफोनी झाली. ओसामा बिन लादेनच्या भेटीची काय, कशी तरतूद केलीय याची नीट चौकशी केली. मग विमान कधी येणार, कुठे येणार वगैरे सगळं व्यवस्थित ठरलं. ठरल्या दिवशी त्यांच्याकडील विमान येईल, त्यात एकटा रोहित बसून जाईल...

आज रात्रभर रोहितला झोप नव्हती. मुलाखतीचा उद्याचा दिवस कसा उजाडतोय, आपण जिवंत परत येऊ का, आपल्याला बोलायचं नीट जमेल ना, असे अनेक प्रश्न सतावत होते. या प्रश्नांच्या युद्धाने रोहित बेचैन झालेला. रोहितचे आईबाबा तर भयंकर काळजीत होते. पण बालहट्टापुढे काय करणार?

सकाळी सर्वांनी आवरले. दुबई विमानतळावर रोहितला निरोप देण्यासाठी आईबाबा गेले. रोहितची कडक तपासणी झाली. अकराबारा वर्षाचा मुलगा एवढा धीट कसा काय? आणि एवढा राक्षसी ताकदीचा ओसामा, ह्या चिमुकल्या भारतीय मुलाला मुलाखत द्यायला कसा तयार झाला? ह्याचेच सगळ्यांना सर्वांना आश्चर्य वाटत होते. रोहितच्या आईला सारखं रडूच येत होती. ती मनातल्या मनात सारखी देवाची प्रार्थना करीत होती.

ओसामा बिन लादेनचं विमान आकाराने इतर विमानापेक्षा छोटं होतं. त्या छोट्याशा विमानात बसल्यावर रोहितच्या पोटाला पट्टा तर बांधलाच पण डोळ्यावर जाड पट्टीही बांधली. तशी अटच होती. विमानातून उतरल्यावर त्याला कुठेतरी नेण्यात आले. नंतर मुबलक पायऱ्या उतरून आल्यावरच त्याच्या डोळ्यावरची

पट्टी सोडण्यात आली. पट्टी सोडल्यावर झगझगीत प्रकाशाने त्याचे डोळे दिपले. उजेडाला डोळे सरावल्यावर त्याला साध्या स्टुलावर, पांढऱ्या कपड्यात ओसामा बिन लादेन स्थानापन्न झालेले दिसले. रोहितला फार आश्चर्य वाटलं. त्या खोलीत भव्य दिव्य असं काहीच नव्हतं. भीती तर अजिबात वाटत नव्हती. रोहितने स्वत:ला सावरत आपली खरी ओळख सांगितली. दुभाषाकरवी दोघांची मुलाखत सुरू झाली.

"ओसामासाहेब, तुम्ही खूप श्रीमंत आहात, तुम्ही अमेरिकेत इंजिनियरची पदवी घेतली. काही काळ तिथं काम सुद्धा केलंय. मग अचानक धर्माच्या नावाखाली असा विध्वंस करावासा कसा काय वाटला? धर्म तर नेहमी माणुसकीनं वागायला शिकवतो."

"मैं अल्ला का बंदा हूँ. बस मुझे इस बारे मे जादा बात नही करना.

"ठीकेय. तुम्ही एवढे साधे का राहाता?"

"मी अल्लाचा सेवक आहे. अल्लाच्या कामासाठी माझा जन्म झाला आहे. अल्लाला चैन, ऐशआराम बिलकुल पसंद नाही."

"आपल्याला पकडण्यासाठी अमेरिकेने चार कोटींचे बक्षीस लावले आहे, यावर आपले मत काय?"

"अमेरिका आमचा शत्रू आहे. इस्लामचा शत्रू आहे. नेक काम करणाऱ्याला संकटे येणारच. अल्ला सलामत रखेगा."

"आपण भारताशी युद्ध का पुकारले? भारतदेश तर अलिप्त राष्ट्र आहे."

"आम्ही सगळे जग इस्लाममय करणार आहोत. पाकिस्तानला मदत म्हणजे इस्लामला मदत, अल्लाचे काम."

"पण त्यामुळे निरपराध लोकांचे बळी जातात त्याचे काय?"

"अरे बच्चू, या धर्मकार्यात जेवढे बळी जास्त तेवढे पुण्य अधिक, यश अधिक."

"ओसामासाहेब आपली दिनचर्या सांगता का?"

"इतर धर्मनिष्ठांप्रमाणेच मी लवकर उठतो. अल्लाची प्रार्थना करतो. दिवसातून पाच वेळा नमाज पढतो. पवित्र धर्मग्रंथांचं पठण करतो. पूर्वी मी नियमित व्यायाम व घोड्यावरून रपेट करायचो. पण रशियनांशी झालेल्या लढाईत थोडासा अधूपणा आलाय त्यामुळे आता व्यायाम बंदच असतो."

"आपल्या खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी?"

"मी सकाळी नाष्ट्याला अफगाणी पराठा दही व काळा चहा घेतो. तर दुपारी जेवणात एखादेदुसरे फळ आणि दूध घेतो. रात्रीचं जेवण हलकं व साधं असतं. मांसाहार विशेष आवडत नाही. मद्यपान, धुम्रपान कधीच करत नाही."

"आपण एक धनवंत कुबेर पुत्र असून एवढं साधं खडतर आयुष्य जगताहात. अल्ला आपल्याला सद्बुद्धी देवो. सदा सलामत रखो. मी आपला आभारी आहे."

रोहित उठला. तसं ओसामा बिन लादेनने त्याचं कौतुकाने कपाळाचं चुंबन घेऊन आलिंगन दिलं. आणि म्हणाला,

"बोल बेटा, तुला काय बक्षीस देऊ?"

"मला काही नको. पण आपण काश्मीर प्रश्नात पाकिस्तानला मदत करू नये. काश्मीर आमचे प्राण आहे. काश्मिरीही भारताचेच आहेत. भारतात इस्लामला बिलकूल खतरा नाही. कृपया आपण समजून घ्यावं."

रोहित अजिबात न घाबरता तळमळीनं बोलत होता. खरं तर त्याला पाकिस्तान किती वाईट आहे, हेच सांगायचे होते, पण त्याने स्वतःला आवरले.

"ओके, ओके." असं म्हणत ओसामाने रोहितला निरोप दिला.

त्याच्या डोळ्यावर पुन्हा जाड पट्टी बांधली. त्याने सगळे कागद नीट सांभाळून घेतले. आता पायऱ्या चढाव्या लागल्या. तो पायऱ्या मोजू लागला. त्याची चांगलीच दमछाक झाली. किती पायऱ्या, एक, दोन, तीन... एकशे अकरा, एकशे बारा, एकशे तेरा, एकशे चौदा, एकशे पंधरा...'

रोहितची आई चहाचा ट्रे दिवाणखान्यात ठेवून रोहितला उठवायला गेली. तर हा आपला अंक मोजतोय. तिने रोहितला हलवून जागे केले. अन् म्हणाली,

"एवढे कसले अंक मोजतोय? किती धापा टाकतोयस? स्वप्नात पण कसले खेळ खेळता काय माहीत?"

त्याच्या शेजारी बसत आई बडबडली. तिला काय माहीत रोहितचे स्वप्न कसले थरारक अनुभव देणारे होते. तो आभाळाला गवसणी घालून आला होता. एका खतरनाक दहशतवाद्याची मुलाखत घेऊन आला होता ते. तो आईच्या कुशीत शिरून झोपला. आणि विचार करू लागला. आपण ही मुलाखत लिहून काढायची असं त्यानं ठरवलं.

* * *

# झाडावर चढून खा आंबे

एक छोटसं खेडेगाव. गावाच्या शेजारून नदी वहाते. नदीच्या पाण्याने शेती पिकत, डोलत, बहरत. गावातील शेतकरी खाऊन पिऊन सुखी होते. तर अशा गावात एक वाडा होता. त्यांची नदीच्या किनारी भरपूर शेती होती. त्यात ऊसही पिकायचा. ऊसामुळे चार पैसे खिशात खुळखुळत. वाड्यात आईबाप, आजीआजोबा, लेकीसुना, नातवंडे असा मोठा गोतावळा नांदत असे. काही मोठी मुले तालुक्याच्या गावात शिकत. सुट्टीत ही शिकणारी मुलं, लेकींची मुलं, असा सगळा गोतावळा आला की आजी आजोबा मुलांत रमून जात. आजोबांनी नदीकिनारी अनेक प्रकारची झाडे लावलेली. त्यात आकाशाला भिडणारी निलगिरीची झाडे होती, लाल हिरव्या पानांची बदामाची झाडे होती, गोड पेरूची झाडे होती, गच्च लगडणाऱ्या चिकूची झाडे होती, लालकेसरी फुलांनी बहरलेली डाळींबाची झाडे होती, बेल, चाफा, गुलमोहर, मोगरा, जास्वंद, चिंच, निंब, अशी कितीतरी झाडे होती. वेली उभ्याआडव्या डोलत होत्या. उत्तरेला कळकाचं हिरवंगार बेट माजलं होतं. पश्चिमेला भलंमोठं, डेरेदार रसदार आंब्याचं झाड होतं. बागेशेजारी एक झोपडी सारखं छप्पर असलेलं छोटं घर असल्यामुळं आजी सकाळीच रानात यायच्या. रानात आल्या की, नेहमी बागेत जाऊन बसत. देवासाठी त्या रोज बेल, फुले नेत. आजींना झाडावर कुणी चढलेलं मात्र चालायचं नाही. कधी कोण झाडावर चढले तर आरडाओरडा करून गाव गोळा करत. त्यांच्या कुठल्यातरी नात्यातल्या, कुणाचा तरी, झाडावरून पडून पाय मोडलेला. त्यामुळे



त्या बाबतीत आजी हळव्या झालेल्या. कोणीही झाडावर चढलेलं त्यांना अजिबात आवडत नसे. त्या हे सगळं प्रेमापोटीच करतात म्हणून कोणाला राग वगैरे येत नसे. झाडावर चढणारा एखादा तरबेज गडी गावात शोधायचा, फक्त त्यालाच झाडावर चढायची परवानगी होती. त्याने फळे उतरवली की आजी गावभर वाटत. लेकीसुनांची मिळून पंधरा नातवंडे सुट्टीत आल्यावर फारच गोंधळ घालीत. आजोबा कुठेतरी झोका बांधून देत तर त्यासाठी लागणारी भांडणे सोडविताना आजींना नाकीदम येत असे. मग आजी खोटेच रागावून कुठेतरी दूर जाऊन बसत.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलं यायची तेव्हा आंब्याच्या झाडाला हिरव्याकंच कैऱ्या लागलेल्या असत. मुलांच्या तोंडाला पाणी सुटत. पण आजी झाडावर चढून देत नसत. नुसतं पाहात बसण्याशिवाय इलाज नसे. जयू आणि मिलू कधीकधी झाडावर चढण्याचा आजीच्या नकळत प्रयत्न करीत पण त्यात फारसे यश येत नसे. एकदा आजी लेकीच्या सासरी लग्नासाठी जाणार होत्या. आजीने जयू आणि मिलूला खूप आग्रह केला. पण त्यांनी ठरवले होते, आजी गावाला गेल्यावर झाडावर चढायचे. म्हणून त्यांनी आजीला स्पष्ट नकार दिला. आणि वर सांगितले, अनु आणि प्राचीला ने. त्यांनाच लाडू आवडतात. आजी म्हणाली,

"बरं बाबा, नका येऊ. पण झाडावर चढायचं नाही. मी बबनला सांगून ठेवते, तुमच्याकडं लक्ष ठेवायला."

असा दम देऊन आजी गेली. मुलांनी सुटकेच निःश्वास टाकला. आता मात्र मुलांनी, त्यांच्याकडे सालाने कामाला असणाऱ्या बबनची पाठ धरली. त्याच्यामागे सारखा लकडा लावला. 'झाडावर चढायला शिकवा.' म्हणून. बबन म्हणाला,

"आजी मलाच खवाळत्याल्या, कामावरनं काढून टाकत्याल्या."

"आम्ही तुमचं नाव सांगणार नाही."

"बरं आप्पांना तरी विचारा."

मुलांनी आप्पांची परवानगी काढली. आप्पा हो म्हणाल्यामुळं मुलं हरखून गेली. जयू तर स्वप्न बघू लागला, आपण पांडू गुराख्यासारखं उंच फांदीवर पाय सोडून बसलोय, अन् बासरी वाजवतोय. रोहितला वाटलं, आपण मनीसारखं झाडावर चढून तिथेच चिंचा खायच्या. खाली उभा राहिलेल्या प्राचीला फक्त

चिंचोके टाकायचे. तिचा चिडलेला चेहरा पाहून लय मजा इल.

बबनचं शेण काढून झालं. गोठा झाडला. गुरांना फिरवून आणलं. बांधावरच्या बाभळीखाली गुरं बांधली. वैरण कापून घातली. शेरडांना शेवरीच्या झाडाच्या फांद्या तोडून त्याचा पाला खायला घातला. एवढी सगळी कामं झाल्यावर बबन मुलांना म्हणाला,

"चला रं पोरांनो, कोण कोण येतय?"

जयू मिलू तयारच होते. श्री पळत आला. रोहित बबनच्या पुढे निघाला. कुलदीप आधीच झाडाखाली जाऊन उभा राहिलेला. त्याने वर चढायचा प्रयत्नही केलेला. पण जमतच नव्हतं. तो बबनला म्हणाला,

"मी पहिल्यांदा आलोय म्हणून मीच आधी झाडावर चढणार."

"बर चला." असं म्हणून बबन कुलदीपला कसं चढायचं ते सांगू लागला.

"खाचेत पाय ठेवायचा, अन् खरबुड्या टेकणावर हाताने घट्ट धरायचे. मग पायाला रेटा द्यायचा अन् हळूच वर सरकत चढायचं. किती सोप्पंय? एका दिवसात न्हाय राव जमणार. रोज सराव कराया होवं."

कुलदीप चढला पायाला रेटा देऊन वर सरकला पण पाय ठेवायला जागाच सापडेना. तेव्हा ओरडला.

"आता पाय कुठं ठेवू?"

"पायानंच जागा हुडकायची असती." असं म्हणत बबनने कमरेला हात देऊन जरा वर रेटलं. आंब्याचं झाड फार उंच नव्हतं एकेकाला वर चढवलं. श्री तर पटकन चढला. ज्योती सुरूसुरू खारोटीसारखी चढली. वरती जाऊन कैरी खात बसली. असं करता करता एक दोन प्रयत्नात मुलं झाडावर चढू लागली. आजी नसल्यामुळं आई, काकी, बाई, जिजी, माई दुपारचं जेवण घेऊन रानात आलेल्या. पोरांना झाडावर चढलेलं बघून, पडतील काय म्हणून त्यांना भीती वाटली, आणि कौतुकही.

"अरे, भूकबिक लागतीय का न्हाय, चला जेवायला." जिजी ओरडली.

"माझ्यासाठी गाभाळलेली कैरी आण." माई मिलूला म्हणाली.

"आज काय गुरांला सोडायचं न्हाय का? नुसतं खेळतच बसाणारेयस का पोरांच्यात?"

आजोबा बबनवर खेकसले. बबन गपचीप गुरांकडं गेला. मुलं पळाली.

चार दिवसांनी आजी आली. झाडावर चढण्याच्या गोष्टीबद्दल आजीला कुणी

काही बोललं नाही. सकाळी न्याहरी केली की मुलं रानात निघाली. आंबे केसरी, पिवळे होऊ लागलेले. मिलूला सांगितले, तू लक्ष ठेव आजीकडं, आजी आली की लगेच, या ऽ हूँ ऽ करून ओरडायचं. तिघे झाडावर चढले. आजीबरोबर ज्योती, प्राची रानात आल्या. रानात आल्याबरोबर आजीनं अंगणात तळवटावर ज्वारी वाळत टाकली. प्राची, ज्योती, ज्वारी पसरून झाली की आजीला विचारून बागेत गेल्या. प्राचीला यातलं काहीच माहीत नव्हतं. झाडावर चढण्याच्या गोष्टीबद्दल आजीला कळू द्यायचं नव्हतं म्हणून तिलाही कुणी काही सांगितलं नव्हतं. प्राचीनं झाडावर चढलेली मुलं बघितली अन् ती घाबरलीच. आजी कुणाला झाडावर चढू देत नाही हे तिला आठवलं. ती तशीच मागे फिरली. ज्योती झाडाकडे जाऊन, "आंबे खाली टाका." असं वरच्या मुलांना सांगत होती. ते काही टाकेनात. मग ज्योती वर चढू लागली. प्राची आजीकडं गेली. आजी ज्वारीला हात देत होती. प्राची धापा टाकत आजीला सांगू लागली.

"श्रीदादा, जयूभैय्या, कुलदीप झाडावर चढलेत."

थोडावेळ आजीला काहीच सुचेना. मग उठली न् बागेकडं पळतच सुटली. तिच्यामागे आजोबा. ते का पळताहेत म्हणून बबन. आप्पाही पळत निघाले. जिजी, माई, बाई चालत बागेत निघाल्या. मुलं झाडावर चढलेली पाहून आजीच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता. एवढा सगळा घोळका पाहून मिलू, पोरांना सावध करायचं सोडून आजीकडेच पहात बसला. जाडजूड, पदर सावरीत पळणारी आजी पाहून त्याला हसू येत होतं. आता आजी ओरडणार म्हणून भितिही वाटत होती. मुलांनी झाडावरून सगळ्यांना बघितलं. मुलं घाबरली. आजोबा बबनला ओरडून म्हणाले.

"उतरव त्यांना खाली."

"आम्हाला येतं उतरायला." असं म्हणत मुलं उतरू लागली.

खाली उतरल्याबरोबर मुलांनी आजीला मिठी मारली. आजी भानावर येऊन मटकन खालीच बसली आणि मुलांना जवळ घेऊन कुरवाळू लागली. बबनने आंबे, कैऱ्या गोळा करून घरात नेऊन ठेवल्या. जिजी म्हणाली,

"आता रोज जेवताना ताज्या कैऱ्या खायला मिळतील."

आजीच्या डोळ्यात अश्रुबरोबर कौतुकही ओसंडून वहात होते.

* * *

# डिंपी

डिंपी. आमची डिंपी. तिची आठवण आली की, डोळे भरून येतात. होतीच तशी गुणाची. डिंपी म्हणजे आमचं मांजर. पलुसहून सोलापूरला बाबांची बदली झाली, तेव्हा शेजारच्या नवलेबाईंनी एक सुंदर. छोटसं, अगदी तीन आठवड्याचं पिल्लू आम्हाला दिलं. नवीन शहर, परिसर, घर, माणसं सगळंच नवीन. ओळखीचं कोणीच नाही. अशावेळी करमत नाही. पण डिंपीनं ती उणीव भरून काढली. अतिशय शांत. कसलाच त्रास नाही. खाणंही कमी. मुलांशी मात्र मनोसोक्त खेळायची. थोडी मोठी झाल्यामुळे लांबवर फिरायला जायची. तेव्हा आमचा जीव खालीवर व्हायचा. एकदा डिंपी रात्रभर घरी आलीच नाही. त्यावेळी स्वप्नालीनं गोंधळ घातला. जेवली नाही. कान्हाने देवाला प्रार्थना केली. स्वप्नालीला चैन पडत नव्हतं. सैरभैर झालेली. काय करावं काही सुचेना. तिला सारखं रडू येत होतं. कान्हा म्हणाला.

''मी देवाची प्रार्थना केलीय. नक्की येईल डिंपी.''

त्याचं ऐकून स्वप्ना देवाला नवसच बोलली,

''डिंपी सापडू दे, पेढे वाटीन.''

देवाला प्रार्थना केली, नवस बोलून झाला. शोध तर आपल्यालाच घ्यावा लागेल. देव काय सांगणार नाही, अमुक ठिकाणी डिंपी आहे....वगैरे. खूप शोधलं. ओळखीचे, बिनओळखीचे, अशा कुणाच्याही घरात जाऊन विचारायचं आमचं मांजर आलंय का? गल्ली, बोळं, अंधारातल्या जागा, फटी, सापटी असं रात्री खूप उशीरापर्यंत शोधाशोध केल्यानंतर एकदाची डिंपी सापडली. तिची अवस्था फारच दयनीय झाली होती. तिचं अंग घाण झालेले, ती दिवसभर उपाशीच असावी, कारण तिचं पोट भकाळी गेलं होतं. ती बेचैन होऊन ओरडत होती. त्यामुळे वाईट वाटले पण एकदाची आपली डिंपी मिळाली म्हणून खूपच आनंद झाला. मुलांनी देवापुढे पेढे ठेवले.

त्या अनुभवामुळे की काय पण डिंपी आता एकटी राहायची नाही. ती तशी फार मोठी झाली नव्हती. एकदा आम्हाला गावाकडे जाणं आवश्यकच होतं.

तेव्हा डिंपीला अजिबात एकटं सोडायला स्वप्नाली तयार नव्हती. ती आमच्याबरोबर आलीच नाही. मग शेजारच्या मुलींना रात्री तिच्या सोबत झोपायला सांगून आम्ही गेलो. डिंपीची न् स्वप्नालीची चांगलीच जोडी जमली होती. स्वप्नाली तिची सतत काळजी घ्यायची डिंपीही तिच्याशिवाय राहायची नाही. ती शाळेत गेल्यावर मात्र गावभर भटकायची. हल्ली रात्रीही बराच वेळ बाहेरच असायची.

डिंपी आता मोठी होत होती. तिचं बाहेर भटकणं वाढलं होतं. तिला एकटीला ठेवून गावाला तीनचार दिवस गेले तरी चालायचे. तिच्यासाठी घरात थोडा दूधभात वगैरे ठेवायचा. सरकारी बंगला, जुन्या पद्धतीचा. खिडकीला वरती झडप होती. ती उघडी ठेवली की त्यातून तिचं आतबाहेर चालायचं. गावावरून आल्यावर मात्र म्याँव, म्याँव करत स्वप्नालीच्या मागे फिरायची. तिचं आर्तपणे ओरडणं पाहून पोटात कालवायचं. 'मला का ठेवून गेलीस?' असंच जणू तिला विचारायचे असायचे.

डिंपीला बाळ झाल्यावर स्वप्नालीच्या अन् कान्हाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तिचे चिमुकले बाळ पहायला मुलं सारखी जायची. म्हणून मग डिंपीही सतत जागा बदलत रहायची. ती पिल्लाला फार जपायची. स्वप्नाली तिची एवढी जिवाभावाची पण तिलासुद्धा पंजा मारायची. कान्हाला तर जवळसुद्धा येऊ द्यायची नाही. तो जवळ येतोय असं लक्षात आलं की जोरात फिस्कारायची. कुठल्याही प्राणीजातीत मादी आई झाली की पिल्लाच्या रक्षणासाठी खूपच आक्रमक होते. हिंसक होते.

एकदा आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत गावाला गेलो होतो. बाबा एकटेच घरात होते. ते दिवसभर कामाला गेले की घरात कोणीच नाही. डिंपीही अन्नाच्या शोधात बाहेर गेली असेल. तेव्हाच बोक्याने बहुतेक तिचं पिल्लू खाल्लं असावं. बाबा रात्री घरी आल्यावर डिंपीने ओरडून आकांत केला. पण इलाज नव्हता. तिच्या पिल्लासाठी कुणीच काय करू शकत नव्हते...!

दुसऱ्यांदा पिल्लू व्हायच्या वेळेस घरभर डिंपी चांगली जागा शोधत होती. स्वप्नालीने तिच्याच दिवाणमध्ये जागा करून दिली. जुनी चादर अंथरून मऊ मऊ जागा तयार केली. दोन पिल्लं झाली. पिल्लांनी कपडे घाण केले तर स्वप्नाली स्वतः धुवायची. तिला अजिबात घाण वाटत नव्हतं. मी किरकिर करायची म्हणून गुपचीप हे काम ती करायची.

एवढी काळजी घेतली पण यावेळीही घात झालाच. एका लग्नावरून उशीरा

घरी परतलो तर दोन्ही पिल्लांना बोक्याने नुकतेच मारलेले. डिंपी फिस्कारून बोक्यावर धावून जात होती. पण बोक्याची शक्ती जास्त, डिंपी लहानखुरी नाजूक, तरी जोराजोरात ओरडत बोक्याच्या अंगावर जात होती. पण सगळे संपले होते. डिंपीने ओरडून घर डोक्यावर घेतले. खरे तर असे शत्रू दिसले की डिंपी रूद्रावतार घेऊन पिल्लांचे संरक्षण करी. पण ती बाहेर गेल्यानंतर, आम्हीही घरात नव्हतो तेव्हाच वैऱ्याने डाव साधला. खूप हळहळ वाटली. स्वत:ची गाडी नसल्यामुळे तिला कुठे बरोबर नेणंही शक्य नव्हतं. सगळे सुन्न झाले. स्वप्नाली तिला जवळ घ्यायचा प्रयत्न करायची पण ती जवळ यायचीच नाही. दु:खाने ओरडत घरभर पिल्लांना शोधत फिरायची. बिचारी डिंपी थोडे दिवस ओरडून शांत झाली. तिसऱ्यांदा मात्र तिने उंच माळ्यावर जागा शोधली. आता तिकडं कोणी जाऊ शकणार नाही, असं डिंपीला वाटलं असावं. माळ्यावर कुकरचं खोकं होतं, त्यात तिनं बाळ ठेवलं. ती घरात नसताना स्वप्नालीनं खोक्यात मऊ अंथरूण घातलं. तिचं चिमखडं पिल्लू बघायला मुलं खोकं सारखं खाली काढून घेत. ती यायच्या आत खोकं वर ठेवत. पण ते तिच्या लक्षात आलं असावं. तिला ते आवडलं नसावं. तिनं मग ते पिल्लू बाहेर नेलं. कधी नेलं, कुठं नेलं काहीच कळलं नाही. मनात नाना शंकाकुशंका. डिंपीनं पिल्लू खाल्लं तर नसेल. मुलांची आजी म्हणाली, मांजर स्वत:चं पिल्लू खातं. ही नवीन माहिती ऐकून आम्ही तर हबकलोच. बोक्यानं मारलेल्या पिल्लांचं तिनं काय केलं होतं, हे कुणालाच ठाऊक नव्हतं. पण डिंपी पिल्लू खाईल असं कुणालाच वाटलं नाही. मग पिल्लाचं काय झालं? पिल्लू दूध प्यायलं नाही तर स्तनं सुजतात. पण डिंपीचं तसंही काही नव्हतं. डिंपी सहज वावरत होती. शेजारीपाजारी चौकशी केली, शक्य होईल तिथं पिल्लांचा शोध घेतला, पण पत्ताच नाही. तिला रागावायला लागलं की, कावरीबावरी होऊन बघायची. जणू तिला सांगायचं होतं की, माझं बाळ सुरक्षित आहे. आमची तगमग चाललेली. चारपाच दिवस असेच गेले. आणि एके दिवशी ती पिल्लू घेऊन आली. आम्ही सुटकेचा नि:श्वास सोडला. अगदी हायसं वाटलं. ते पिल्लू एकजणानं मागितल्यावर मात्र मुलं नको म्हणत असतानाही देऊन टाकलं. कोल्हापूरला बदली झाल्याचं कळलं होतं. कुठेतरी पिल्लू सुरक्षित राहिलं म्हणजे बास. आता ती आमच्याकडे संशयाने बघायची, ओरडायची. तिची तगमग चाललेली. पण नंतर तिला पिल्लू सापडलं असावं. ती शांत झाली.

कोल्हापूरला येताना प्रवासात डिंपी सतत बाहेर उडी मारण्याचा प्रयत्न करायची. तिला नुसतं धरूनच नव्हे तर, घट्ट धरून ठेवावं लागे. ती उडी मारून जाईल कुठेतरी म्हणून नुसतं स्वप्नाली तिला घट्ट धरून बसायची. दुसऱ्या कुणाकडे द्यायलाच तयार नव्हती. डिंपी फक्त तिच्याच जवळ सुरक्षित राहू शकते. तिचा कुणावर भरवसाच नव्हता. तिला धरून ठेवणे हेच तिच्यासाठी महत्त्वाचं काम होतं. त्यासाठी ती उपाशी राहिली. पण तिला अजिबात बाजूला होऊ दिलं नाही. खाण्याच्या नादात ती टुणकन उडी मारायची अन् जायची कुठं.... ही कल्पनासुद्धा तिला सहन होणारी नव्हती. आई लेकराचा जसा त्रास काढती तसाच त्रास स्वप्नालीने डिंपीचा काढला.

कोल्हापूरात सगळंच नवीन. इथे घराच्या खिडक्यांना डास येऊ नयेत म्हणून बारीक जाळी बसवलेली. त्यामुळे रात्रीचे दार बंद असल्यावर डिंपीची फारच गैरसोय होऊ लागली. तिला हवं तेव्हा बाहेर जाणं, हवं तेव्हा आत येणं जमेना. अगदीच रस्त्यावर घर असल्यामुळे दरवाजा उघडा ठेवणंही सारखं शक्य नव्हतं. बाहेर जायचं असलं की ती दाराजवळ घुटमळायची, किंवा दारावर नख्यांनी ओरबाडायची. मग कुणीही हे लक्षात आल्यावर तिला बाहेर सोडायचं. रात्री मात्र ती स्वप्नालीच्या ताब्यात असायची. तिचं खाणं, पिणं, झोपणं सगळं स्वप्नालीच्या सोबतीनं, संगतीनं असायचं. सगळे झोपलेले असले की डिंपीला बाहेर जायची हुक्की यायची. मग स्वप्नाली तिला बाहेर सोडायची. डिंपीचं हिंडणंफिरणं, शी-शू झालं की यायची. तिचा आवाज आला की आधी स्वप्नाली जागी व्हायची अन् तिला आत घ्यायची. मग डिंपी स्वप्नालीच्या कुशीत झोपायची. रात्रीतून हे बऱ्याच वेळा व्हायचं. स्वप्नाली हा सगळा त्रास काढायची. त्यामुळे मी बिनघोरी असायची. मी स्वप्नालीला किती वेळा ओरडले, डिंपीला फार तोंडाजवळ घेत जाऊ नकोस. कुत्र्यामांजराचे केस तोंडात गेल्यावर अस्थमा होतो. असं कुठं वाचलेलं, ऐकलेलं, त्यामुळे मला ताण यायचा, काळजी वाटायची. तिनं डिंपीला पायाशी झोपवावं, पण नाही, डिंपी हक्काने तिच्या कुशीतच झोपायची. स्वप्नाली शाळेत गेली की डिंपी तिच्या चादरीवरच बसायची, झोपायची. ती कान्हाच्या चादरीवर किंवा दिवाणवर बसायची, झोपायची नाही. माझ्याजवळही कधी झोपायची नाही. मी चहा पिताना किंवा हाताने बसून काम करताना वर्तमानपत्र जमिनीवर पसरून वाचते. त्यामुळे हाताने काम चालू म्हणजे भाजी निवडणं, चहा पिणं वगैरे तर डोळ्यांनी पेपर वाचणंही व्हायचं. एकावेळी दोन कामं केल्यामुळं

वेळ वाचायचा. तर डिंपी हमखास पेपरवर येऊन बसायची. कापडावर पेंटींग किंवा भरतकाम करताना ते कापड पसरलेलं असेल तर ती समोर कापडावर येऊन आराम करायची किंवा डुलक्या काढायची. टी. व्ही. बघताना ती टी. व्ही. वरच जाऊन बसायची. माझ्याकडे बघायचं सोडून दुसरीकडं कशाला आणि काय बघता? असंच तर तिला म्हणायचं नसेल ना? आम्ही जेवताना मात्र ती फारशी रेंगाळायची नाही. थोडासा दूधभात खायची, बस. मटणाचा वास मात्र तिला स्वस्थ बसू देत नव्हता. तेव्हा डिंपी फार फार वाईट व्हायची. भरपूर मार खायची. मटण आणल्यापासून तिचं म्यॉंव म्यॉंव सुरू व्हायचं. कितीही दिलं तरी गट्टम करून टाकायची. एवढासा जीव पण किती खावं मटण, त्याला काही प्रमाण? एकावेळी पाव, अर्धा किलो खात असेल. तिच्या पोटाची भीती वाटायची. एरवी थोडासा दूधभात खाणारी डिंपी मटण आणल्यावर इतकी घाण का वागते, काय कळायचं नाही. अगदी घरात मटण आणणं, शिजवणं नको वाटायचं.

डिंपी आता मोठी, समंजस झाली होती. आम्ही परगावी गेल्यावर घर बंद असले तरी उघडल्यावर ती यायचीच. आता ती आमच्याशिवाय राहाणार नाही. आम्हाला कुठे सोडून जाणार नाही, असंच वाटू लागलेलं. एकदा उन्हाळ्यातच दोन दिवस आम्ही सर्वजण गावाला गेलो होतो. नेहमीप्रमाणे खिडक्यांच्या गैरसोयीमुळे डिंपीला बाहेरच ठेवलेलं. आम्ही गावावरून आलो तरी ती आलीच नाही. एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस....किती वाट बघितली. कुठलं मांजर बघितलं की, डिंपी ऽ असं नकळत तोंडातून बाहेर पडायचं. डिंपी पुन्हा कधीच दिसली नाही. आम्ही तिला सोडून गावाला गेलो म्हणून ती रागावली आमच्यावर. रूसून गेली. स्वप्नालीची तगमग बघवत नाही. ओरडून विचारावं वाटतं, 'डिंपे, तू कुठे असशील तिथून लगेच निघून ये. आम्ही तुझी खूप वाट पहातोय. तुझी आई झालेल्या स्वप्नालीसाठी तरी ये. डिंपे, कुठं गेलं तरी डोळे तुलाच शोधतात... कुठं आहेस तू ? कशी आहेस तू...?

असं वाटतं सर्वांना विचारावं, टी.व्ही. रेडिओ, वर्तमानपत्र, सगळीकडं कळवावं, जाहिरात द्यावी,

*'पाहिलंत का कुणी आमच्या डिंपीला?'*

* * *

# बाळ हेलन

इयत्ता पाचवीचा वर्ग. परीट सर इंग्रजीचा तास घेऊन गेले. लगेच मुलांचं सैलावून किलबिल सुरू झालं. दुसरे भूगोलाचे पाटील सर येईपर्यंत गलका वाढला. बराच वेळ झाला तरी सर अजून येत नाहीत म्हणजे रजेवर आहेत की काय? मुलं अंदाज करू लागली. तेवढ्यात पवारबाई आलेल्या मुलांनी बघितलं. मुलं मनातून आंनदली. कारण पवारबाई मराठी फारच छान शिकवायच्या. कविता शिकवताना पाठसुद्धा व्हायची. इतकी चांगली समजायची. अधूनमधून गोष्टीही सांगत. आज तर बाईंचा तास नाही तरी आल्या, म्हणजे गोष्ट ऐकायला मिळणार. टेबलाजवळ उभ्या राहात बाई म्हणाल्या,

"आता कुणाचा तास आहे?"

"भूगोलाच्या पाटील सरांचा." मुले एका सुरात ओरडली.

"पाटील सर रजेवर आहेत. मी भूगोल शिकवलं तर चालेल का?"

पुढच्या मुलाच्या बेंचजवळ येऊन भूगोलाचे पुस्तक हातात घेत बाई म्हणाल्या. मुलं हिरमुसली. त्यांना वाटलं बाई गोष्ट वगैरे सांगतील. धिटुकला सौरभ म्हणाला,

"बाई गोष्ट सांगा की,"

"हो बाई गोष्टच सांगा, तुम्ही किती छान गोष्टी सांगता."

बाईंना, आपण सांगितलेली गोष्ट मुलांना आवडते म्हणून बरं वाटलं. त्या म्हणाल्या,

"बरं, शांत बसा, रात्री आम्ही एक नाटक पाहिलं. त्याची सांगू का गोष्ट?"

"हो ऽऽ" मुलं सावरून बसली.

"कुठलं नाटक?" ज्योतीनं विचारलं.

"किमयागार." बाई खुर्चीत बसल्या.

"हेलन केलर ही आंधळी आणि बहिरी महिला तिच्यावर होतं. सांगू का?"

"हो ऽ " मुलं हरखली. एका सुरात ओरडली.

"ठीकेय. तर ऐका. ऑर्थर केलर आणि केट केलर ह्यांची हेलन ही मुलगी. तिच्या आधीचा तिला एक भाऊ होता. त्याचं नाव जेम्स. दुसरी हेलन. हेलनपेक्षा

लहान एक छोटं बाळ होतं त्यांना. हेलन छोटं बाळ असताना अगदी निरोगी, गोंडस, सुंदर होती. ती हसली की गालाला नाजूक गोड खळी पडायची. डोळे तर अतिशय बोलके, सुंदर होते. नजरच लागली की काय कुणास ठाऊक त्या डोळ्यांना?

हेलन फारच हुशार होती. सहा महिन्यांची असताना पाणी हवं असलं की, पा...पा... असं म्हणायची. मा... मा... म्हणायची. एवढी तिची समजूत होती. फारच बुद्धीमान होती. एकदा काय झालं कळलंच नाही, हेलन खूप आजारी पडली. चमत्कारिक दुखणं होतं. डॉक्टरांनाही खात्री वाटेना ती जगण्यावाचण्याची. तिचे आईवडील रात्रंदिवस तिच्या उशापायथ्याशी बसून होते. आईची तर फारच लाडकी. तिनं कितीतरी वेळा देवाला प्रार्थना केली असेल, नवस बोलली असेल, माझी हेलन दुखण्यातून उठू दे, चांगली बरी होऊ दे. एकेदिवशी डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश आलं. हेलनची प्रकृती सुधारू लागली. हेलनचे वडील वृत्तपत्र संपादनाचा व्यवसाय करीत. डॉक्टर त्यांना म्हणाले,



"तुमच्या वर्तमानपत्रात बातमी टाकायला विसरू नका. एक चिमुरडी पोर मृत्यूशी झुंज देऊन आलीय म्हणून."

"डॉक्टर खरंच तुमचं फार फार आभार. हेलन आता पूर्ण बरी झालीय ना?" हेलनचे वडील म्हणाले.

"हो आता काही काळजी करू नका. तिची तब्येत एकदम खणखणीत झालीय. आता तिच्या अवखळपणाला आवरण्याकरता तुम्हाला तब्येत धडधाकट ठेवावी लागेल. एवढं औषध तिला देऊन निवांत झोपा. खूप जागरणं केलीत तुम्ही. आता तुमच्या मुलीला काहीही होणार नाही." डॉक्टर जायला निघाले. त्यांची बॅग घेऊन हेलनचे वडील फाटकापर्यंत गेले.

"डॉक्टर, खरंच हेलन बरी होईल ना? की आम्हाला धीर देण्यासाठी..."

"नाही नाही. मि. केलर, मरण कुणाला चुकलंय? जे अटळ आहे त्याला धीराने सामोरं जायलाच हवं. पण तुमच्या मुलीला सध्या तरी त्याची धास्ती नाही."

डॉक्टरांनी हेलनच्या वडिलांच्या खांद्यावर हात थोपटले. डॉक्टर गेल्यावर केलर आत आले. तेव्हा हेलनच्या आईच्या किंकाळीचा आवाज आला. केलर आत धावत आले. घाबरून त्यांनी हेलनच्या आईला विचारलं.

"काय झालं केट?"

"माझी लाडकी हेलन." हेलनची आई विस्फारल्या डोळ्यांनी हेलनकडे पहात होती.

"जागी का झोपलीय पहाण्यासाठी मी तिच्याकडे गेले तर तिचे डोळे सताड उघडे. अहो तिला दिसत नाही." असं म्हणून केट रडू लागली.

हेलनचे वडील धावतच पाळण्याकडे गेले. घाबरून म्हणाले.

"दिसत नाही?"

"हो आणि ऐकायलासुद्धा येत नाही." हेलनची आई हुंदके देऊ लागली. हेलनचे वडील हेलनला जोराजोरात. 'हेलन, हेलन' अशा हाका मारू लागले. त्यांचा आवाज भयानक झाला. नंतर डोक्याला हात लावून ते तिथेच बसले. केट तर बेशुद्ध पडण्याच्याच बेतात होती. पण तिनं स्वत:ला सावरलं. हेलन आजारातून उठली म्हणून थोड्यावेळापूर्वी केवढी आनंदली होती....

हेलन आंधळी बहिरी असल्यामुळे तिला काहीच कळत नव्हतं. तिची सतत धडपड चाललेली असायची. तिचा मेंदू मात्र तल्लख होता. त्यामुळे तिला स्वस्थ

बसवायचे नाही. काहीच समजत नसल्यामुळे ती खूप चिडायची, संतापायची. हाताला लागतील त्या वस्तू फेकायची. तिला शिस्त कशी लावायची तेच घरातल्यांना कळत नव्हतं. मनाला येईल तसं तिचं वागणं, अगदी जनावरासारखंच म्हणा ना. हेलन मोठी होत होती. तिची बुद्धी चांगली पण तिला आकार नव्हता, विचार नव्हता, संस्कार नव्हता. नुसता डोंगराच्या कड्यावरून कोसळणारा धबधबाच जणू. तिचं करता करता घरातले अगदी नाकीनऊ आले होते. मैत्रिणींना तिचा त्रास व्हायचा. एकदा तिची मैत्रीण व मित्र मार्था आणि पर्सी बागेत कातरीने कागद कापून फुले, बाहुल्या वगैरे करत बसले होते. हेलन आता सहा वर्षाची झालेली. तिचा आडदांडपणाही तेवढाच वाढलेला. तिची हालचाल भरभर, विचित्र, असंस्कृत असायची. तिचा मित्र पर्सी तिच्या या वेडगळपणाला सारखा हसायचा. हेलनला त्याचं वागणं जाणून घ्यायचं असायचं म्हणून ती पर्सीचा चेहरा चाचपायची, ओठापर्यंत हात न्यायची. पर्सी गमतीने तिचे बोट चावायचा. पटकन ती बोट मागे घ्यायची. स्वतःच्या चेहऱ्यावर हात फिरवायची. ओठाजवळ न्यायची, पर्सीप्रमाणे तिलाही हसायचे असते. ती तसा प्रयत्न करते पण तिला जमत नाही. ती बोलायला बघते, तिचे ओठ थरथरतात पण तिला तेही जमत नाही. म्हणून पर्सी हसतो. मग ती संतापते. मार्था पर्सीला म्हणते,

"हसू नको रे, ती रागावलीय."

"अगं ती वेडीच आहे. तिला काय हसलं रडलं कळतंय?"

हेलन जमीन चाचपते, हाताने चाचपडते हीच तिची भाषा असते. मार्थाचे लक्ष जाते. ती म्हणते.

"अरे, तिला काय तरी हवंय."

ती दोघं तिच्या हालचालीकडे पहातात. कातरीसारखे हावभाव पाहून पर्सी म्हणतो,

"अगं ती कातरी शोधतेय."

"ही घे हेलन."

मार्था तिच्या हातात कातरी देते तर हेलन पटकन तिचे केस पकडून एक बट कापते. मार्था आरडाओरडा करते. पर्सी तिला समजावतो.

"जाऊ दे गं, वेडीच आहे. तिला काय कळत नाही."

"आता मला सगळे चिडवतील, आई पण रागावेल." मार्था रडू लागली.

मुलांचा गोंधळ ऐकून हेलनची आई बाहेर आली. मार्थाकडे पाहून म्हणाली.

"मार्था का गं रडतेस?"

"हेलनने माझे केस कापले." मार्था स्फुंदत म्हणाली.

" आता काय करावं या मूर्ख मुलीला. मार्था उगी उगी. अगं, हेलन वेडीच आहे. आता तिला मी चांगली शिक्षा करते. तुम्ही मुलं तिच्याशी एवढं खेळता तर ती तुम्हालाच त्रास देते. ती काय करते हे तिलाच कळत नाही बेटा. तू जा घरी. पर्सी हिला तिच्या घरी ने रे. रडू नकोस, बेटा."

पर्सी मार्थाला घरी नेतो. केटने हेलनला ओढतच घरात नेले.

"उच्छाद मांडलाय नुसता पोरीनं." तिनं तिच्या पाठीत धपाटा घातला.

"अगं अगं का मारलंस? तिला काहीतरी कळतं का? मारून काही उपयोग आहे का?"

म्हाताऱ्या मावशी हेलनला जवळ घेत म्हणाल्या,

"हेलन, बघ मी तुझ्यासाठी बाहुली केलीय."

जुन्या कापडाची ओबडधोबड शिवून, कापूस भरलेली बाहुली, मावशी हेलनच्या हातात देतात. हेलन ती बाहुली हातात घेऊन गंभीरपणे तिचे सगळे अंग चाचपते. तिचा हात चेहऱ्याकडे जातो, तिथे डोळेच नसतात. नुसतंच गोल गोल गाठोड्यासारखं. नाक, ओठ, कान काहीच नसते. तिच्या मावशीला वाटतं आंधळीला काय काहीही खेळायला दिलं तरी चालतं. पण हेलनची बोटं सगळं पाहात असतात. तिला जाणवतं बाहुलीला चेहराच नाही. एवढीशी पोर पण किती डोकं तिला, ती उठते, मावशीची सुईदोरा, बटणाची बास्केट ओढते. त्यातील दोन बटणे घेते अन् बाहुलीच्या चेहऱ्यावर जोरात दाबते. तिची कृती केट पाहाते. तिचे हात हातात घेऊन बटणे आपल्या डोळ्याकडे नेते, तेव्हा हेलन उत्साहाने मान हलविते, जणू तिला म्हणायचे असते, बाहुलीला डोळे का नाही लावले? डोळ्यांशिवाय बाहुली कशी चांगली दिसेल? हेलनच्या आईने केटने दोन टाचण्या घेऊन बटणे चेहऱ्यावर लावली. केटचे डोळे भरून आले. ती म्हणाली,

"अगं हेलन, तू जगतेस डोळ्यांशिवाय, बाहुलीला मात्र डोळे हवेत म्हणून हट्ट. तुला जे कळंतय ते देवाला कसं कळलं नाही गं?"

हेलनला, बाहुलीला डोळे आले म्हणून केवढा आनंद झाला. ती बाहुलीची पापी घेते, डोलावते, जोराजोरात थोपटते. आता ती बाळाला पाळण्यातसुद्धा झोपवणार असते. हेलन चाचपडत पाळण्याकडे जाऊ लागते. पाळण्यात छोटं

बाळ आहे याची तिला काहीही क्षिती नसते. ती तसा विचारच करत नाही. ती पाळणा उलटवते अन् बाहुलीला पाळण्यात झोपवते. बाळ खाली पडणार तोच हेलनचा मोठा भाऊ जेम्स त्याला सूर मारून झेलतो. केट 'हेलन' म्हणत ओरडते. पण हेलनला याचे काय? ती आपली बाहुलीला जो, जो करते. केट तिला पाळण्यापासून बाजूला करते.

"हेलन, असं काय करतेस, कसं सांगू तुला?"

"जनावरांना सांगून कळत नाही. फटके मारून शिस्त लावावी लागते." जेम्स म्हणाला.

"काय बोलतोस जेम्स, तुला काय कळतं का?" केट.

"बरोबर बोलतोय. तुम्ही तिचे फार लाड चालवलेत. नको ते भरपूर कळतं तिला."

हेलनचे वडील ऑर्थर बाहेरून आले. घरातलं वातावरण पाहून त्यांनी विचारले,

"काय झालं?"

"हेलनने पाळणा उलटवला." जेम्स म्हणाला.

"काय करावं, मारलं तरी कळणारेय का, कशी शिस्त लावावी?"

"केट, हेलन आता मोठी होऊ लागलीय. तिला घरात ठेवून चालणार नाही. दिवसेंदिवस धोक्याचं होणारेय."

"तुम्हालाही तसंच वाटतं, माझ्या पिलाला तिकडे लांडग्यांच्या स्वाधीन करायचं?"

केटने हेलनला जवळ घेतले. हेलन तिच्या चेहेऱ्यावरून हात फिरवते. तिलाही बोलायचं असतं पण जमत नाही म्हणून आईच्या तोंडावर हात मारते. लाथा झाडते, हात पिळते.

"बघ कशी जनावरासारखी वागणूक आहे तिची. तिला आपण एखाद्या चांगल्या हॉस्पिटलमध्ये ठेवू या." ऑर्थर म्हणाले.

"अगं त्या बाल्टीमोरच्या डॉक्टरांना पत्र लिहून तरी बघा. त्यांनी खूप जणांचे डोळे चांगले केलेत."

मावशी आपली बास्केट आवरीत म्हणाल्या.

"आता डॉक्टर काय चमत्कार करणारेयत. किती दिवस असे खिसे भरायचे डॉक्टरांचे. माझ्याकडे एवढा पैसा नाही आता." ऑर्थर केलर हताशपणे म्हणाले.

"एवढं शेवटंचच लिहून बघू या. असेल नशीबात तर ठीक नाहीतर दुसरा

काहीतरी मार्ग दाखवतील. त्यांना या क्षेत्रातील बरीच माहिती असेल.'' केट म्हणाली.

शेवटची आशा म्हणून त्यांनी डॉ. ना पत्र पाठवले.

बऱ्याच दिवसांनी पत्र आलं म्हणून मावशींनी उत्सुकतेने केटला विचारलं, ''कुणाचं गं पत्र?''

''डॉक्टरांचं. ते एका शिक्षिकेलाच पाठवतायेत. हेलनला शिकवण्यासाठी. तिचं नाव ॲनी आहे. येत्या शुक्रवारी येईल. आपल्या हेलनला शिस्त लावेल. खरंच का माझी हेलन शहाणी होईल?''

केट आनंदाने, थोड्या साशंकतेने मनाशीच बोलल्यासारखी म्हणाली.

''एवढ्या दिवसात आपल्याला शिस्त लावता आली नाही ती, परक्याची बाई कशी शिस्त लावणार?'' मावशी म्हणाली.

''आंधळ्या, बहिऱ्या मुलांशी कसं वागावं ते शिकलेले असतात ना. बघू शेवटचा प्रयोग, प्रयत्न करून बघायचा, शेवटी देवाची मर्जी.'' केट म्हणाली.

''स्टेशनवर आणायला कुणी जायचं हे ठरवायला पाहिजे.'' मावशी म्हणाल्या.

'ॲन सलिव्हान' या टीचरला आणायला हेलनचे वडील गेले. ॲनी टीचर हेलनच्या घरी आली. त्यांच्याच घरी राहून हेलनला शिकवू लागली.


ॲनी टीचरला, हेलन खूप त्रास द्यायची. कधी कधी तर टीचरला वाटायचं, जावं निघून. पण नंतर वाटायचं आपण गेलो तर हिचं उभं आयुष्य वाया जाईल. आईवडील असेपर्यंत ठीकय. पण त्यांच्या माघारी कोण बघणार हिच्याकडे? हिचं हिलाच बघता यायला हवं. असा विचार करून पुन्हा नव्याने त्या सुरुवात करत. हेलनला घडवत, शिकवत त्यांनी तिला स्वावलंबी केले. हीच हेलन मोठी झाल्यावर दृष्टिहिनांच्या विश्वातील दीपस्तंभ झाली.

बाईंची गोष्ट सांगून झाली तरी मुलं शांत, सुन्न होती. भारावून गेली होती. आता प्रत्येकानं हेलनचं पूर्ण चरित्र वाचून काढायचं असंच ठरवलं.

* * *

# असा मी... तसे ते..../१

"पळाली सगळी... आता घरी जाण्याशिवाय पर्याय नाऽऽही. खेळून खेळून एवढी भूक लागलीय. घरी गेलं की छानसं गरमगरम काहीतरी खायला मिळेल या आशेनं जावं तर आमच्या प्रेममूर्ती, वात्सल्यमूर्ती अशा मातृमूर्तीने कडकलक्ष्मीच्या अवतारात हातात लाटणे घेऊन, आम्हाला 'आधी बाथरूममध्ये जा.' असं सांगणार. आता, बाथरूममध्ये जायला सांगायला मी काय कुक्कुलं बाळ आहे का? मी चिडून सांगितलं की, मला नाही लागली. तर लगेच वीजेसारखी कडाडेल, हातपाय, तोंड स्वच्छ धुवायला जा म्हटलं. तर काऽय घरी गेल्यावर आमचं असं स्वागत होणार. पण काय करायचं? उशीर केला तरी, का उशीर केला म्हणून रागावेल. नाहीच गेलो तर... पण भूक जाम लागलीय. शेवटी रागावली तरी पोटभर जेवायला देणारच. आम्ही मुलं खूप खायला लागलो की



आयांना खूप आनंद होतो. का कळत नाही पण सारखं हे खा, ते खा असंच आमची आई म्हणते. पण बाबा, सारखं काय रे खात असतोस? अभ्यासापेक्षा तुझं खाण्याकडेच लक्षं. चल अभ्यासाला बस. आत्ता मात्र आई बाजू घेणार, खाऊ द्या की ओ पोराला. खेळून आलंय, भुकेजलंय. बाबा म्हणणार मग कुणी सांगितलं होतं खेळायला, चल लवकर. दोघांची जुंपली. मी आपलं कसंतरी खाणं संपवून अभ्यासाला बसतो. तर कुठला विषय आधी घ्यावा, याचाच निर्णय लागत नाही. लक्ष आईबाबांच्या भांडणाकडे (जीभ चावून) सॉरी मतभेदांकडे. आमच्याकडे भांडणाऐवजी मतभेद होतात. भांडण करायला, आम्ही काय झोपडपट्टीवाले आहोत का? हे बाबांचं मत!

इंग्रजीचा एखादा अडलेला शब्द बाबांना विचारायला जावं तर, अरे, डिक्शनरीत बघ. डिक्शनरी बघायचा सुद्धा अभ्यास व्हावा लागतो. आणखी चार दोन शब्द नजरेत भरतात. आता इंग्रजी शब्द नजरेत कसे भरतील? डिक्शनरीत शब्द शोधत बसल्यामुळे बाकीचे विषय बोंबलले. आतून आईचा आवाज, अरे, इंग्रजी झालं असेल तर गणित घे बघू. गणिताकडे अजिबात दुर्लक्ष करायचं नाही. भाषा केव्हाही शिकता येतात. गणित मात्र आतापासून पक्के व्हायला पाहिजे. स्वत: मात्र टी. व्ही. पुढे बसणार. वेध काय छान मालिका आहे. त्यातील शिवाजी साटमांची पोलीस निरिक्षकाची दणकट, राकट भूमिका पाहून मलाही पोलीस निरीक्षक व्हावसं वाटतं. पण जरा टी. व्ही.कडं गेलं की, अभ्यास केल्याशिवाय टी. व्ही. पुढे यायचं नाही. अशी तंबी. आम्हाला सांगायचं पोलीस व्हा, पायलट व्हा, कॅप्टन व्हा मग ती माणसं कशी असतात हे तर टी. व्ही. शिवाय कुठं बघायला मिळणार आहेत का? अशी आदर्श माणसंच बघितली नाहीत तर त्यांच्याप्रमाणे व्हावंसं कसं वाटेल? नुसती गणितं सोडवून दाऊदची टोळी पकडता येते का? जाऊ द्या झालं. आमचं मत ऐकून घेणारंच कुणी नाही. आम्हा मुलांना वालीच नाही, पालक आहेत पण!

अभ्यास करून करून परिक्षा द्यावी, सुट्टीत चंगळ करावी, मुबलक खेळावं, पुस्तकाकडे अगदी ढुंकूनसुद्धा बघायचं नाही, असंच मी तर ठरवतो. तर सगळे मित्र सहलीला, कसल्या ना कसल्या शिबिराला नाहीतर आजोळी जातात. खेळायलाच कुणी नसतं. शेवटी गोष्टींच्या पुस्तकाशिवाय कोणी मित्र उरत नाही. पण सारखं वाचायचा पण कंटाळा येतोच की, पुस्तक हा मित्र असला म्हणून

काय झालं. वैताग येतो. आईला म्हणालो,

"आपण जाऊ का मामाच्या गावाला?"


"हो रे जाऊ यात. एकदोन दिवसांनी जाऊ या. जरा चकल्या, चिवडा करते, अण्णांना बेसनाचे लाडू करते."

अण्णा म्हणजे आईचे वडील. आता अण्णा हिरड्यांनी चावून खाणारेयत का? नाहीतर ताईआज्जी अण्णांना चिवडा, चकल्या खलबत्त्यात बारीक करून वाटीत घालून चमच्याने खायला सांगते. कसं करून पण खा. बायकांना त्याशिवाय आनंदच मिळत नाही. पण चकल्या बाबांच्या तावडीतून शिल्लक राहिल्या तर ना!

आजोळी गेलं तर तिथं पोरांनी घर गच्च भरलेलं. आता खूप खेळायला मिळणार. क्रिकेट खेळताना तर अशी चौकार, षटकारची आतषबाजी करतो की, कप्तान हो म्हणून मागंच लागायला पाहिजे. खेळायला गेल्यावर पहिल्यांदा ये, ये म्हणतात. इथं उभा रहा, तिथं उभा रहा. म्हटलं सुरुवातीला क्षेत्ररक्षणच करायला पाहिजे. लगेच फलंदाजीची आशा धरण्यात काय अर्थय. असा समंजस विचार करून उभा राहिलो. चेंडू पळेल तिकडे पळतो, धडपडतो, लोळतो, जमिनीवर डाय मारतो. त्याशिवाय प्रभाव पडणारेय का? जमिनीवर झेप घेत चेंडू पकडल्याशिवाय चांगला क्षेत्ररक्षक सिद्धच होत नाही. पूर्वी कसं, पूर्वी म्हणजे जमिनीवर लढाया होत, राजेलोकांच्या त्याकाळातलं म्हणतोय. चांगल्या योद्ध्याच्या अंगावर जखमांचे व्रण असायचे, तो त्यांचा बहुमान असायचा, अलंकार असायचा. तसंच क्रिकेट खेळताना जमिनीवर झेप घेत चेंडू पकडल्यावरच कपड्यावर मातीचे डाग पडतात, त्याचा अभिमान वाटतो. कारण तोच चांगला क्षेत्ररक्षक ठरतो. शूज मात्र स्वच्छ ठेवायची सवय लावायला पाहिजे. नाहीतर विमानतळावरून माघारी पाठवायचे. टीशर्टला मराठीत काय म्हणतात, गंजीफ्रॉक? हा पूर्ण मराठी शब्द वाटत नाही. त्यापेक्षा टीशर्टच म्हटलेलं बरं, तर टीशर्टवरचे डाग घालवण्यासाठी मात्र चाकांचं चित्रं असलेला व्हिल साबण वगैरे लावू नकोस, असं आईला मुद्दामच सांगतो. डाग तसाच राहू दे. डाग चांगला असतो. तर मला हे क्षेत्ररक्षणाच्या वेळी जमिनीवर झेप मारण्याचे भारी वेड लागलं. आजोळी खेळताना सुरूवात क्षेत्ररक्षणापासूनच केली. अर्धा तास, एक तास, दीड तास किती वेळ क्षेत्ररक्षण करायचं अन् मातीत लोळायचं, अं? वैतागलो. धावांचा डोंगर उभा करण्यासाठी जीव आसुसला होता. आता धीर धरवेना. ये मला फलंदाजी द्या न्हायतर मी

न्हाय खेळत. असं म्हणावं तर म्हणतील, जा घरात बस. तुला कुणी बोलावलं होतं? त्यापेक्षा जरा गोडीगुलाबीनं घ्यावं... मी नम्रतेनं म्हटलं, अरे मला फलंदाजी द्या ना. माझा पडेल चेहरा पाहून म्हणा किंवा फलंदाजी करणारे दमलेत म्हणून म्हणा दिली त्यांनी फलंदाजी. खरं तर क्षेत्ररक्षणामुळे पार दमलो होतो. पण रूबाब दाखवायचा होता ना. ऐटीत धोनीसारखं उभा राहिलो. अन् ठोकला पहिल्या झटक्यात षटकार.... अरे ऽ रे ऽऽ त्या भावड्याने सीमेवरच झेल घेतला. मी म्हटलं, ये पहिलाच चेंडू जाऊ दे ना. दुसऱ्या चेंडूपासून बाद धरायचा. तर कुणी ऐकूनसुद्धा घेईनात. लगेच डच्चू. घरात गेलो तर आईचं तुणतुणं सुरू, कसा रे तू रडूबाई, बाद झाला की रडतोस? आता संघातूनच बाद केल्यावर..... एवढा वेळ क्षेत्ररक्षण करूनसुद्धा... माझ्यावर अन्याय झाल्यावरसुद्धा डोळे ओले होणार नाहीत का? तुम्हीच सांगा.

* * *



# असा मी... तसे ते... /२

आमची ताई म्हणजे ना. घरातली महाराणीच आहे. आमची आजी तिला राणीच म्हणते. पण ती आहे महाराणी. बाबा तर सगळं ताईचच ऐकतात. ताईची परीक्षा संपली की, ताईला सिनेमाला जायचं असतं. आई म्हणाली, नाटकाला जाऊ. तर नाही. ताई म्हणतेय ना सिनेमाला तर सिनेमालाच. मला तर कुणी विचारातच नाही. बिनखात्याचा राज्यमंत्रीच मी. एकदा बाबा म्हणाले, "खवय्यामधले जेवण छान असतं. गुजराती थाळी तर अप्रतिमच." आईला पण गुजराती थाळी फार आवडते. तर ताई म्हणाली.

"हॉटेल 'मेरा' नाहीतर 'वाटीका' मध्येच जाऊ या."

झालं. गुजराती थाळीमधील मुगाची खिचडी, त्यावर अशीऽऽ वरपर्यंत जाणारी तुपाची धार, सगळं सोडून कोंबडीची तंगडी तोडत बसली. हे एकवेळ ठीके. कारण तसं कोंबडीचा पाय मलाही आवडतो. पण कधी कधी जाम वैतागतो, अरे ऽ या घरात आम्हाला कुणी वालीच नाही का?



ताईचा वाढदिवस असला की, तिला दोन, दोन ड्रेस, चपलांचे जोड, सँडल्स, मैत्रिणींना हॉटेलात पार्टी. अन् माझा वाढदिवस असला की, फक्त केक न् वेफर्स. मित्रांना बोलावून मजा केली की ताई नाराज. हिला कधी गोंधळ घालता येत नाही. मजा करता येत नाही. दुसऱ्यांनी केलेली बघवत नाही. मित्रांनी दिलेल्या भेटवस्तू बघायला मी सगळ्यांना बोलावतो. मला एवढ्या छान वस्तू, गोष्टींची पुस्तके मिळतात म्हणून केवढा आनंद झालेला असतो, तर या महाराणी काय म्हणतात, तेवढ्याचसाठी वाढदिवस करतोस. असं वाटतं की सगळ्या वस्तू तिच्या डोक्यात नेऊन घालाव्यात.

पाहुणे आल्यावर तर तिचं एवढं कौतुक चालतं, पाहुण्यांना वाटावं ह्यांना फक्त एकच मुलगी आहे. आमची राणी, चित्रे छान काढते. चित्रे तर मी पण काढतोच की, रंग द्यायला नाही नीट जमत तर काय करणार? राणी अभ्यासात खूप हुशार आहे, सारखा अभ्यास करते. आता मला सांगा, थोडा अभ्यास करून जास्त गुण मिळवणारा मी हुशार का सारखंच घोकंपट्टी करणारी ताई हुशार? पण माझं कुणालाच कौतुक नसतं. सारखं ताईचंच कौतुक. असं म्हटलं तर आई म्हणते कशी,

"अरे, जाऊ दे रे नांदायला गेल्यावर कोण करेल तिचं कौतुक? ती काय आपल्याजवळ कायमची थोडीच राहाणारे?"

म्हणजे जवळ रहाणार नाही म्हणून तिचं कौतुक! मग मी आईला म्हणलं,

"माझं लग्न झाल्यावर मी पण दूर निघून जाईन. मग तुम्हाला सारखं सारखं भेटणारच नाही."

आता आईला वाईट वाटेल, डोळ्यात पाणी आणेल, असं वाटलं तर पाठीत धपाटा घालून म्हणते कशी,

"हात् मेल्या, बायकोच्या ऐकण्यातच राहाणार वाटतं."

* * *

# असा मी... तसे ते.../३

एकदा कुठं वाचलं बरं?.... आठवलं. टी.व्ही. वरच. वाचनसुद्धा टी. व्ही. वरच करावं लागतं. 'वाचाल तर वाचाल' हा काय प्रकार मी बाबांना विचारलं, तर बाबा म्हणाले,

"पुस्तकं वाचली तरच आपण वाचू."

"कसं काय?" मी म्हटलं.

"अरे गाढवा, एवढं कसं कळेना? वाचणे म्हणजे अभ्यास. अभ्यास केला तरच शिक्षण, शिक्षण असेल तरच नोकरी आणि नोकरी असेल तरच आपल्याला जगायला पैसा मिळेल ना?"

"आपलं मांजर कुठं वाचतेय, तरीपण ते जगतेय ना?"

असं म्हणून बाबांच्याकडं बघितलं तर बाबांनी पाठीत धपाटाच घातला, म्हणाले,

"या कार्ट्याला कसं न् काय सांगावं? नुसता शहाणपणा दाखवतो."

तरी पण मला चैन पडेना. गावाकडे बैलाने नांगरतात, तो बैल कुठे वाचतो. पण छान नांगरतो. असं आजोबा म्हणतात. ते एकदा म्हणालेले, नांगरट चांगली झाली की पीक पुष्कळ निघते. पीक म्हणजे ज्वारी, गहू वगैरे. तेच खाऊन आपण जगतो. म्हणजे बैल वाचत नाही, आजोबा वाचत नाहीत. पण ते धान्य पिकवतात. तेच तर खाऊन आपण जगतो. खरं तर शेती केली तरच आपण जगू असं म्हणायला पाहिजे. 'प्रत्येकाने शेती करायलाच पाहिजे.'

असं घोषवाक्य टी. व्ही. कडे पाठवता आलं तर....

एकदा आई टी. व्ही. बघत होती. रविवार असल्यामुळे घाईत नव्हती. घाईत असली म्हणजे आई नीट सांगतच नाही काही. नुसती वैतागलेली असते. आता निवांत बसलीय तर विचारूया म्हणून आईला म्हटलं,

"आई, वाचाल तर वाचाल. म्हणजे कसं गं?"

आई वैजयंतीमालाचं 'परदेशी बाबू....' का काय ते बघण्यात गुंग होऊन गेली होती. असं विचारताच एकदम दचकून,

''अरे उतू गेला वाटतं चहा. या घरात गॅसकडे माझ्याशिवाय कुणाचंसुद्धा लक्ष नसतं. रविवारी तरी आयता चहा कोणी देईल का?''

झालं आईची मनस्थिती बिघडली. मग एक दिवस दूरच्या नात्यातला दादा आला. त्याला विचारले, शेतकरी, मांजर किंवा इतर सजीव प्राणी वाचत नाहीत तरी ते छान जगतात. मग माणसालाच असं का सांगायचं? तर तो म्हणाला,

''माणूस हा बुद्धीवान प्राणी आहे ना, माणसाला बुद्धीचीसुद्धा भूक असते. ही बुद्धीची भूक भागवली तरच माणूस नीट जगू वाचू शकेल. हो की नये. तब्येत चांगली राहाण्यासाठी कसं डॉक्टर दूध, अंडी, पालेभाज्या, कच्च्या भाज्या खायला सांगतात. तसं बुद्धी चांगली राहाण्यासाठी अभ्यासाशिवाय अवांतर वाचन करावं. म्हणजे बुद्धी धारदार रहाते.''

''अवांतर वाचन म्हणजे?''

''शाळेतल्या अभ्यासाशिवाय रोजचे वर्तमानपत्र, गोष्टींची पुस्तके, कथा, कादंबऱ्या वाचणे म्हणजे अवांतर वाचन.''

''वा ऽ हे तर लय भारीय.''

मी टुणकन उडीच मारली. मिळतील ती गोष्टीची पुस्तके वाचू लागलो. आईबाबांना वाटलं, पोरगं चांगलंच अभ्यासात रमलंय, म्हणून ते पण टी. व्ही. पहाण्यात रमू लागले.

एके दिवशी माझे प्रगती पुस्तक मिळाले. गणित-इंग्रजीत नापास, इतिहास, भूगोलात काठावर पास. झालं, बाबांना दाखवलं तर ते घर डोक्यावर घेतील. आईलाच दाखवावं. ती घेईल सगळं समजून. असा विचार केला न् आईलाच दाखवलं. प्रगती पुस्तक बघून ती हादरलीच. मटकन खालीच बसली. मी घाबरलो. काही कळेनाच. थोड्यावेळानं सही केली न् म्हणाली.

''बाबांना दाखवू नकोस न्हायतर तुझ्याबरोबर माझी पण चंपी व्हायची.''

''बाबा विचारतीलंच की, खोटं बोलायचं?''

''तू नको काहीच बोलू. मी सांगते सगळं बाबांना. पण एवढीच वेळ. पुढच्या परिक्षेत चांगलेच गुण पडायला पाहिजेत. कारण तू अवांतर वाचण्यावरच जास्त भर दिलास. अभ्यास करून मगच अवांतर वाचायचं. कळलं?''

मी सुटलो, वाचलो. खरंच मला साक्षात्कारच झाला की वाचल्यामुळेच आपण आईबाबांच्या मारातून वाचलो. वाचण्याचा हा पराक्रम चांगलाच आवडला अन् मी मग नेहमीच वाचू लागलो. पण अभ्यास करूनच हं!

* * *

# असा मी.... तसे ते.../४

सुट्टीत मावशीकडे गेल्यावर तर काय विचारायलाच नको. मावशीच्या अन् आईच्या गप्पा कधीच संपणार नाहीत. त्या गप्पा जर एकसारख्या आठवडाभर लिहून घेतल्या तर, महाभारताचे आठ खंडाएवढे लिखाण होईल. काय एवढं बोलतात त्यांनाच माहीत. मला मात्र मावशी गोड गोड बोलून अनुजाला खेळव म्हणून सांगते. तर आई दरडावून, ये खेळव ना जरा आम्ही पोरांसाठी किती खस्ता खातो अन् आमच्यासाठी थोडा वेळ छोट्या भावंडांना खेळवता येत नाही. मुकाट्याने अनुजाला घेऊन बाहेर जातो. तर तिचे पन्नास प्रश्न. नुसता वैताग. मलाच कधी उत्तरं मिळालेली नसतात. तर मी तिला काय सांगू? मग मी पण आईबाबांसारखा अनुजावर खेकसलो. 'ये गप्प बस नाहीतर एक धपाटा घालीन.' असं नुसतं म्हटलं तरी अनुजाचं भोकाड सुरू झालं. आईनं मला रागवावं अन् मावशीनं अनुजाला कडेवर घेऊन, 'काय झालं माझ्या शोन्याला. दादानं मारलं? आपण दादाचं घर उन्हात बांधू हं. उगी उगी.' तसं शोन्याचा हूँ ऽऽ हूँ ऽ वाढतच चाललेला. अस्सा राग येतो. एवढा



वेळ सांभाळलं ते सगळं खड्ड्यातंच गेलं. आई ओरडलीच,

"काय केलंस रे तिला गाढवा ऽ किती रडतेय बघ? जा पटकन्, हे पैसे घे अन् तिला चॉकलेट आण कोपऱ्यावरच्या दुकानातून. त्याशिवाय तिचं रडंच थांबणार नाही."

म्हटलं बरं झालं सुटका झाली वर चॉकलेट पण मिळणार. दुकानात निघालो तर अनुजा रडायचं थांबून म्हणाली.

"दादा, मी पण येते."

चॉकलेट म्हटलं की गेलं रडं हिचं. चल, म्हणावंच लागलं. दुकानात गेलो. दोन मेलडी चॉकलेट घेतले. एक अनुजाला दिलं. एक आता वरचा कागद काढून छानपैकी तोंडात टाकणार तेवढ्यात अनुजानं भोकाड पसरलं. आता काय झालं?

"मला मोठी कॅडबरी पायजे."

चॉकलेट फेकून तिथंच ऐश्वर्यासारखा थयथयाट सुरू केला. कॅडबरीएवढे पैसे नव्हते.

शेवटी,

'हे माझंही चॉकलेट घे अन् तुझा सुपर डान्स बंद कर.'

तिला असं जोरात ओरडावं वाटत होतं, पण ऐश्वर्याचं मायकेल जॅक्सनमध्ये रूपांतर व्हायला नको म्हणून समजावत म्हटलं,

"हे घे दोन दोन मेलडी खाव."

(खुद उपाशी ऱ्हाव.) तिनं फेकलेलं चॉकलेट पुसून दोन्ही तिलाच देऊन कसं तरी शांत केलं. अन् मामा पुता करून घरी आणलं.

आई घरी एवढं खा खा म्हणते. मावशीकडं आलं की, मात्र माझ्याकडं तिचं लक्षच नसतं. ह्या दोघींचं गप्पांनी पोट भरतं म्हणून काय मी अनुजाच्या रडण्यानं माझं पोट भरावं की काय? ते काही नाही, घरी गेलो की काय तरी खायलाच मागतो. मावशीचे डबेही माहीत नाहीत हातानं घ्यावं तर.

"आई, भूक लागलीय. खायला दे ना."

"दुसऱ्यांच्या घरी गेलं की तुला सारखी कशी रे भूक लागते? खादाड म्हणतील, जरा भूक काढायला शिकावं."

सुट्टी म्हणजे असा छळ असतो. खरंच आम्हाला कुणी वालीच नाही!

* * *

# असा मी... तसे ते.../५

एकदा माझी दाढ फारच दुखायला लागली. आता आईकडं गेलं की ती खवळणारच. म्हणणार, गोळ्या, चॉकलेट खायला पाहिजेत. दात दोन वेळा घासायला नको, चला आता डॉक्टरचा खिसा भरायला. डॉक्टरकडे गेले की ते तोंड वासायला सांगतील. माझ्या तोंडात स्वतःचा हात घालून... ओ ऽ ऽ ओ ऽ ते आठवून ओकारी यायला लागली. वर आणखी सांगणार, ह्या गोळ्या घ्या, ह्या औषधाने चार वेळा गुळणा करा. बरं वाटलं नाही तर परत या. दाढ काढून टाकू. म्हटलं त्यापेक्षा सुरक्षाचक्राच्या पेस्टनं दाढ चांगली घासून काढावी. हिरडी काय म्हणेल याची वाट न बघता जोराजोरात दात घासले. थोडसं रक्त आलं पण ठणका काही राहिना. मग भीतभीतच आईला सांगितलं. आता आईनं भलं मोठं भाषण दिलं तरी ऐकून घ्यावंच लागेल. तर आईनं स्वतः तोंड मिटून मलाच उघडायला सांगितले. 'आऽऽ' करून तिच्यासमोर उभा राहिलो. हळूच तिच्या हातात चिमटा आहे का बघितलं. काय सांगावं पर्स रिकामी होईल म्हणून घरातच दाढ काढायची. त्या नादात माझा आ मिटला. मग ओरडली. अरे, हलू नकोऽस मग पुन्हा पुतळ्यासारखा आऽऽ करून उभा. तर म्हणाली, मिट. आता काय करावं. मी आपला असा ऽऽ दाढ धरून आत बाहेर करत होतो. खरच आईनं चिमट्यानं दाढ काढली तर बरं होईल, असच वाटायला लागलं. पण आई तर मिक्सरवर काहीतरी दळायला लागली. बहुतेक लवकर स्वयंपाक करून दवाखान्यात न्यायचा विचार दिसतोय. मला ती दातांच्या दवाखान्यातली मोठी खुर्ची आठवली. तसलीच



खुर्ची मला वाटतं ब्युटीपार्लरमध्ये पण असते. तिथं भुवया कोरतात, दवाखान्यात दात. बाबांना कळल्यावर आणखी खरडपट्टी. म्हणजे बघा, काय दुखाखुपायला लागलं तर प्रेम मिळावं, शाळेला, अभ्यासाला सुट्टी मिळावी ते सगळं राहिलं बाजूलाच. सगळ्यांची बोलणी मात्र खावी लागतात. 'पडू आजारी वाटे मौज भारी' ही कविता कवीला कशी सुचली कोण जाणे. वास्तवापेक्षा कवी कल्पनेतच जास्त जगतो की काय कुणास ठाऊक? आमच्या आईबाबांना आजारी कशामुळे पडतात हे माहीत असल्यामुळे आम्हाला नुसती पथ्यपाण्याबरोबर बोलणी खावी लागतात. फारच दुखतेय. ह्या दाढेमुळं काही सुचेना. बाबा काय काय म्हणतील ही एक धास्ती. जरा वेळाने आई हातात कसली तरी पांढरी भुकटी घेऊन आली. अन् म्हणाली,

"याने दात, दाढ घास, बरं वाटेल."

आता जाहिरातीसारखं थोडंच पूड घासली की ठणका कमी होईल का! पण आईला कसं सांगणार? घासली पूड थू ऽऽ थू ऽ ऽ अच्छी स्वादवाली नव्हतीच अन् जडीबुटीवालीही नव्हती. खारट-तुरट थू ऽ थू ऽ माझं तोंड झालं आंबट.

"अरे मीठ न् तुरटी आहे. त्यामुळे दात दुखायचे राहातात. चूळ भरल्यावर चार तुळशीची पानं चावून खा. रोज असं करायचं जेवणानंतर म्हणजे दवाखान्यात जावं लागणार नाही." हे रोज एवढं करायचं? आता मात्र माझं तोंड कडू कडू झालं. त्यापेक्षा दवाखाना परवडला की!

* * *

# असा मी... तसे ते.../६

प्रत्येकाच्या आईबाबाना वाटतं. आपल्या मुलांनी मोठं व्हावं. आपल्याला मोठं होता आलं नाही, पण मुलांनी मात्र मोठंच व्हायला हवं, आपलं नाव मोठं करावं. त्यांना स्वत:ला काही जमलं नाही म्हणून मुलं लहान आहेत तोवरच त्यांच्या मागे हात धुवून लागतात. सारखं. हे कर, ते शिक, ह्या शिकवणीला जा, त्याचा सराव कर. वर अभ्यासाचं टुमणं असतंच सारखं. अगदी घोटून घोटून घेतात. अन् म्हणतात. पहिल्या पाचात तरी यायला हवंच, न्हायतर आमची सगळी घालवाल. आता नंबर नाही आला तर ह्यांची काय नी कशी जाईल कळत नाही. मला तर ह्या मोठ्या लोकांचं काहीच समजत नाही. दुसरं करतात म्हणून आपणही का करायचं? सगळे पळायला लागले की आपणही त्यांच्यामागे का पळायचं? पळावसं वाटलं नाही तरी? आपल्याला जे करावसं वाटेल ते करावं. म्हणजे ज्यात मजा येईल, चांगलं आणि वेगळं असावं. जरा हट के. सगळे करतात तेच करण्यात काय मजा? पण हे आईबाबांना कोण सांगणार? सगळ्यांची मुलं जातात कराटेच्या शिकवणीला, तर घातलं मलाही कराटे क्लासला. शाळेतून दमून भागून यायचं, दिवसभर जीव घुसमटून जातो. काहीतरी खाऊन मुलांच्याबरोबर मोकळ्या मैदानावर मनोसोक्त खेळायचं असतं, तर म्हणे कराटेच्या शिकवणीला उपाशीच जायचं असतं. मग दप्तर आदळून निघायचं तसंच. तिथं हा ऽ ऽ हू ऽ करायचं. पोटात कावळे ओरडत असतात. अन् मनात मी ओरडतो. मला नकोय असली शिकवणी. पण मनातच. कारण काही बोलायला गेलं की, हं, 'कराटेच्या शिकवणीला गेलं की तोंड उचलून बोलायचं असतं का?' इती आई. शिकवणीला गेलो तर तिथे गुरूजींचा पत्ताच नसतो. मग मुलं टिवल्या बावल्या करतात. दंगामस्ती करायला उपाशीपोटी कुणालाच उत्साह नसतो. शिकवणीचा निम्मा वेळ संपून चाललेला. मग गुरूजी येतात. सगळ्यांना रांगेत उभं रहायला सांगतात. कराटेच्या एक दोन कृती करून दाखवल्या. नंतर आमच्याकडून करवून घेतल्या. झालं संपली शिकवणी. जाताना सांगितलं, घरी सराव करा.

घरी आल्यावर आईचं सुरू झालं,

"आज नेली का रे पोटावरनं सायकल?"

"नाही." मी वैतागून म्हटलं.

"मग कधी नेणारेयत?"


"मला काय माहीत?"

"अरे पाटलांच्या धनूच्या अंगावरनं मोटारसायकलसुद्धा नेतात. तो विटा फोडतो हाताने. आणि आपला डॉ. महेशदादा त्याच्या तर पाठीवर मोठमोठे कळक तोडलेले आणि पोटावरनं फटफटी नेलेली मी बघितलंय. माझ्या स्वत:च्या डोळ्यांनी!" आईचं नेहमी असंच सुरू असतं, त्याने हे केलं न् ह्याने ते केलं. आपलं ते कार्ट... अन् दुसऱ्याचा तो बाळ.... असंच सध्या चाललंय. आता मला सांगा पाठीवर बांबू फोडले आणि पोटावरनं फटफटी नेली हे एका दिवसात झालं का? त्यांनी कितीतरी वर्ष सराव केला असेल. त्यांच्या कष्टाचं फळ त्यांना मिळाले. पण आमच्या आईला वाटतं आपल्या दिवट्याचा उजेडच पडेना. तो पडावा म्हणून मग सारखी तुलना करायची. आपला मुलगा शक्तिमान व्हायलाच पाहिजे, त्या अमक्या तमक्यासारखा. पण मी माझ्यासारखा 'मीच' होणारेय. असं काही आईला सांगायला गेलो तर म्हणेल.

"तोंड उचलून बोलतोय."

खरंच रे बाबा आम्हाला कोणीच वाली नाहीये!

* * *



# असा मी... तसे ते .../७

कुठल्याही बाबांच्या नवीन मित्रांकडे जायचं म्हटलं की, सुरवातीला मला खूप आनंद व्हायचा. तिकडे गेले की आईबाबा माझे अतिशय कौतुक करतात. असलेले गुण फुलवून सांगतात. तर नसलेले गुणही सांगतात. कधी मजा वाटती कधी वैताग येतो. पण गरम गरम छान पदार्थ खायला मिळतात. त्यांच्याकडे माझ्याएवढंच मूल असेल तर मग खेळायला मजा येती. आता मी मोठा होऊ लागलोय. बालीशपणाचा राग येतो.

घरातून बाहेर पडलं की आईचं सुरू, 'नीट बैस, हात व्यवस्थित ठेव. नाकात, तोंडात बोट घालायचं नाही. आग्रह केल्याशिवाय खाऊ नकोस. चहा तर पितच नाही म्हणायंच. उगीचच खोटं बोलायला शिकवतात. घरात कधीतरी चहा पितोच ना! मग पाहुण्यांच्यांकडे एखादेवेळस प्यायला म्हणून काय झालं. त्यांना दुसरा खाऊ देण्याचा उगाच त्रास नको. न्हायतर कसं होतं, मुलं चहा पित नाहीत म्हटलं की, दुसरं काही तरी द्यावं लागतं की नाही? तसं मी एकदा घरात बोललो. तर आई म्हणाली,

"बरं, बरं. पण चहात वेंधळ्यासारखं बिस्किट बुडवून खाऊ नकोस."



घरात मात्र चहात चपाती, खारी, टोस्ट, ब्रेड, सगळ्या प्रकारची बिस्किटे बुडवून सगळेच खातात. मग बाहेरच हे वेंधळ्यासारखे कसे होते? आईचं एवढं ऐकून भूक मात्र वाढत जाते. तिथं गेल्यावर शहाण्यासारखं बसतो. आईबाबांनी केलेली खरी खोटी स्तुती ऐकतो. अगदी शहाण्यासारखं. कधी कधी लाजायलासुद्धा होतं. मग खाण्याच्या ताटल्या येतात. ती शहाण्यासारखी पटकन घेतो. तर आईचे डोळे मोठे होतात. आता काय झालं? तेवढ्यात आई त्या काकींना म्हणते,

"अहो, तो एवढं नाही घेणार, टाकेल उगीच. थोडं कमी करा."

ती गरम गरम वाफाळलेली पावभाजी वर अमुलचं लोणी. नाकाडोळ्यात, जिभेवर प्राण एकवटले, त्याचा आस्वाद घ्यायला. माझ्या नकळतच मी म्हटलं,

"असू द्या खातो मी सगळी."

पटकन त्या काकींनी ताटली आत न्यायच्या आत जवळजवळ ओढूनच घेतली अन् खायला सुरुवात सुद्धा केली. आईबाबांकडे खाईपर्यंत बघितलेच नाही. त्यांचे चेहरे कसे झाले असतील हे बघायचे तर जाऊ द्याच पण कल्पना करायला सुद्धा वेळ नव्हता.

झालं! घरी आल्यावर दरवाज्याचं कुलूप उघडायच्या आधी आईच्या तोंडाचं कुलूप उघडलं. अन् तिचे शब्द बर्कीच्या धबधब्यासारखे कोसळू लागले. आई जर शंकर असती ना तर नक्कीच तिनं तिसरा डोळा उघडून मला भस्मसात केलं असतं! त्यापेक्षा हा धबधबा बरा! मी बाबांना हळूच म्हणलं,

"आणेकरकाकींनी छान केली होती ना पावभाजी. मला खूप आवडली म्हणून सगळी खाल्ली. त्यांची छोटी साक्षीसुद्धा किती चवीनं खात होती. आईला कुठं अशी जमते?" मग बाबा आईला म्हणाले,

"जाऊ दे गं. पण खरं सांगू का, वहिनींच्या हाताला चव आहे. त्या सगळेच पदार्थ छान करतात. पांढऱ्या रस्स्याचं विचारलंस का त्यांना."

आता मोर्चा बाबांकडे.

"तुम्हाला मेलं दुसऱ्यांच्या घरचं तेवढं नेहमी चांगलं लागतं. मी मरमर एवढं कष्ट करते. तर कवडीची किंमत नाही. कधी म्हणून कौतुक करायचं नाही."

आईची फुसफुस सुरू. आता मात्र आईच्या डोळ्यातून अंबोलीच्या धबधबा सुरू होतोय की काय म्हणून मी तर भीतीनं गारच पडलो.

* * *

# प्रश्न पडायला पाहिजेत

"आका! उठ ना लवकर उशीर होतोय."

गार्गी कपडे घेऊन न्हाणीत आंघोळीला गेली. तरी गौरी उठेना. आज शनिवार सकाळची शाळा. लवकर उठून आंघोळ, वेणी आटोपून चहा, नाष्टा करायलाही एवढा वेळ लावी... काही विचारायची सोय नाही. रात्री टी. व्ही. वरचे सगळे कार्यक्रम बघणार. आईबाबा शेतात कामाला जायचे. ते थकून लवकर झोपायचे. तरी ही आपली उशीरापर्यंत जागीच. आता तिच्या डोळ्यावरची झोप काही जात नव्हती. तरी बरं आठवड्यातून एकच दिवस सकाळची शाळा असते. गार्गीची अंघोळ झाली तरी गौरी झोपेतच.

"गौरी ! उठ ना गं."

असं म्हणत तिच्या आईनं तिला बसतं केलं. तेव्हा कुठं तिनं डोळं उघडलं. कशीतरी जाग आली तिला. घाई घाईनं तिनं दात घासले. चहा चपाती खाल्ली.



सांडलवंड करत एकदाचं आटोपलं. गार्गी आवरून कितीतरी वेळ तिची वाट बघत होती. गार्गीचं नेहमीच लवकर आवरायचं. तिला लवकर जायचं असायचं. पण आईची सक्त ताकीद होती, दोघींनी मिळूनच जायचं न् येयचं.

भलताच उशीर झालेला. गार्गी चिडलेली. दर शनिवारी हाच गोंधळ. गौरीनं केसावरून कसातरी कंगवा फिरवला. केसांचं टोपलं थोडं खाली बसलं. दप्तर न तपासता घेऊन निघाली. तरी बरं गार्गीनं स्वत:च्या डब्याबरोबर तिचा डबा, पाण्याची बाटली तयार ठेवलं होतं. दोघी पळतच शाळेत निघाल्या. शाळेत पोहचेपर्यंत प्रार्थना संपून, मुलं आपापल्या वर्गात जाऊन बसलेली. सगळे शिक्षक शिक्षकखोलीतून वर्गावर जाण्यासाठी बाहेर पडलेले. तेवढ्यात ह्या दोघी दिसल्या. गौरी मोठी असून तिचे कपडे चुरगळलेले. केस विस्कटलेले. वेणी घातली नव्हती. नुसता अवतार दिसत होता. गार्गी मात्र एकदम टापटिपीत होती. गार्गी अभ्यासात पण हुशार होती. तिचा पहिला नंबर कधी चुकला नाही. त्यामुळे सगळ्या शिक्षकांना तिचं कौतुक वाटे. गौरी सातवीत तर गार्गी चौथीत होती. गौरीचे दंगामस्ती करणं, वरचेवर शाळा बुडवणं, गृहपाठ न करणं असं नेहमीच चाले. जेमतेम कशीतरी पास व्हायची. डिसेंबर जानेवारीमधे खेळांच्या स्पर्धा असत. तेव्हा मात्र गौरी कबड्डी, खो खो, लंगडीत पुढे असायची. गौरीमुळेच संघ जिंकायचा. स्पर्धा संपल्या की झालं तिचं कौतुकही संपलं. एरवी तिच्या खोड्या, उनाडक्याच सगळ्यांना दिसायच्या. आताही देवकाते गुरूजींना ह्या दोघी येताना दिसल्या. वर्गात जाणार तेवढ्यात सगळ्यांना उद्देशून गुरूजी म्हणाले,

"बघा! बघा दोघी बहिणी. गौरी मोठी असून तिचा अवतार बघा! गार्गी लहान असून कशी नीटनेटकी आलीय. शिवाय अभ्यासातही हुशार. गौरीसारखे नाही, काठावर पास!"

सगळे शिक्षक तिच्याकडे बघून हसत आपापल्या वर्गात निघून गेले. गौरीला ह्या असल्या बोलण्याची सवय झालेली. ती कोडगीच झालेली म्हणा ना! नाहीतर स्वत:ला सुधारण्याचा थोडा तरी प्रयत्न नसता का केला तिनं! उलट ती जास्तच वांड होत चाललेली. त्यामुळे अभ्यासात मागे. दोघीही आपापल्या वर्गात जाऊन बसल्या.

मुख्याध्यापक शाळेत आल्यावर प्रत्येक वर्गात जाऊन बघत कसं कसं चाललंय. चौथीच्या वर्गात गेले. त्यांनी सगळ्या मुलांच्या वह्या तपासल्या. गार्गीची वही बघितली. सुंदर, स्वच्छ अक्षर खाडाखोड नाही. गिचमीड नाही. एवढं सुबक

अक्षर सातवीतल्या सुद्धा मुलांचं नव्हतं. त्यांनी गार्गीची वही सगळ्या वर्गात फिरवली. सगळ्या शिक्षकांनी गार्गीचं तोंड भरून कौतुक केलं. सातवीच्या वर्गात तिची वही आली. सातवीला मणेरगुरूजी वर्गशिक्षक होते. त्यांनी गार्गीची वही घेऊन सगळ्यांना दाखवली. तेव्हा गौरी म्हणाली,

''माझीच बहिणे ती.''

''मग बहिणीकडून शिका जरा, अक्षर कसं चांगलं काढायचं ते!'' मणेर गुरूजी म्हणाले. गौरी हिरमुडून गेली. तिचा चेहरा पडला. त्यामुळे गुरूजींनाही वाईट वाटले. पण आता बोलून गेले होते. विद्यार्थ्यांना चुकलं, माफ करा वगैरे म्हणायची पद्धतही नाही. पण मनात राहून गेले. त्यांना गौरीबद्दल सहानभूती वाटली. तिला टोचून बोलायचं त्यांनी कमी केलं.

मणेर गुरूजीचं नवीन लग्न झालेलं. त्यांच्या बायकोला भेटण्यासाठी सगळ्या मुलींनी टुमणं लावलेलं. आम्हाला बाईंना बघायचंय... वगैरे. एका रविवारी त्यांनी मुलींना भेटायला बोलावले. गुरूजींनी बोलावलंय म्हणून मुली हरखून गेल्या. स्वच्छ इस्त्री केलेले कपडे घालून. अगदी नट्टापट्टा करून, ठरल्याप्रमाणे रविवारी दुपारी चार वाजता मुली निघाल्या. जाता जाता गौरीला हाक मारली, तर ह्या महाराणी टी. व्ही. पुढं लोळत होत्या. मुली म्हणाल्या,

''अशा अवतारात नको बाई येऊस. सगळं नीट आवरून ये.''

असं म्हणून गेल्या सगळ्याजणी. गणवेषाव्यतिरिक्त, तिला दोनच वापरायचे कपड्यांचे जोड होते. एक वाळत टाकलेला, एक अंगावर. मग तिने वाळत टाकलेला तसाच इस्त्री न करताच घातला. वेणी घातली. आणि गेली गुरूजींच्या घरी. ती जाईपर्यंत मुली जायला निघालेल्या. त्या निरोपाचं बोलत होत्या. हिला काय करावं ते कळेना. ती मागेच उभा राहून बाईंना बघू लागली. तिला वाटलं जावं आताच ह्यांच्याबरोबर माघारी परत. तेवढ्यात गुरूजींचे लक्ष गेलं तिच्याकडं. त्यांनी तिला आत बोलावलं. ती दबकतच आत गेली. मुली गेल्यावर गुरूजींनी बाईंच्याबरोबर तिची ओळख करून दिली,

''ही गौरी, हिच्यामुळे आमचा वर्ग कबड्डी, खो खो मधे नेहमी जिंकतो. पण शाळेत मात्र नेहमी उशीरा येते.''

त्यामुळे तिचा फुललेला चेहरा पुन्हा पडला. तिला वाटलं उगाच आपण थांबलो. सगळ्यांबरोबर गेलो असतो तर बरं झालं असतं. ती अवघडून उभी राहिलेली. निघावं आता, या विचारात. मग बाईच म्हणाल्या.

"बस ना गौरी. तुझं नाव किती छाने ना."

तिथं सतरंजी अंथरलेली. त्याच्यावर अवघडून बसली. बाईंनी तिला पोहे दिले. पोहे बघून तिला खूप बरं वाटलं. तिची आई नेहमी सकाळी चपात्याच करायची. पोहे कधी तरी करायची. म्हणायची. 'एक काम हाय का, कुठं खेळत बसायचं.' गौरीलाच म्हणायची, 'तू करत जा. कवा शिकायची स्वयंपाक करायला... रदाळी नुसती नांदायला गेल्यावर आयबाचं नाक कापायचं ध्यानय बघ तुझं. किती बोला पालथ्या घड्यावर पाणी!' बाईंनी केलेले पोहे मऊ चवदार झाले होते. ती मन लावून पोहे खाऊ लागली. बाईंनी घरची चौकशी केली. गुरूजी न राहवून म्हणाले.

"गौरी ! बघ उशीरा येण्यामुळे तुला पोहे पण गारच खावे लागले. तुला सगळे चिडवतात. तरी तू असं का राहातेस नीटनीटके राहावे, लवकर सुरुवात करावी, आवरायला, टी. व्ही. बघायचा कमी करावा जरा. म्हणजे अभ्यास चांगला होईल."

गौरी अचंब्याने त्यांच्याकडे बघायला लागली. ह्यांना कसे कळले, आपण टी. व्ही. बघतो ते. तिची कुचमलेली अवस्था बघून बाईच म्हणाल्या,

"गौरी, दिवसभर एकटीच असते मी. माझ्या अजून ओळखी झाल्या नाहीत. तू येशील का आमच्याकडे अभ्यासाला? तुझा अभ्यासही होईल न् मला पण करमून जाईल."

"अगं गौरी तू खेळात खूप चांगलीय. पण आपल्या खेड्यात काय उपयोग आहे का? तुझे आईवडील फार श्रीमंत नाहीत. तुला नीट अभ्यास करून, नीटच शिकायला नको का? तू हुशार आहेस पण आळशी आहेस. तू नीट शिकली नाहीस तर तुला माहितेयना, इथं घरी बसलेल्या मुलींचं लग्न करतात ते."

गौरी त्या कल्पनेनंच भेदरली. तिनं कसेबसे पोहे संपवले. ताटली आत नेऊन, धुवून ठेवली. तिचं वळण बघून, तिची निरागसता बघून, बाईंना ती आवडली. बाई म्हणाल्या, "आता गेले ते दिवस. इथून पुढं मीच घेत जाईन तुझा अभ्यास. शाळा सुटली की येशील ना?"

"आईला विचारून बघते."

गौरीला आपण एवढं शुद्ध मराठी कसं काय बोललो, याचंच आश्चर्य वाटलं. तिला बाईंच्या आपुलकीनं छान वाटलं. आजपर्यंत एवढं जिव्हाळ्यानं कधीच कोण बोललं नाही की कधी काही सांगितलं नाही. सगळे नेहमी खेकसतच

बोलायचे. आई धपाटे घालणार. मैत्रिणी चेष्टा करणार, शिक्षक उंडगी म्हणून दुर्लक्ष करणार, नाहीतर जरा काय चुकलं की शिक्षा देणार. मग सगळ्यांचाच राग यायचा. कायच करू वाटायचं नाही! आपण अशाच असणार! आपण मुळीच चांगले नाहीयोत! आपल्याला सगळे असेच टाकून बोलणार! गार्गीचं मात्र सगळीकडं कौतुक चाललेलं असतं! आपलं कशाचच, कुणाला काही वाटत नाही! आज मात्र बाई, गुरूजी किती छान बोलत होते. तिला हुरूप आला. नवं काय काय सुचायला लागलं. रोज लवकर उठून अभ्यासाला बसायचं, गार्गीबरोबर. आईला मदत करायची. पटापटा आवरून शाळेत जायचं. असं ती मनातल्या मनात ठरवू लागली.

गौरी रोज गुरूजींच्या घरी जायला लागली. नीटनेटकी राहू लागली. टी. व्ही. बघणं बंदच केलं. मन लावून शिकू लागली. घरी आली की बाईंच न् गुरूजींचं गुनगान गायची. तिच्या आईबाबांना वाटलं, कसं का होईना पोर नीट शिकू लागली. मार्गाला लागलं आपलं लेकरू. शेतातनं आणलेला भाजीपाला, गौरीबरोबर यायचा गुरूजींच्या घरी. कधी ज्वारी गव्हाचं चुंडकं गौरीचे बाबा आणून टाकायचे. कसं ना कसं लोकांचं उपकार फेडायचं या भावनेनं ते काहीना काही देत राहायचे. वार्षिक परीक्षा झाली. बाईंना सोडून जावं लागेल म्हणून गौरी, गार्गीबरोबर आजोळीसुद्धा गेली नाही.

एके दिवशी गुरूजी हातात पेढ्यांचा पुडा घेऊन आले. अंगणातूनच म्हणाले, ''गौरीचे बाबा आहेत का घरात?''

''हाय कीं, अरेच्या, गुरूजी तुमी व्हय, राम राम. या या गरीबाघरी कशी काय पायधूळ झाडली?''

''तुम्ही कसले गरीब, दोन हुशार मुलींचे वडील आहात. घ्या पेढे खा.''

''पेढं कसलं, मुलगा झाला की काय?''

''अहो तुमची गौरी सातवीत पाचव्या क्रमांकानं पास झाली!''

गौरीच्या बाबाने गुरूजींचे पाय धरले. म्हणाले,

''आपली न् बाईंची कृपा!''

''बाईंनी तिला बदलवलं, सुधरवलं. तिनंही ठरवलं आपण बदलायचं. म्हणून सगळं घडलं. कुठंय गौरी.''

त्यांच्या बोलण्याच्या आवाजानं आई न गौरी बाहेर आल्या, गुरूजी म्हणाले.

''गौरी धर पेढे खा. तू आमच्या विश्वासाची, शिकवण्याची लाज राखली.''

"व्हय गुर्जी, तुमी म्हणूनच सुधरवलं बघा गौरीला. न्हायतर आमच्याच्यानं कुठलं झालं आसतं वं? पोरगी वाया गेली असती." गौरीची आई गद्गद्ल्या आवाजात म्हणाली. "गौरी अगं पाया पड गुर्जींच्या."

गौरी पाया पडून आत गेली. चुलीवर चहा ठेवू लागली. गुरूजी बाहेरून म्हणाले, "गौरी बाहेर ये पाहू. चहा नंतर कर."

गौरी बाहेर येऊन बसली. गुरूजी बोलू लागले, "तुला कळले ना. नीट अभ्यास केला, चांगले राहिले की कसं सगळे चांगले वागतात ते. आपले नाणे खणखणीत असले की कुणाची टापय बोलायची! आपणच ठरवायचं असतं, घडायचं का बिघडायचं! थोडेसे बिघडल्यासारखे वागले की लोक बोलून बोलून आणखी बिघडवतात. ते म्हणतात ना, 'बोटे घालून मोठे करणे' असा प्रकार असतो लोकांचा. म्हणून आपले आयुष्य चांगले कसे होईल हे बघायचे. आपले बघून दुसरे पण चांगले वागतील. आहे का नाही! चुकांतून शहाणपण येते. पण त्याच त्याच चुका सारख्या करणे म्हणजे मुर्खपणाच असतो. प्रयोग करायचे, स्वत:ला, इतरांना प्रश्न विचारायचे, त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करायचा. दुसरे करतात म्हणून आपण करायच्या आधी स्वत:ला प्रश्न विचारायचा, तसे का करायचे? तसे करण्याने भले होणारेय का? आनंद मिळणारेय का? आपल्या भल्यासाठी, आनंदासाठी दुसऱ्यांचे नुकसान होत नाही ना, कुणाला त्रास होत नाही ना? कुणाची फसवणूक होणार नाही ना? असा विचार करता यायला हवा. असंच का? तसंच का? असे प्रश्न पडायला हवेत. विचार केला की उमजत जाते हळूहळू. सगळे नाही पण थोडे थोडे तरी. या प्रश्न पडण्यानेच शास्त्रज्ञांनी एवढे शोध लावलेत. फार बोललो. आता भूक लागली बोलून बोलून. गौरी तुला पोहे करता येतात ना? कर मग."

गौरीने केलेले पोहे खाऊन, गुरूजींनी तिचं कौतुक केलं. गार्गी, गौरी तिचे आईवडिल सगळे खूश झाले.

आता गौरी खेळ, अभ्यास, स्वयंपाक असं सगळ्यातच हुशार झाली आहे.

* * *

# विठू वारकरी

एक छोटं गाव होतं. तिथं एक विठू नावाचा गरीब माणूस राहायचा. तो नेमाने पंढरपूरची वारी करायचा. म्हणून त्याला सगळे विठू वारकरी असंच म्हणायचे. विठू फार कष्टाळू होता. तो राहायचा ती झोपडी गावाबाहेर होती. तुराट्याच्या कुडाच्या भिंती वर गव्हाच्या काडांचं छप्पर. जमीन शेणानं सारवलेली. तो एकटाच झोपडीत राही. पाणी ठेवायला एक माठ, भात शिजवायला एक पातेलं, जेवायला एक ताट, एक वाटी, एक तांब्या. झाला त्याचा संसार. तो रोज भात शिजवून खायचा. त्याला भाकरी करायला येत नव्हती मग रोज तांदूळ आणायचे. तेवढेच शिजवायचे, न् खायचे. तो रोजगाराचे पैसे साठवायचा. ते झोपडीतच एका कोपऱ्यात पुरून ठेवायचा. विठूच्या झोपडीच्या दाराला नव्हते कुलूप. तुराट्यांचाच झाप करून, तो दाराला उभा करून लावी अन् दोरीनं बांधून टाकी. फटीतून एखादं कुत्र्याचं पिल्लू आत जायचं आणि उरलेला भात खायचं. म्हणून विठू भात शिल्लकच ठेवायचा नाही. एकदा तर पिल्लानं हगून घाण करून ठेवलेली. विठू दमून यायचा. दार उघडल्यावर त्याला घाण वास आला. खूप चिडला, पण करणार काय.... घाण तर काढायलाच पाहिजे. त्याने मग घाणीवर माती टाकली. गंजलेल्या मोडक्या घमेल्यात ती घाण भरली. आणि लांब नेऊन टाकली. येताना शेण शोधून आणलं. जमीन शेणानं सारवली. हात धुतला. मग चूल पेटवून भात शिजवला, खाल्ला.

उन्हाळ्यात विठू छप्पराची डागडुजी करून घ्यायचा. कुठून तरी गव्हाचे काड आणायचा. जिथं जिथं छपराला भोसका पडलाय तिथं तिथं काडाची पेंडी ठेवून घट्ट बांधायचा. कुठं भिताडाची पडझड झाली असेल तर तिथं तुराट्याचा कुड तयार करून लावायचा आणि भिंत उभी करायचा. मग शेणामातीचा चिखल तयार करून भिताडं लिंपून घ्यायचा. दुसऱ्या दिवशी पांढऱ्या मातीनं सारवायचा. वर्षातून एकदा एवढी डागडुजी केली की दररोज मजुरीनं कामाला जायला विठू मोकळा झाला. हिवाळ्यात, उन्हाळ्यात धूळ यायची. पावसाळ्यात थोडं तरी गळायचं. पण तो फारसं लक्ष द्यायचा नाही. केरसुणीला पैसे घालवण्यापेक्षा

उरल्या सुरल्या तुराट्यांचा खराटा करून त्यानंच विठू घर झाडायचा. मग जमीन उखणायची. कामावरून येताना तो तांदूळ, मीठ घेऊन यायचा. कधी डाळ, कधीतरी एखादी भाजी आणायचा पण भाजी आणली की तेल, मसालाही आणावा लागायचा. उगाच पैसे खर्च व्हायचे. म्हणून मग तो महिन्यातून एखाद्या वेळीच भाजी आणायचा. कामावरून आल्यावर तो पाण्याचा माठ भरून आणायचा. मग तुराट्याच्या बारीक काटक्या करून त्या चुलीत टाकायचा. त्याखाली कागदाचा एखादा तुकडा सरकावून त्याने चूल पेटवायचा. त्या चुलीवर भात शिजवायचा. घरात वीज नव्हतीच. घासलेट आणायला पैसे लागतात. घासलेट नाही म्हणून दिवा नाही. मग अंधार पडायच्या आत जेवून अंगणातल्या बाजल्यावर दात कोरत विठू एकटाच बसायचा. रोज कामाला जाताना तो पैसे पुरून ठेवालेल्या जागेकडे नीट न्याहळून बघून मगच जायचा. त्याच्या अंगावर फाटकी पैरण आणि खाकी अर्धी विजार असायची. ती सहा सहा महिने धुवायचा नाही. वाढलेलं केसांचं टोपलं त्याला तेल, कंगवा कधी लागला होता की नाही कुणास ठाऊक. तो कुणाशी नीट बोलायचा नाही. पोरांच्यावर तर नेहमीच खेकसायचा. मग पोरं त्याला चिडवायची. मागे पळायची. विठू मग दगडं घेऊन मुलांच्या अंगावर धावून जायचा. विठूकडे पाहून कुत्री पण भुंकायची. शेतावर मजूरीनं जायचा, तिथली लोकं विठूला म्हणायची,

"अरे बाबा नदीवर जा निर्मळवानी अंघोळ कर, कपडे धू."

तो म्हणायचा,

"मला येळ कुठं असतोय. पहाटंपस्नं वाळूच्या ट्रकवर जातू, वाळू भरायला. घरी जाऊन भात शिजवून खातू, मग शेतात येतूया. कवाशी जायचं अंघोळीला न् कपडे धुवायला? मरू दे."

नंतर लोकांनी सांगायचं सोडून दिलं. त्याच्या हेकटपणाकडं मग सगळेच दुर्लक्ष करायचे. दुपारी जेवायच्या सुट्टीत त्याच्याकडे जेवण नसायचं. तेव्हा त्याच्याबरोबर काम करणारे लोक त्याला आपल्यातील अर्धी चतकोर भाकरी कधीतरी खायला द्यायचे. तेव्हा त्याचा फार आनंद व्हायचा. मालक त्याला म्हणायचे,

"विठू किती आबाळ करतोस सोताची. आता लगीन कर."

"कोण करील माझ्यासंग लगीन?" विठू लाजून म्हणायचा.

"तुझं आयबाप कुठं असत्यातं?"

"वारले ते."

"तू एवढं पैसे कमावतोस. नीट रहावं, खावं प्यावं. न्हायतर काय उपेग त्या

पैशांचा. चोरांनी नेलं तर?'' मालक आपले सहज बोलून गेले. तर विठू घाबरलाच. म्हणाला,

''नको रे बाबा तसं व्हायला! चोर तर माझ्याकडं यात्यालंच. मालक मग वो काय करायचं?''

''पैसं बँकंत ठिवायचं?''

''मालक कुठय बँक, कसं ठिवायचं?''

''आता हिच्या भन, ह्याला तर कायच ठावं न्हाय. तुला बँकेत खातं उघडून देतो. माझ्याबरोबर तालुक्याला ये.''

विठूनं मालकाच्या मदतीनं बँकेत खातं उघडलं. त्याच्या कष्टाच्या कमाईची दौलत घराच्या कोपऱ्यात पुरून ठेवलेली, ती बँकेत ठेवली. घरात पुरून ठेवलेले पैसे वरचेवर उघडून बघायचा. सगळीकडं सामसूम झालं की हा खड्डा उकरून बघायचा. तिथली जागा मऊ भुसभुशीत झालेली. एकदा उंदराने ती जमिन उकरलेली. दोऱ्याने गुंडाळलेली नोटांची गड्डी पत्र्याच्या डब्यात ठेवायचा विठू. डबा उंदराला कुरतडता आला नाही म्हणून पैसे वाचले. तेव्हापासून तो मग नीट जागा सारवायचा. ह्या व्यापातून त्याला अंघोळीला न् कपडे धुवायला कसा काय वेळ मिळेल? आता बँकेत पैसे टाकल्यावर त्याला बघताच येईनात. तो बेचैन झाला. मग मालकाला येऊन पिडायचा.

''मालक, पैसं हायीत ना?''

''आरं बाबा! पैसं नाहीत कुठं जायचं, तू काळजी करू नगंस, च्या घे.''

विठूला दूध घातलेला गोड चहा पिल्यावर हुशारी यायची. आपलं मालक लय चांगलंयत. पण पैसे नीट असत्याल ना? याची चिंता सतावत राही.

चारपाच दिवस झाले की, पुन्हा मालकाला म्हणायचा,

''मालक, पैसं बघायला मिळत्याल का?''

''बँकेतलं पैसं तसं बघायला न्हाइत मिळत. तुला लागलं तर पाहिजे तेवढं काढता येत्यालं.''

''मला काढायचं नाहीत, नुसतं बघायच्येत.''

त्याला तो मळक्या नोटांचा बंडल दोऱ्यात गुंडाळलेला दिसायचा. त्याला सारखं वाटायचं, एकदा तरी हातात घेऊन बघावा. तिथं काय केलं आसंल, कसं ठेवलं असत्यालं आपलं पैसं. एवढ्या सगळ्या लोकांच्या पैशात माझं पैसं कसं ठिवलं असत्याल? असं नाना प्रश्न त्याला बेचैन करीत. आठवड्यांचा पगार

झाल्यावर तो मालकाला म्हणाला,

"मालक हे पैसं ठिवायचेत."

त्याला वाटलं आता तरी मला पैसे बघायला मिळतील. मालक म्हणाले,

"ठिवू की. माझ्याजवळ दे. मी उद्या जाणारेय तालुक्याला. येतो बँकेत ठिवून."

विठूला वाटलं, मालक कशावरून पैसे ठेवत्यालं. त्यांनी स्वत:लाच घेतलं तर... आपणच स्वत:च्या हाताने ठेवावेत. आधीचे पण बघता येतील.

"मालक मला पण यायचंय." विठू लाजत म्हणाला.

"तू कशाला येतोस. रोजगार बुडायचा न्हाय का?"

"मला माझे पैसं बघायचेत."

"बर जाऊ. पण अंघोळ कर न् चांगली धुवून कापडं घाल."

मालकाने त्याला साबण दिला. मालक वैतागले. उगाच पिडा लागली मागं. हजार पाचशे रूपयं ह्याचं, न् लाखाची दौलत असल्यासारखा करतोय. ह्याला वाटतंय मी ढापतोय की काय ह्याचं पैसं? ह्या गरीब वारकऱ्याचं पैसं घेऊन मी काय नरकाच्या वाऱ्या करू की काय खुळा कुठला.

दुसऱ्या दिवशी विठूला घेऊन मालक बैलगाडीतून गेले. धान्याची पोती विकायला नेलेली. विठू बरोबर होता. त्यामुळे मालकाला हमाल लावायची गरज पडली नाही. सगळी पोती त्यानं आडत दुकानात नेली. वजन काट्यावर टाकली. नंतर त्याचे मिळालेले पैसे मालकानं बँकेत भरले. त्यांनी विठूचं पासबुक तयार झालं का विचारलं. पासबुक तयार झालेले. त्यावर रक्कम लिहिलेली. पण विठूला वाचता कुठं येतं होत? मालकाच्या ओळखीचे एक अधिकारी होते. त्याला मालक म्हणाले,

"त्याला तेवढी रक्कम दाखवा मजी त्याचा जीव थंडगार होईल. लय डोकं खातुया".

कॅशियरने त्याला दोन हजाराच्या नोटा दाखविल्या. ते म्हणाले,

"हे बघ तुझे पैसे."

विठून नोटा हिसकावूनच घेतल्या. त्याला ते डब्यातले दोऱ्यात बांधलेला बंडल असेल असं वाटलं. ह्या करकरीत नोटा आपल्या कशा? हे आपले पैसे नाहीत. त्याने त्या नोटा कॅशियरकडे फेकल्या. आणि म्हणाला,

"हे पैसं माझं न्हाइत."

असं म्हणत हमसून रडू लागला. त्याला वाटले मालक आणि ह्या लोकांनी

आपले पैसे घेतले. आपल्याला लुटलं. तो रडत रडत म्हणाला.

"मालक, तुमी फसवलं. माझं आता कसं व्हयाचं?"

कॅशियरने त्याला समजावून सांगितलं,

"अरे त्या नोटा फाटक्या होत्या, तसल्या नोटा चालत नाहीत. त्या बदलून नव्या ठेवल्यात. हे रूपये तुझेच आहेत."

मालकाने पण त्याला सांगितलं.

"आरं बाबा खरंच ह्या नव्या नोटा तुझ्याच हाइत."

मालक असं म्हणल्यावर त्याचं रडं थांबलं. बारक्या पोरासारखा तो हळूच हसला. आनंदानं त्या नोटा कुरवाळू लागला. तेव्हा मालक म्हणाले,

"आता ते दुसरे पैसे आणलेले दे, हे आन् ते आसं दोनी मिळून आपण ठेवू बँकेत. त्यांच्या पण नवीन नोटा होतील."

विठूने पैरणीच्या खिशातले दोऱ्यांनी बांधलेले नोटांचे छोटेशे बंडल मालकाकडे दिले.

मालकाने दोरा काढून नोटा मोजल्या. स्लीप भरली. ते पैसे, स्लीप, पासबुक बँकेतल्या काउंटरवर दिले. थोड्यावेळाने त्यांनी पासबुक विठूला परत दिले. ते नवीन पासबूक पाहून विठू हरखून गेला. त्याला मालक म्हणाले,

"ह्या बँकेत तुझं पैसे जपून ठिवलेत. ते सगळं ह्या पासबुकात लिहिलंय. आता हे पुस्तक नीट जपून ठेव. हरवलं तर पैसं मिळणार न्हाइत."

"आस व्हय?"

पुस्तक हरवल्यावर पैसे मिळणार नाहीत म्हणल्यावर विठू धास्तावला. घरी आल्यावर त्याने एक तरटाची पिशवी घेतली. त्यात पासबुक ठेवून शिवून टाकली. नंतर त्याला सुतळीचे बंध करून ती गळ्यात अडकवू लागला. गावातली मुलं त्याच्यामागे लागायची त्यांना ती सवयच होती. तर त्याला वाटायचं पासबुक घ्यायलाच मागं लागत्याती! तो मग छातीवर रूळणारे पासबुक हाताने घट्ट धरून घराकडे पळत पळत यायचा. हल्ली त्याचं कशाकडंच नीट लक्ष नसायचं. तो त्याचं घरही नीट झाडेनासा झाला. मालक थोडी भाकरी द्यायचा तेवढ्यावरच तो राहू लागला. त्यामुळे तो खंगल्यासारखा दिसायचा.

एकदा पोरांना कळलं त्याच्या पासबुकाचं. तो झोपल्यावर त्याच्या गळ्यातलं पासबुक काढून घ्यायचं त्यांनी ठरवलं. विठू ते मुठीत घट्ट धरूनच झोपायचा. त्याची झोप लागल्यावर मूठ सैल पडणारच की, तरी ते गळ्यातून कसं काढायचं?

एकानं सुरी नाहीतर ब्लेड आणायचं का विचारलं.

"ऐ नको. त्याचा गळा कापला तर?" दुसरा म्हणाला.

"मगं आता?" तिसरा म्हणाला.

"थांब, म्या बघतू. तुमी भायीरच थांबा."

त्यातल्या त्यात थोराड अन् विचार करणाऱ्या मुलानं म्हटलं. त्यानं सावकाश ते पासबुक हातात घेतलं न् डोक्यातनं बाहेरं काढलं. वरच्या बाजूनं निघालं तरी डोक्याखालची बाजू तशीच होती. आता काय करायचं? हळूहळू काढली तरी तो जागा होणारच. काय करावं? त्याला वाटलं असा बी जागा होणार तसा बी जागा होणारच... मग त्याने तो डोक्याखाली अडकलेला दोरा खसकन ओढला न् धुमचकाट पळाला. सगळी मुलं त्याच्यामागं पळाली. त्या कालव्याने विठू जागा झाला. डोक्याला झटका बसला होताच. त्यानं तो नीट जागा झालेला. हातात पुस्तक नव्हतं. सहज सवयीनं त्यानं गळ्यात चाचपून बघितलं. तर गळ्यातही नव्हतं. त्यानं बघितलं, इकडंतिकडं कुठं पडलंय का? कुठंच दिसेना. अंगणात बघावं म्हणून तो बाहेर गेला, तर दार उघडंच. असं कसं दार उघडं राहिलं? चोर आले की काय? आता मात्र गडी धास्तावला. चांगलाच टकटकीत जागा झाला. तेवढ्यात त्याला खुसफुस ऐकायला आली. नीट कान दिला तर पोरं हसल्यासारखा आवाज होता. जरा पुढं जाऊन बघितलं तर पोरंच होती. आता ती जोराजोरात खिदळत होती. तो मग पोरांच्या मागे धावत सुटला. एकाला पकडलं की तो म्हणायचा, त्याच्याकडं हाय. त्याला पकडलं की तो तिसऱ्याचं नाव सांगून सुटायचा. विठू कावून गेला. तो रडत रडत मालकाकडं गेला. एवढ्या रात्री हा आलेला बघून मालक वैतागला. पण पासबुकाची काळजी मालकालाही वाटलीच. मालक म्हणाला. "कुठली पोरंयत त्यांची नांव सांग, बघतो एकेकाकडं."

"अंधारात कायच दिसलं न्हाय."

त्याला अंधारात चेहरे नीट दिसले नाहीत पण आवाज ओळखायचा किंवा त्यांची नावं माहीत असण्याचा तरी काय संबंध. तो नुसता रडत होता. चपल्या घालत मालक 'चल' म्हणाले. त्यांच्या आवाजानं मालकीण जागी झाली. असं निम्म्या रातीला मालक कुठं निघालेयत म्हणून तिनं विचारलं. तेव्हा मालक म्हणाले,

"ह्या विठूचं पासबुक पळावलंय पोरांनी. वांड पोरं, उगा गरीबाला छळत्याती."

मालक पोरांना शिव्या देत निघाले. मालकिणीला काळजी वाटली. बिचाऱ्या गरीबाचं पुस्तक चोरून काय मिळणारेय काय माहीत चोरट्यांस्नी. मालकिणीनं

दार लावून घेतलं. पोराच्या अंगावर पांघरून वगैरे नीट आहे का बघावं म्हणून त्यांनी दिवा लावला. तर पोरगं तिथं नव्हतंच. मालकिणीच्या लक्षात आलं आपले सुपुत्र अजून घरी आलेलेच नाहीतं. आणि हे काम त्यांचेच असणार. आणि पुस्तक कुठं जाणार नाही याचीही खात्री वाटली. तरीपण गरीबाला कशाला छळायचं?

मालक पारावर गेलं. तिथं पोरांचा कालवा चालला होता. आधीच झोपमोड झाल्यामुळे मालक चिडलेले. तो सगळा ताव त्यांनी पोरांवर काढला. पोरांना शिव्या घालत म्हणाले, "कुणाजवळ पुस्तक आसलं तर द्या चटशिरी, न्हायतर पेकाटच मोडीन एकेकाचं." साक्षात मालकच आल्यामुळं पोरांनी पटदिशी पासबुक काढून दिलं. मालकांनी ती दौलत विठूजवळ दिली. अन् पोरांना म्हणाले, "अरे गाढवांनो, गरीबाची चेष्टा करून काय मिळतं रे सुकळीच्यांनो. तो कशासाठी पैसे साठवतोय माहित्येय का?" 'नाही.' पोरं एका सुरात ओरडली.

"त्याच्या पुतण्याला शहरात शिकायला ठेवलंय. त्याच्या शिक्षणासाठी पैसं साठवतोय हा. एका अपघातात त्याचा भाऊ भावजय वारले. ह्याला आईवडिल पण न्हायत. आता फक्त पुतण्या न् हा जिवंत हायत. हा अडाणी. त्यानं मग पुतण्याला शिकवायचं ठरवलंय. सोतासाठी तो कायच करत न्हाय. लगीन सुदीक केलं न्हाय. अशा गरीबाला मदत करायची सोडून उंडग्यांनो, तरास देताय व्हय?"

पोरं शांत झाली. त्यांना स्वत:ची चूक उमजली. मालक घरी जायला निघाले. बिगीबिगी विठू त्यांच्याकडं गेला. न् म्हणाला."मालक माझ्याजवळ चोरत्याती हे. तुमच्याजवळ ठिवा." मग मालक ते पासबुक घेऊन गेले. तर आता नवाच त्रास सुरू झाला. आठवण झाली की, हा म्हणायचा दाखवा पासबुक. हातातलं काम सोडून ते पासबुक ह्याला दाखवायला लागायचं. मालक वैतागायचे. एकदा तर सगळे झोपलेले. हा दरवाजा वाजवू लागला. जोरजोरात हाका मारू लागला. मालक मालकीण घाबरून गेले. दार उघडून बघताहेत तर हा उभा. सगळ्या विश्वाची चिंता त्याच्या चेहऱ्यावर दाटून आलेली. तो मालकांना म्हणाला, "मालक त्या पासबुकात खरंच पैसं हाइत ना?" मालकाने कपाळावर हात मारून घेतला.

*(एका सिंधी कथेवर आधारीत.)*

* * *

# कडबाशिल्प

चैत्राचं ऊन रणरणत होतं. सुगी संपल्यामुळं रानं मोकळी होऊन ऊन्हं पित होती. कुठे कुठे नांगरट चाललेली. पण ऊन्हाची काहीली एवढी की बैलं धापा टाकायची. त्यांच्या तोंडाला फेस यायचा. टॅक्टरवाला नांगरत असेल तर तोही घामाघूम व्हायचा. मग अशावेळी झाडाखाली नाहीतर खोपटातल्या सावलीत विसाव्याला जावसं वाटायचं. तुकाबापूकडे सालगडी असलेला बाजीराव दुपारी विसाव्याला बसायचा. त्याची विश्रांती म्हणजे कामात बदल. शांत बसून रहाणं त्याला ठाऊकच नाही. वैरणीची वाळलेली पिवळी ताटं गुरांनी खाऊन इकडं तिकडं पडलेली. ते तुकडे गोळा करून आणायचा. ताटांचा पालापाचोळा काढून साफ करायचा. मग ती ताटं सोलायचा. सोललेल्या चोयट्यांचा उपयोग तुकडे जोडण्यासाठी टाचणीसारखा करायचा. ज्वारीच्या ताटातला मऊ गाभा, या चोयट्यांनी सहजपणे जोडला जायचा. मॅकॅनोपासून जशा सोप्पेपणाने वस्तू तयार करता येतात. तशा या गाभ्यापासून हवी ती वस्तू बाजीराव करायचा. आजूबाजूला जेवढ्या म्हणून वस्तू दिसायच्या तशा तो हुबेहुब वस्तू बनवायचा. या कलेला तसं पुस्तकी नाव काय होतं माहीत नाही. रानाशिवारातली ही कला. पुस्तकात नाव यायचं काहीच कारण नव्हतं. कडबाशिल्प म्हणू या आपण, या कलेला.

बाजीरावाची रानात रस्त्याच्या कडेला खोप होती. ती खोप त्याचे मालक तुकाबापूंनी त्याच्यासाठीच बांधलेली. बाजीराव एकटाच असल्यामुळे जिथं काम करेल तिथंच त्याचा मुक्काम असायचा. शेतात खोप बांधली की शेताची, गुराढोरांची राखण होते. मालकाच्या घरातील कोण आलं तर घटकाभर पाणी प्यायला, दुपारचं थोडं पडायला त्या झोपडीचा उपयोग होत असे. एरवी त्या खोपटाचा मालक फक्त बाजीरावच असे. शेतात रस्त्याच्या कडेला त्याचं खोपटं होतं. तिथं सावलीत एका बाजूला पाण्याचा डेरा (माठ) भरून ठेवलेला असायचा. जेवण त्याचा मालक तुकाबापू घरून करून आणायचा. खोपटाच्या बाहेरच्या अंगाला तीन दगडांची चूल केलेली. त्यावर शेरडीचं दूध घालून चहा करायचा. पितळी भरून चहा पिल्यावर त्याला लवकर भूक लागायची नाही. सकाळी गुरं फिरवून आणायचा. उन्हाचं पाणी

पाजून झाडाच्या सावलीत बांधायचा. त्यांच्या पुढं वैरण, गवत टाकून स्वत: खोपटात वारंघशी बसायचा. त्याचं कलाकारीचं काम करीत. बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर, एस.टी, बस, जीप, घरं, बंगले, असं बरंच काही बनवायचा. एकदा त्याला खेळण्यातला चष्मा घावला. त्याच्या काचांनी ट्रकच्या पुढच्या बाजूच्या खिडक्या तयार केल्या. तसं ह्या शिल्पकलेत रंग वापरत नसायचा तो. पण ट्रकला रंगीत काचाच्या खिडक्यांनी सुंदर रूप आलं. एकदम झ्यॉक दिसू लागला ट्रक. तो ट्रक तयार करून बाजूला ठेवला आणि दुसरी वस्तू करू लागला. तेवढ्यात एक ट्रक त्याच रस्त्याने निघालेला. ट्रकचं ते कडबाशिल्प बघून ट्रकवाला थांबला. रस्त्याच्या एका बाजूला ट्रक उभा करून तो खोपटाकडं आला. खोपटात पाण्याचा माठ बघून नेहमीच असे वाटसरू पाणी प्यायला यायचे. बाजीराव कडबाशिल्प करण्यात गुंगून गेलेला. ट्रकवाला पाणी प्याला. तरी बाजीराव आपल्याच कामात मग्न. त्याचं ट्रकवाल्याकडं लक्षच नाही. मग ट्रकवाल्यानंच त्याला विचारलं,

''केवढ्याला टरक दिला, पावणं?''

''इकायला न्हाय केला.'' त्याच्याकडे न बघताच बाजीराव म्हणाला.

''मग कशाला करतूयास इतकं सार?'' तिथल्या तशाच केलेल्या वस्तूकडे बघत ट्रकवाला म्हणाला.

''मला करायला येतं. करावंसं वाटतं. जीव रमतो ह्याच्यात माझा.'' बाजीराव म्हणाला.



ट्रकवाल्यानं खिशातून शंभराची नोट काढली न् म्हणाला,

"हे बघ आधी पैसे देतो. हा नसला द्यायचा तर नको देऊस. दुसरा असाच करून दे."

"ते पैसं ठिवा तुमच्याजवळच. दुसरा करीन का न्हाय ते मला न्हाय म्हाइत. आसं कुणाला बांधील ऱ्हात न्हाय मी." बाजीराव त्याच्यावर खेकसला.

"काय राव तुमी तर लय भाव खाताय. पण कराच एक टरक आमच्यासाठी. शंभर गावातली लोकं बघत्याली. कौतुक करत्याली."

"जा आता तुमी. रस्त्यात लय उशीर टरक उभा केलाय. येणारी जाणारी लोकं मलाच शिव्या घालत्याली."

ट्रकवाला मनातल्या मनात बाजीरावला शिव्या देत गेला.

एक बाई डोक्यावर गवताचा भारा घेऊन निघालेली. बाजीरावच्या खोपटाबाहेरचा डेरा बघून थांबली. आणि बाजीरावला म्हणाली,

"बाजीराव, पाणी हाय का वायच? मायंदाळी तहान लागलीय."

"व्हय, व्हय हाय की, घ्या डेऱ्यातलं."

बाजीराव त्याच्या कामात, वर न बघताच तिला म्हणाला.

त्या बाईनं गवताचा भारा खाली टाकला. पाणी प्यायली. जीव थंडगार झाला. पदरानं तोंड पुसीत ती बाजीरावने केलेल्या वस्तू न्याहळू लागली. ती बिनआवाजाची गपचीप बसलेली पाहून बाजीराव म्हणाला,

"मावशी काय बघताय?"

"आता बया बघण्यासारखं केल्यावर नकू का बघायला."

ती तशीच बसली. मागावं का नको मागावं? असा विचार करीत बसली. नंतर मनाचा धडा करून म्हणाली,

"बाजीराव, माझा ल्योक भारी हुशार हाय. त्याला शिकावचिला का? आता सुट्टी पण हाय."

"कितीसा मोठाय?"

"धाअकरा वरसाचा आसल की."

"ल्हानय अजून. आसं करा ही गाडी त्याला न्या. कसा खेळतुया बघा. मोडतोड केली तर खवळू नका. शिकायचं म्हणाला तर शिकवू."

"आगं बया तुमी तर लय मोठ्या मनाचं हायसा की."

"निघा आता माझा खोळंबा हुतूया."

बाजीरावनं तिला बैलगाडी दिली. तिनं हरकून ती बैलगाडी घेतली न् निघाली. पण हातात गाडी घेऊन गवताचा भारा उचलावा कसा? तिला तर सोन्यासारखी गाडी खाली ठेवू वाटेना. ह्या तिरसींगरावाला वझं उचलू लाग तरी कसं म्हणावं. आधीच गाडी देऊन उपकार केल्यातंय. कुणी हाय का जवळपास हात लावायला वझ्याला, म्हणून ती इकडं तिकडं बघू लागली.

"मावशी, उचलू लागायचं का?"

"व्हय हो, पण हिथं कुणीच दिसंना."

बाजीराव उठला त्यानं तिच्या डोक्यावर ओझं उचलून दिलं. मग हातात बैलगाडी दिली. ती गाडी हातात घेताना केवढा मोठा जीव झाला तिचा.

असा हा बाजीराव, त्याच्या मनात असलं तर तो कुणाला काही द्यायचा न्हायतर, नाही. त्याला झाडपाल्याची काही औषधं माहीत होती. दवाखान्याचा गुण येईना की खेडूत, शेतकरी त्याच्याकडे यायचे. औषधाच्या खर्चापुरते पैसे घेऊन तो औषध तयार करून द्यायचा. पण कुणाला ते औषध कसं तयार केलंय ते सांगायचा नाही. कडबाशिल्प पण अशीच वाटून टाकायचा. विकत मागितली मात्र शिव्या द्यायचा.

बाजीराव म्हातारा झाला. त्याला आता काम होईनासं झालं. तो खोपटातच पडून रहायचा. बाजीरावला तुकाबापूनं काढून टाकलं नाही. दुसरा सालगडी बघितला. शेताला राखण होत होती. आणि आता तो जाणार तरी कुठं? म्हणून त्याला त्याच खोपीत ठेवलं. जेवण पाठवून द्यायचा. नंतर नंतर बाजीरावाचं चालणं फिरणं बंद झालं. बाजीरावला वाटायचं आपण मालकाचं फुकटचं खातोय. खायला कार न् धरणीला भार. या जगात आपलं असं रक्ताचं, नात्यातलं कोणच नाही. अंथरूणाला खिळून राहिलो तर आपला गूमूत कोण काढील ही चिंता त्याला सतावत राही. मग त्यानं काहीतरी मनाशी ठरवलं. ते कुणालाच कळलं नाही. मालकाने दिलेले जेवण तो गायीला, कुत्र्याला खाऊ घालायचा. असं बरेच दिवस उपाशी राहिला. एकेदिवशी मालक त्याचं जेवण घेऊन आला तर हा अंथरूणातच मरून गेलेला. त्याने कुणाच त्रास दिला नाही. असा हा हाडाचा कलाकार. त्याच्या कलाकारीमुळं लोकांच्या लक्षात राहिला. कलेमुळं माणसाला अशाप्रकारे अमरत्व येतं.

* * *

# सांताक्लॉज आणि राही.

**त्या** वर्षी दुष्काळ पडलेला. गरीब लोकांचे हाल होत होते. गावाच्या एका बाजूला गरीब लोकांच्या झोपड्या, छोटी घरं होती. तिथंच राही आणि तिच्या आईची झोपडी होती. राहीच्या आईचं नाव रूक्मिणी होतं. घरात दोघीच रहात असत. रूक्मिणी शेतात मजुरी करायची. त्याच्यावर दोघींचं भागायचं. पण सध्या दुष्काळामुळं शेतातली कामं मिळेनाशी झालेली. त्यात त्यांना दूरवरून पाणी आणावं लागायचं. पाणी आणल्यावर मग कुठं काम मिळतंय का बघायचं. नाहीतर शेरडं, गुरं राखोळी घ्यायची. ती रानामाळावर हिंडवायची. त्यांना राखत राखत झाडाझुडपात फिरून लाकडं गोळा करायची. त्याच्या छोट्या छोट्या मोळ्या बांधायची. त्या विकायची. या कामाचं तिला कधी धान्य मिळायचं तर कधी पैसे. जोंधळं मिळालं तर ती ते भरडून कण्या शिजवायची. कुणी ताक दिलं तर त्यांचा सणच साजरा होई. कधी नुसताच भात शिजवून खायचा. असे दिवस चालले होते. या अती कष्टामुळे आणि कुपोषणामुळे ती सतत आजारी पडायची. मग काम बंद, रोजगार बंद, पैसे येणे बंद. मग घरात काही मूठभर धान्य असेल तर राही त्याचं काहीतरी खाण्यासारखं करायची. तांदूळ असले तर भात शिजवायची. त्याचीच पेज करून आईला द्यायची. एकदा तेही संपले. मग ती शेजारी गेली. आई आजारीय असं सांगितलं. शेजारी खडाखडीच. तेसुद्धा गरीबच होते. पण कमावणारे हात चालू असले तर काही ना काही असतं, थोडंफार शिजतं. शिजलेले जास्त असेल तर तेही मिळतं. राहीची तेवढी वेळ तरी निघते. एक तर ती लहान असल्यामुळं तिला आईसारखा कोंड्याचा मांडा करता येत नसायचा. आईला आजारपणामुळं तोंडाला चव नसायची. मग ती नीट जेवायची नाही. राहीला मग वाईट वाटायचं. तिला वाटायचं आईनं भरपूर खाऊन पटकन बरं व्हावं. पण आज शेजारणीच्या घरात जास्तीचं काही शिजलं नव्हतं. मग तिनं घरातली गाडगी शोधली. तर पसाभर हुलगे सापडले. तेच तिनं राहीला दिलं. आणि सांगितलं ह्याचं माडगं करून घाल तुझ्या आईला. कसं करायचं ते तिनं विचारून घेतलं. घरी येऊन त्याप्रमाणे तिनं केलं. माडगं पिल्यावर आईला हुशारी

वाटू लागली. जरा आराम पडल्यामुळे तिची झोप लागली. रूक्मिणी झोपलेली बघून राहीला बरं वाटलं. तिनं थोडसं माडगं खाल्लं आणि घराजवळ लिंबाचं झालं होतं. तिथली जागा साफ करून एकटीच बसली गजगे खेळत. त्यावेळी तिला घोडागाडीतून सांताक्लॉज निघालेला दिसला. त्यालाही राही एकटीच खेळताना दिसली. त्याने गाडी थांबवली. गावात सगळ्या मुलांना भेटवस्तू वाटलेल्या. ते संपवून तो घरी निघालेला. राहीला पाहून थांबला. त्याने स्वतःला खाण्यासाठी फळे ठेवलेली. ती राहीला दिली. तो म्हणाला,

"मी गावात दरवर्षी येतो. तुला माहीत नाही का?"


"माहित्येय पण माझी आई आजारीय, म्हणून नाही आले."

"भेटवस्तू संपल्या की. आता तुला काय देऊ बेटा?"

"ही फळं मिळाली ना मला. आई आजारीय तिला पण होतील. तुम्ही माझ्या आईला भेटलात ना तर तिला बरं वाटेल. तिचं दुखणं पळून जाईल."

"तुझी आई आजारी असताना, तिला डावलून मी कसा जाईल. चल."

मग सांताक्लॉज तिच्या घरी गेला घर छोटंच होतं. शेणानं सारवलेली जमीन उखणलेली होती. पाण्याच्या तुटवड्यामुळे अंथरूण पांघरूण मळलेले होते. कुबट वास घरभर पसरलेला होता. राहीने तिची छोटी वाकळ होती ती सांताक्लॉजला बसण्यासाठी जमिनीवर अंथरली. सांताक्लॉजला आधी मळमळले. थोडावेळ तसाच बसून राहिला. मग नाकाला सवय झाली, त्या



वासाची. रूक्मिणीला जाग आली. तिला घाम आल्यामुळे थकवा जाणवत होता. पण ताप उतरला होता. ती उठून बसली. राहीनं मडक्यातलं पाणी दिलं. सांताक्लॉजने कमरेचा बटवा काढला न् रूक्मिणीला थोडे पैसे दिले. तिला म्हणाला,

"औषधपाणी कर, नीट राहा. ताजं अन्न खा."

"दादा तुमच्या रूपानं विठूमाऊलीच घरी आली. साक्षात नारायण घरी आला. त्याला उपाशी कशी जाऊ देऊ. बसा वाइच. काय तरी करते."

सांताक्लॉजला तिचं मन मोडवेना. तो बसला. रूक्मिणीनं गाडगी मडकी शोधली. एका गाडग्यात थोड्या कण्या सापडल्या. सांताक्लॉजला भूक लागलेलीच. तो राहीशी गप्पा मारत बसला. राहीचे प्रश्न सुरू झाले.

"आजोबा दरवर्षी अशा भेटवस्तू का वाटता?"

"येशूख्रिस्ताचा वाढदिवस ना म्हणून वाटतो. तुम्ही कसं कृष्णाष्टमीला दहीहंडी करता तसं."

"आजोबा कुठे झाला येशूख्रिस्ताचा जन्म?"

"बेथलहेम ह्या गावात."

"मला येशूची गोष्ट माहीत नाही. सांगा ना."

"हो दादा सांगा ना मला पण ऐकायचीय."

सांताक्लॉज गोष्ट सांगू लागला.

"नाताळचा सण आणि नविन वर्षाचे स्वागत, सरत्या वर्षाला निरोप देत उत्साहाने जगभर साजरे करतात. या सणाला ख्रिसमसही म्हणतात. ख्रिसमस म्हणजे ख्रिस्ताचा जन्म.

मारिया हिचे योसेफ नावाच्या माणसाबरोबर लग्न ठरले होते. तिला स्वप्न पडले की, तुझ्या पोटी पवित्र आत्मा जन्म घेणार आहे. तू घाबरू नकोस. प्रभूची तुला समर्थ साथ आहे. त्यामुळे लग्नाआधी गर्भवती असलेल्या मारियाची काळजी मिटली. तिचं लग्न झालं. तिचा नवरा योसेफच्या लक्षात आलं, मारिया गर्भवती आहे. त्यामुळे त्याला फार दु:ख झालं. परंतु तो धार्मिक वृत्तीचा असल्यामुळे उघडपणे त्याने मारियाचा अपमान न करता तिला गुप्तपणे, तिच्या नकळत सोडण्याचा विचार केला. योसेफ या गोष्टीचा विचार करीत असतानाच प्रभुच्या दुताने त्याला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले, योसेफा, दाविदाच्या पुत्रा तू आपली बायको मारिया हिचा स्वीकार करायला भिऊ नकोस. तिला पवित्र आत्म्यापासून

बाळ होणार आहे. तिला पुत्र होईल. त्याचे नाव येशू ठेव. हे होणारे बाळ प्रत्येकाला पापापासून मुक्त करेल. तारेल. तो आपल्या सर्वांचा मुक्तिदाता होईल. त्यामुळे योसेफला आत्मविश्वास आला त्याने खेचरावर मारियाला बसवलं न् बेथलहेमला गेला. परंतू तेथे त्याला राहायला घर मिळाले नाही. म्हणून तो गोठ्यात राहू लागला. दिवस भरल्यानंतर मारियाला गोठ्यातच बाळ झाले. त्याचे नाव येशू ठेवले.

एक मेंढरं राखणारा मेंढपाळ कुरणात मेंढरं चरायला घेऊन जायचा. रात्री तो तेथेच झोपायचा. येशूचा जन्म झाला त्या रात्री अचानक मोठा तारा त्याच्यासमोर आला व आकाशवाणी झाली, तुमच्यासाठी बेथेलहेममध्ये राजा जन्मला आहे. त्या दिशेने हा तारा पुढे पुढे जात राहिल. जिथे येशूचा जन्म झाला आहे तिथे थांबेल. ही खूण मिळाल्यानंतर मेंढपाळ धष्टपुष्ट कोकरं घेऊन त्या बाळाला भेटायला गेला.

राजेलोकांपर्यंत ही वार्ता समजली. राजेलोकही बाळाला बघायला गेले. हा राजा कुठल्याही राजवाड्यात जन्मला नव्हता, तर तो एका गायीच्या गोठ्यात जन्मला होता. सर्व जमलेल्या लोकांनी गोठ्यात जाऊन बाळ व मारियाचे यांचे दर्शन घेतले. राजेलोकांनी आपल्या जवळचे पैसे, सोने, उद, वगैरे दान केले. सर्वांनीच आपल्या ऐपतीप्रमाणे दान देऊन हा जन्म सोहळा आनंदानं साजरा केला. तेव्हापासून हा सण २५ डिसेंबर या दिवशी ख्रिश्चन लोक मोठ्या उत्साहाने साजरा करतात. येशूने मोठा झाल्यावर खूप थोर कार्य केलं. त्याचा छळही झाला. तरीही येशू, 'सर्वांवर प्रेम करा.' असा संदेश देत राहिला. त्याला सुळावर खिळे ठोकून जीव मारणाऱ्या लोकांच्यासाठीही त्याने परमेश्वराजवळ प्रार्थना केली. तो म्हणाला, 'परमेश्वरा, ह्यांना क्षमा कर. त्यांना आपण काय करतोय तेच कळत नाही.' असा येशू सर्वांवर प्रेम करणारा. त्याच्या प्रेमसंदेशाने तो अजरामर झाला. म्हणून या साधूपुरूषाचा जन्मदिवस जगभर सणासारखा साजरा करतात.

या सणाला दिवाळीसारखे कपडे, फराळाचं करतात. डोनट आणि केक करतात. बेथलहेमच्या परिसरात ख्रिसमस ट्री जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे हेच वृक्ष सजविण्याची प्रथा पडली.

पूर्वी सांताक्लॉज नावाचा वृद्ध मनुष्य मुलांमाणसांत प्रेम वृद्धींगत व्हावं म्हणून, येशुबद्दल भक्तिभाव वाढावा म्हणून स्वतःच्या खर्चाने भेटवस्तू वाटायचा. सांताक्लॉजचे निधन झाल्यावर त्याच्या नावाने मुलांना भेटवस्तू देऊन खूश

करण्याची प्रथा पडली. एकमेकांवरचे प्रेम वृद्धिगंत व्हावे म्हणून असं करतात. असं म्हणून सांताक्लॉजने गोष्ट पूर्ण केली. मग रूक्मिणीने त्याला ताक कण्या आणि थोडं माडगं खायला दिलं. ते खाऊन सांताक्लॉज त्यांना आशीर्वाद देऊन निघाला. राही त्याला गाडीपर्यंत सोडायला गेली. तिला आणखी काहीतरी द्यावं असा विचार तो करत होता. गाडीजवळ आल्यावर त्याला गाडीच्या वरच्या बाजूला समोर लटकलेले झुंबर दिसले. त्याने ते काढून राहीला दिले. म्हणाला, "हे घरात लावा. तुमची भरभराट होईल. तुम्हाला अभ्यासाची, सतत कष्ट करण्याची, सगळ्यांवर प्रेम करण्याची प्रेरणा मिळेल. तुम्ही सुखी व्हाल. सुखी झाल्यावर जगाला प्रेमाचा संदेश द्यायला विसरू नका." असे म्हणून सांताक्लॉज निघून गेला.

पुढे राही मन लावून शिकली. तिथल्याच शाळेत शिक्षिका झाली. तिने आपल्या विद्यार्थ्यांना, आजूबाजूच्या लोकांना नेहमीच प्रेमाची शिकवण दिली.

*मित्रांनो, काही शंका असल्यास फोन किंवा मेल करा, पत्र पाठवा.*

या गोष्टी वाचण्यात
छोटे मंडळी तर रंगून जातीलंच,
पण मोठे लोकही वाचता, वाचता
काही काळ लहान होतील.
बालक, पालक दोघांना आवडेल
असा हा कथासंग्रह,
आपल्या संग्रही असायलाच हवा.
तुम्ही एकदा वाचाल
आणि सगळ्यांना सांगालंच,
वाचायला!

—

लोकसंस्कृती प्रकाशन